सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN 978-81-940842-0-4

• पुणे • वर्ष : २० • अंक ०५ • ऑगस्ट २०२४ • किंमत : रु. ३०/- • पृष्ठे ५२ • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## सहकार धोरणाचा समावेश असलेला ‘विवेकी अर्थसंकल्प’



स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!




## विकसित भारताच्या निर्माणावर सहकारातून भर देणार








सहकारातील ज्येष्ठ कार्यकर्ते हरिभाऊ बागडे राजस्थानच्या राज्यपालपदी

चलो शिर्डी! चलो शिर्डी!!

सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश त्रैवार्षिक अधिवेशन २१-२२ सप्टेंबर २०२४ रोजी श्रीक्षेत्र शिर्डी येथे होणार!


दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
ISO 9001-2015
स्थापना-१९९४
आपला परिवार, आपली संस्था!
ह्या स्वतंत्र भारता
प्रत्येक नागरीकाला
वित्तीय संकटातून
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
15 ऑगस्ट
शुभेच्छुक
सौ. निलीमा बावणे
(अध्यक्ष)
सौ. सारिका पेंडसे
(उपाध्यक्ष)
व समस्त संचालक मंडळ
सीताराम भवन
ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
वाढदिवस | मुंज
लग्न | साक्षगंध
सांस्कृतिक कार्यक्रम
कॉन्फरन्स
7888002023
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
LOCKERS सुविधा
SMS अर्लट
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
DEPOSIT सुविधा
₹ 2200 कोटींच्या वर व्यवसाय
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
90 BANKING P.O DAYS TRAINING
A BRIDGE OF BANKING CAREER
100% Placement Guarantee*
BANKING POINT PROGRAMME P.O.
Join The Dharampeth Mahila Society Probationary Officer Programme P.O.
Enroll Now & Grab The Opportunity 7888002023
Authorised Rail Ticket Reservation Centre
फ्लाईट
क्रूज
हॉटेल
बस
ONLINE BOOKING FACILITY AVAILABLEAT ALL BRANCHES 7020218417
मुख्य कार्यालय
प्लॉट नं. ४२-अ, सीताराम भवन, राम नगर चौक, शिवाजी नगर, नागपूर-१० | फोन: 0712-2524337 / 2520303 | ई-मेल : info@dpmahila.com



राजर्षी शाहू
र.नं ८१९
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था, FCBA पुरस्कार प्राप्त संस्था,
मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
अपेक्षेपेक्षा अधिक लाभ देणारी विश्वसनीय संस्था
अखंड वाढ गुंतवणुकीची..!
आपल्या दाम दुप्पट ठेव योजना
सोने तारण कर्ज
वेअर हाऊस कर्ज
अल्पबचत कर्ज
वाहन तारण कर्ज
बचत गट कर्ज
15 ऑगस्ट
भारतीय स्वातंत्र्य दिन
निमित्त सर्व देश वासियांना मंगलमय शुभेच्छा..!
संदीप शेळके
अध्यक्ष- राजर्षी शाहू परिवार
संकल्पक- वन बुलडाणा मिशन
राजर्षी शाहू विशेष लखपती ठेव योजना
> २४५०/- रू. प्रतिमाह ३६ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १७००/- रू. प्रतिमाह ४९ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १३५०/- रू. प्रतीमाह ६० महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> ६५०/- रू. प्रतीमाह ६२ महिने भरा मिळवा रु.५०,०००/-
> शाहू पे
> मोबाइल बँकिंग
> नेट बँकिंग
> डोअरस्टेप बँकिंग
> RTGS
> NEFT
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकुण ६९ शाखेचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
४. 'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ३५ हजार महिलांना १२५ कोटी रू. चे कर्ज वाटप
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस् विड्रॉल देणारी राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
शाहू पे ॲप व्दारे कोणत्याही शाखेमध्ये विड्रॉल फॉर्म न भरता QR कोड स्कॅन करून विड्रॉल करता येईल.
MAHAVITARAN
MSEB
विज बिल भरणा केंद्र
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
सौ.मालती शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑफ क्रेडीट सोसा. मर्या. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
+91-9528490490

# प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था

पुंजानी कॉम्प्लेक्स, कारंजा (लाड) जि. वाशिम. र. नं. 760




**प्रशिक फार्मर प्रोड्युसर कंपनी तर्फे**

**सर्व शेतकरी होतील माल माल आणि खुशहाल!**

**बीज उत्पादन केंद्र तथा**

**सोयाबीन बियाणे विक्री केंद्र**

**दर्जेदार बियाणे**

**KDS 726/ KDS 753**

सर्व शेतकरी बांधवांना अल्प दरात उपलब्ध

विक्री वेळ - सकाळी १० ते सायं. ६

संपर्क - व्यवस्थापक - ९५८८६ ६१८८२

*** स्थळ ***

मुर्तिजापूर रोड,
रिद्धी सिद्धी
मंगल कार्यालय
नायरा पेट्रोल पंपासमोर,
कारंजा (लाड)



INDIA'S MOST TRUSTED BRAND
वेगवान अर्थव्यवस्थेला विश्वासाचा आवाज!
ADVITA CREDIT
SCAN WITH BHIM UPI
APPS TO PAY | ALL IN ONE QR
QR PAYMENT SOLUTION WITH SOUND BOX
Powerful Speaker Clear Audio
Long-lasting 10 day Battery
4G Network Connectivity
विविध अर्थसंस्थेसाठी विशेष ऑनलाईन / आधुनिक तंत्रज्ञानाची प्रणाली
पतसंस्था
को-ऑप. सोसायटी
निधी कंपनी
को-ऑप. बँक
मल्टीस्टेट
क्रेडिट को-ऑप. सोसायटी
अधिक महितीसाठी संपर्क करा
श्री. अतुल वाकोडे 9552823088
श्री. प्रविण भंडारकर 7972680755
श्री. विशाल पद्मावर 9604026006
हेल्पलाईन 9552823088
मुख्य कार्यालय : ए-३०३, स्वागत इन्क्लेव्ह हाऊसिंग सोसायटी, जांभुळवाडी रोड,
आंबेगाव खुर्द, हवेली, पुणे. (महाराष्ट्र) ४११०४६
ऑनलाईन डेमोसाठी 96 0402 6006 | Email : info@advitacredit.in | www.advitacredit.in
कार्यक्षेत्र : • महाराष्ट्र • गोवा • मध्यप्रदेश • गुजरात • छत्तीसगड • राजस्थान • उत्तरप्रदेश • हरियाणा • कर्नाटक • तेलंगना

VISUAL
INFOSYSTEMS PRIVATE LIMITED
A core banking software solutions




# VISUAL INFOSYSTEMS PVT. LTD.

A CORE BANKING SOFTWARE SOLUTIONS

संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अग्रेसर असलेले
सर्वाधिक पसंतीचे कोअर बँकिंग सॉफ्टवेअर



## FACILITIES IN SOFTWARE

- MOBILE APPS
- AADHAR/PAN VERIFICATION
- CREDIT SCORE REPORT
- RTGS/IMPS/NEFT
- QR CODE COLLECTION
- ALL AUDIT REPORTS
- DOOR STEP BANKING
- BULK SMS

## SOFTWARE FOR

- CO-OP BANK ✓
- CO-OP CREDIT SOCIETY ✓
- MULTI-STATE SOCIETY ✓
- EMPLOYEE SOCIETY ✓
- NBFC /NIDHI ✓

**CERTIFICATIONS :**
VAPT & CERT - in Certification for
Web and Android App Certified
by TUV-SUD ISO 9001:2015
ISO/IEC 27001:2013

**CORPORATE OFFICE :**

Visual Infosystems Pvt. Ltd.
Head Office :
Third Floor, Malan Plaza, Near Durga Mata Mandir,
Akashwani Road, Chhatrapati Sambhajinagar
(Aurangabad) – 431005

BRANCH OFFICE- PUNE

**Contact Us :**
+91 9423000202
+91-8080342437
+91 8080762775
+91 9545002127
+91 9209000096
+91 9763878000
+91 9156422284
+91 9763873000

Email : info@visualinfosystems.in
Website : www.visualinfosystems.com

## सहकार भारती निर्मित ग्रंथ

# सहकार महर्षी

### प्रथम आवृत्तीस भरघोस प्रतिसाद...

दुसऱ्या आवृत्तीची मूळ किंमत ₹ १५००/-


















१०००+ पानांच्या दुसऱ्या आवृत्तीत
१७५ सहकार महर्षींचे चरित्र प्रसिद्ध होणार!

## दुसऱ्या आवृत्तीची नोंदणी सुरू...

**दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन**
**दि. २१ सप्टेंबर २०२४ रोजी**
**महाराष्ट्र प्रदेश अधिवेशन, शिर्डी येथे**
**प्रकाशनपूर्व किंमत (कुरिअरसह)**
**₹ १३००/-**

बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या
प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!

**निर्मिती व ग्रंथ विक्री व्यवस्था**
**सहकार सुगंध** (पुणे कार्यालय)
ऑफिस नं. १५, पाचवा मजला,
विष्णूप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११ ०३०
ऑफिस मो. : ८८०५९ ८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयात कळवावे.

50 YEARS OF MOMENTUM

अर्थ
सहकारेण
कल्याणम्

THE KALYAN JANATA
SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK

# YOUR TRUST IS OUR KEY STRENGTH

## 3 Reasons to Avail Lockers

Secure place to keep your valuables.

Hassle free rent payment via S.I.

Wide availability in various sizes.




TOLL FREE: 1800 233 1919 kalyanjanata.in KJSBank

# नेटविन सिस्टीम्स &सॉफ्टवेअर [इं] प्रा. लि. नाशिक

netwin
Ideas to Life







## विश्वसनीय QR पेमेंट सुविधा पुन्हा एकदा आपल्या सेवेत, व्यवसाय वाढवा NetPayUPI च्या सहकार्याने.

### aceBank-CBS कोअर बँकिंग सोल्यूशन सह आमच्या इतर सुविधा.

- Whatsapp बँकिंग
- eNACH
- LOS
- IMPS
- ONLINE ACCOUNT OPENING PORTAL
- लोन रिकव्हरी ॲप
- मोबाईल बँकिंग
- मोबाईल मनी कलेक्शन
- NEFT & RTGS
- VOICE MESSAGING SERVICE

NetPayUPI

## अधिक माहिती साठी संपर्क करा

**०२५३ ६६५ १५००**

sales@netwinindia.in | www.netwin.in

Certification's

ISO | ISO | CMMI LEVEL 5 | TIER3 DATA CENTER | CISA certified



BALAJI URBAN
CO-OP. CREDIT SOCIETY LTD.
Juni Gujri Chowk, Digras Dist. Yavatmal
R.No. Y.M.L./D.R.S./R.S.R./C.R./606/2003
Webside : balajiurbandigras.in
E-mail : balajinagari606@gmail.com
आपला विश्वास
Digras Dist. Yavatmal
दिग्रस जि. यवतमाळ.
• शाखा : मानोरा चौक, दिग्रस ०७२३४-२२४०२२
• शाखा : तहसिल चौक, दिग्रस ८६२४९४०४४३
: मुख्यालय :
जुनी गुजरी चौक,दिग्रस ८२०८४०९६५८
• आर्णी शाखा : उत्तम टॉकीज जवळ, आर्णी ०७२३४-२६६८००
पुसद शाखा : सुभाष चौक, पुसद ८०८०५११८९९
१५ ऑगस्ट २०२४
स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
'आम्ही सुसज्ज आहोत, तुमच्या आर्थिक व्यवहाराकरिता सर्वोत्तम सुविधासह...'
मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजदर
दि. २३-१०-२०२३ पासुन
(द.सा.द.शे.)
६ महिने 8 %
९ महिने 9 %
१३ महिने 9.50 %
आवर्ती ठेव
10 %
बालाजी अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. दिग्रस
संचालक मंडळ सन २०२२-२०२७
१. श्री. राहुल वि.शिंदे अध्यक्ष
२. श्री. अश्विन दा. चौधरी उपाध्यक्ष
३. प्रा. श्री. यशवंत ज्ञा. सुर्वे संचालक
४. श्री. सुहास ज्ञा. ढोले संचालक
५. श्री. रमाकांत पां. काळे संचालक
६. श्री. सुहास वि. महिंद्रे संचालक
७. श्री. सनिल ब. राठोड संचालक
८. श्री. राजाराम का. खडसे संचालक
९. श्री. अविनाश गु. ठाकरे संचालक
१०. सौ. मिनाक्षी रा. शिंदे संचालक
११. सौ. रजिता सु. ढोले संचालक
१२. श्री. श्यामकुमार बा. लोखंडे सर व्यवस्थापक

# अनुक्रम

सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

ऑगस्ट २०२४ (वर्ष २०, अंक ०५)

देशाची अर्थव्यवस्था सक्षम करण्याबरोबर विकसित भारताच्या निर्माणावर भर देणार– केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचे प्रतिपादन ........ १३

सहकारातील ज्येष्ठ कार्यकर्ते हरिभाऊ बागडे राजस्थानच्या राज्यपालपदी ........ १४

नवीन राष्ट्रीय सहकार धोरणाचा समावेश अर्थसंकल्पात करुन सरकारने दिली सहकार क्षेत्राला राजमान्यता ........ १५

केंद्रीय अर्थसंकल्पावरील प्रतिक्रिया ........ १६

विवेकी अर्थसंकल्प ........ १६

भारताच्या नवआकांक्षांना बळ देणारा अर्थसंकल्प ........ १८

सहकारी संस्थांचे जाळे विस्तारीकरणावर भर देणार– केंद्रीय सहकार राज्यमंत्री मोहोळ . २०

शाश्वत विकासासाठी प्राचार्य राजाभाऊ धाट यांचे मौलिक कार्य –सतीश मराठे ........ २१

बँक राष्ट्रीयीकरण– एक पुनरावलोकन ........ २२

सहकार भारती प्रदेश अधिवेशन २१–२२ सप्टेंबर रोजी शिर्डी येथे होणार ........ २३

व्यापारी पद्धतीमध्ये मत्स्य व्यवसायात रोजगाराच्या संधी –ॲड. सुभाष मोहिते ........ २४

मोठ्या पतसंस्थांचे नागरी सहकारी बँकांमध्ये रूपांतर करणे अपरिहार्य: सहकार भारती राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी ........ २५

भगिनी निवेदिता बँकेला ओरिसा सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट ........ २६

खासगी उद्योग समूहांना बँकिंग परवाने देण्याचे धोरण नाही – रिझर्व बँक ऑफ इंडिया. २७

दुग्ध व्यवसायाचे अर्थशास्त्र ........ २८

साखर उद्योगाच्या सर्वांगीण विस्तारासाठी ठोस निर्णयाची आवश्यकता ........ २९

Factoring: Avenue to grow lending and priority sector portfolio for UCBS? ........ ३०

नांदणी सहकारी बँकेचा सदस्यांसाठी १० टक्के लाभांश जाहीर ........ ३३

मोती बँकेच्या हुतात्मा चौक शाखेचे उद्घाटन ........ ३४

सारस्वत सहकारी बँकेचा ८२ हजार कोटींचा व्यवसायाचा टप्पा पूर्ण ........ ३५

विविध उपक्रमांनी शालिवाहन पतसंस्थेचा वर्धापन दिन साजरा ........ ३६

शिक्षण क्षेत्राला सहकारी बँकांनी आर्थिक पाठबळ द्यावे ........ ३७

गृहरचना संस्था – शंका समाधान ........ ३९

‘सहकार सुगंध’ हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्रायजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए–१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक –** भालचंद्र कुलकर्णी

‘Sahakar Sugandha’ monthly is owned by ‘Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, ‘C’ Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय महामंत्री)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
श्री. दीनानाथ ठाकूर (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. रमेश वैद्य (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
डॉ. शशिताई अहिरे (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. संजय परमणे (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर (डॉ. विखे पाटील सहकार अध्यासन प्रमुख)
श्री. सतीशजी मराठे, श्री. ज्योतिंद्रभाई मेहता,
श्री. विष्णूजी बोबडे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**दि. १ मे २०२२ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ४००/– फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १०००/– फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**

**कृपया चेक / डीडी ‘सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.’ या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**

**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, निर्मिती शोरुमच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# यंदाच्या अर्थसंकल्पात सहकार धोरणाचा समावेश!

यंदाच्या अर्थसंकल्पात नव्या राष्ट्रीय सहकार धोरणाचा समावेश करुन केंद्र सरकारने पुन्हा एकदा सहकारावरील आपला दृष्टीकोन अधिक स्पष्ट केला आहे. तीन वर्षांपूर्वी नव्याने सहकार मंत्रालय स्थापन करुन केंद्र सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली होतीच. सहकार चळवळीला राजमान्यता असण्याचा खूप मोठा परिणाम सध्या देशभर दिसतो आहे. सहकार चळवळ ही फक्त राजकारणी लोकांची सोय आहे. इथे भ्रष्ट कारभार आहे, अशी एक प्रतिमा सहकाराची झाली होती, त्याला मोठा छेद यानिमित्ताने मिळाला आहे.

आज सहकार क्षेत्राचा मोठा सहभाग अर्थकारणात आहे, मात्र त्याचा काहीसा विसर सरकारला आणि या चळवळीत काम करणाऱ्यांना देखील पडला होता. सरकारच्या मूळ उद्दिष्टांनुसार सहकारात सरकारची भागीदारी अपेक्षित होती. सहकार ही शासनप्रणीत चळवळ आहे आणि घटनादुरुस्तीने तर सहकार ही मुलभूत गरज म्हणून मान्यता मिळालेली आहे. 'सहकार' हा विषय घटनेत राज्याच्या अखत्यारित येतो. नवीन सहकार मंत्रालय स्थापन केल्यापासून व त्याची धुरा गृहमंत्री अमितभाई शहा यांनी स्वीकारल्यापासून, सहकार चळवळ ही शासनप्रणीत चळवळ आहे, याचे प्रत्यंतर त्यांनी घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे येऊ लागले आहे. त्यातच यंदाच्या अर्थसंकल्पात संपूर्ण नवीन सहकार धोरणाचा समावेश करून शासनाने सहकार क्षेत्राला राजमान्यता दिली आहे. केंद्राप्रमाणेच राज्य सरकारांकडून सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी सकारात्मक पावले उचलणे अपेक्षित आहे.

केंद्रीय सहकार मंत्रालयाने गेल्या वर्षीच नवीन राष्ट्रीय सहकार धोरण आखण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. या समितीने संपूर्ण देशभर दौरा करून नवीन सहकार धोरणाचा मसुदा तयार केला आहे. सदर मसुदा अंतिम मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे सादर केला आहे. नेमके हेच धोरण माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात मान्यतेसाठी सभागृहापुढे ठेवले आहे. यापूर्वी अटलजींचे सरकार असताना सन २००२ मध्ये शेवटचे सहकार धोरण मांडले गेले होते. आता मात्र संपूर्ण धोरणास अर्थसंकल्पात जागा मिळाली आहे. नवीन राष्ट्रीय सहकार धोरणात सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये सहकार चळवळीचे सक्षमीकरण, खासगी व सार्वजनिक क्षेत्राप्रमाणे समान व्यवसाय संधी, सहकारी वित्तीय संस्थांचे सक्षमीकरण, क्षेत्रातील कामकाजांचे आधुनिकीकरण, प्रशिक्षण, संशोधन इ. सर्वच मुद्यांचा समावेश करण्यात आला आहे.

कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांचे आयुष्यमान सुधारण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारने १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल उचलले आहे, हे मान्य करावयास हवे. कृषी क्षेत्रामध्ये सहकार क्षेत्राचे योगदान मोठे आहे. देशातील ९१% भागात सुमारे १ लाख विविध कार्यकारी सहकारी संस्था कार्यरत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या या विविध कार्यकारी संस्था शेतकऱ्यांच्या जीवन वाहिनी आहेत, हे लक्षात घ्यावे लागेल. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ५० कोटी जनता, ज्यामध्ये सुमारे २० कोटी शेतकऱ्यांचा समावेश आहे, ही या ना त्या प्रकारे सहकार क्षेत्राशी जोडलेली आहे. अर्थसंकल्पात केलेल्या भरीव तरतुदींचा विनियोग कृषी क्षेत्रातील सहकारी संस्थांना त्यांच्या उत्पादन, मार्केटिंग व इतर क्षेत्रात संशोधनाद्वारे विकास साधण्यासाठी करता येणार आहे. अशा प्रकारे नवीन सहकार धोरणातील सर्वच बाबींची अंमलबजावणी होण्याची आशा असून त्यामुळे 'सहकारातून समृद्धी' हे केंद्रीय सहकार मंत्रालयाचे ब्रीद वाक्य प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता निश्चितपणे निर्माण झाली आहे.

या अर्थसंकल्पात विकसित भारताच्या निर्मितीला चालना दिली असून त्यातून शक्तिशाली भारताची निर्मिती करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्या दृष्टिकोनातून शेतकरी गरीब महिला व तरुण व मध्यमवर्ग यांच्या कल्याणावर भर देण्यात आला आहे. यामध्ये सहकार चळवळीला विशेष स्थान राहणार आहे. सहकार चळवळ समृद्ध करण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल म्हणून या अर्थसंकल्पाकडे पहायला हवे. एकंदरीत अर्थमंत्र्यांनी देशाचा एकूण आर्थिक विकास व सुधारणा यांची योग्य, मध्यम मार्गी दिशा कायम ठेवली असून अर्थसंकल्पात कोणत्याही आकर्षक किंवा लोकप्रिय घोषणा केलेल्या नाहीत. त्यामुळेच या विवेकी अर्थसंकल्पाचे स्वागत केले पाहिजे.

जय सहकार !



## संपादकीय...

# देशाची अर्थव्यवस्था सक्षम करण्याबरोबर विकसित भारताच्या निर्माणावर भर देणार

## केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचे प्रतिपादन

**अहमदाबाद** – गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत सर्वसामान्य जनतेला दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तूंची उपलब्धता करून देण्यात सरकारला यश मिळाले आहे. यापुढील कालावधीत सहकार चळवळीच्या माध्यमातून समृद्ध बनविण्याचा संकल्प आहे, असे मत केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार दिनाच्या निमित्ताने 'सहकारातून समृद्धी' यावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.



गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, सहकार राज्यमंत्री जगदीश विश्वकर्मा, इफ्कोचे अध्यक्ष दिलीप संघाणी, राज्य अर्बन को-ऑप. बँक फेडरेशन अध्यक्ष ज्योतींद्रभाई मेहता, विधानसभा अध्यक्ष शंकरभाई चौधरी, उपाध्यक्ष जेठाभाई आहिर, कृभकोचे अध्यक्ष चंद्रपालसिंह यादव, राज्य सहकारी बँक महासंघ अध्यक्ष अजयभाई पटेल आणि सहकारी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मका पिकापासून इथेनॉल उत्पादन करता येणे शक्य आहे असे नमूद करून सहकार मंत्री शहा यांनी सांगितले की, त्यासाठी मका पिकांची खरेदी सहकार संस्थांच्या माध्यमातून एमएसपीनुसार करावी लागणार आहे तसेच येत्या सन २०२९ पर्यंत देशातील ग्रामीण भागातील प्रत्येक पंचायतीच्या परिसरात दूध डेअरी आणि विविध कार्यकारी सोसायटी कार्यरत होतील. सहकार क्षेत्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा बळकट आधार आहे आणि म्हणूनच येत्या सन २०४९ पर्यंत विकसित भारताचा संकल्प पूर्ण करायचा आहे. त्याचे कारण म्हणजे सहकार क्षेत्र सर्वसामान्य जनतेशी मोठ्या प्रमाणावर निगडित आहे. देशात सहकार चळवळीचा विचार अनेक थोर नेते, कार्यकर्ते यांनी १२५ वर्षांपूर्वी रुजविला आहे. पण मध्यंतरीच्या काळात सहकार चळवळीची गती मंदावली होती. मात्र गेल्या काही वर्षांत सहकार क्षेत्राला नवचैतन्य देण्यासाठी केंद्र सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. त्याचा एक भाग म्हणून सहकारासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यात आले. ग्रामीण भागाचा विकास आणि कृषि क्षेत्राबरोबर विविध क्षेत्रात सहकार क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे त्यांनी नमूद केले.

नाफेड, अमूल, इफको, कृभको यासारख्या असंख्य सहकारी संस्था केवळ देशातच नाही. जगाच्या विविध देशात नावारूपाला आल्या आहेत असे नमूद करून ते म्हणाले, यावरच आपण समाधान न मानता आगामी पांच वर्षांच्या कालावधीत देशातील प्रत्येक गावात आणि घरामधे सहकार क्षेत्र पोचले पाहिजे. यासाठी केंद्र सरकारच्या वतीने अनेकविध योजना आणल्या आहेत. मक्याची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या उत्पादनाचा इथेनॉलमधील मिश्रणासाठी उपयोग होणार आहे. यासाठी त्यासाठीच्या खरेदीची किंमत नक्की करण्यात आली आहे.

सहकार चळवळीच्या कार्यामध्ये एकरूपता असावी यादृष्टीने देशातील विविध कार्यकारी सोसायट्यांसाठी नव्याने कायदे तयार करण्यात आले आहेत असे नमूद करून ते म्हणाले, यामुळे शेतकऱ्यांना विविध योजना सुरू करता येणार आहेत. सध्याच्या स्थितीत सुमारे ४८ हजार सोसायट्या या नवीन कायद्याशी जोडल्या आहेत. याखेरीज राष्ट्रीय स्तरावर तीन नव्याने मल्टिस्टेट सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच जिल्हा सहकारी बँक आणि जिल्हा दूध उत्पादक संघ यांच्या माध्यमातून प्रत्येक डेअरी सोसायटी आणि सहकारी संस्थेचे खाते बँकेत सुरू करण्याची आवश्यकता आहे. यामुळे सहकार क्षेत्राला बळकटी येण्यास मदत होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पटेल यांनी सांगितले की, विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात येण्यासाठी राज्यातील जनतेने आणि सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था, कार्यकर्ते यांनी योगदान द्यावे. देशातील जनतेच्या सहयोगामुळे विकसित भारत संकल्पना प्रत्यक्षात येण्यास हातभार लागणार आहे. केंद्रीय सहकार राज्यमंत्री विश्वकर्मा, इफकोचे अध्यक्ष संघाणी यांनी मनोगते व्यक्त केली.



# सहकारातील ज्येष्ठ कार्यकर्ते हरिभाऊ बागडे राजस्थानच्या राज्यपालपदी




**छत्रपती संभाजीनगर –** सहकारातील ज्येष्ठ कार्यकर्ते, सहकार भारतीच्या सुरूवातीच्या काळातील महामंत्री, बँकींग, दूध, साखर यामध्ये सहकारी संस्थांचे जाळे उभारून जनसामान्यांचे आधारवड असलेले हरीभाऊ तथा नाना बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी निवड झाली आहे. फुलंब्री येथून सलग ६ वेळा भाजपचे आमदार राहिलेल्या हरीभाऊंनी महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेचे अध्यक्षपद देखील भूषविले होते. तसेच राज्याच्या विविध खात्यांमध्ये त्यांनी मंत्रीपददेखील सांभाळले होते. सहकार भारतीच्या कार्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. आळंदी येथे २०२१ मध्ये झालेल्या सहकार भारती प्रदेश अधिवेशनात त्यांचा स्व. अण्णासाहेब गोडबोले स्मृती पुरस्काराने गौरव करण्यात आला होता.

# सहकारातील प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी सहकार भारती दिल्लीचे आंदोलन



**नवी दिल्ली –** राज्य आणि केंद्र सरकारच्या सहकार विषयक धोरणाच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी सहकार भारती आणि युनायटेड थ्रिफ्ट क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सहकारी संस्थांच्या विविध प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष दीनानाथ ठाकुर, फेडरेशनचे अध्यक्ष आणि सहकार भारतीचे राष्ट्रीय मंत्री सुनील गुप्ता, सहकार भारती दिल्ली प्रदेश संघटन प्रमुख बलवान गौतम आदी यामध्ये सहभागी झाले होते.

आंदोलनानंतर सहकार भारतीच्या वतीने आठ सदस्यीय शिष्टमंडळाने सहकारी संस्था विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले. दर तीन महिन्यात सहकारी संस्थांच्या विविध मागण्यांबाबत चर्चा करून त्यातून मार्ग काढण्यात येईल. तसेच कर्ज मर्यादा ३ लाख रूपायावरून ५ लाख करण्याबाबतचा आदेश नजीकच्या काळात काढण्यात येणार आहे, असे शिष्टमंडळाला सांगण्यात आले.

फेडरेशन अध्यक्ष गुप्ता यांनी सांगितले की, सहकारी संस्थांच्या समोर अनेकविध समस्या आहेत त्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करण्यात आले. कारण या समस्यांकडे संबंधित विभागाने आवश्यक त्या प्रमाणात लक्ष दिले नाही. अनेक बाबतीत अनियमितता पाहावयास मिळत आहे. कर्ज वसुलीची प्रकिया अधिक गतिमान होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे ज्या गृहरचना सहकारी संस्था ३० वर्षापूर्वीच्या आहेत. त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी ठोस निर्णय घेण्यात यावा, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.




## देशातील प्राथमिक कृषी पतसंस्थांची संख्या वाढविण्यात येणार

**नवी दिल्ली –** देशातील कृषिक्षेत्रात सहकारी संस्थांचा सहभाग वाढावा आणि उत्पादकता वाढावी यासाठी विविध राज्यांतील प्राथमिक कृषी पतसंस्थांची संख्या वाढविण्यात येणार आहे. यासाठी सहकार क्षेत्रातील विविध संस्थांबरोबर चर्चा करण्यात आली आहे.

बहुउद्देशीय विविध कार्यकारी सोसायटी यापुढील काळात शेतीसाठी लागणारी यंत्र सामुग्री, ट्रॅक्टर, टिलर यासारख्या कस्टम हायरिंग सेवा प्रदान करणार आहेत. याचा कृषी क्षेत्राला नक्कीच फायदा होणार आहे. परिणामी उत्पादनवाढीला चालना मिळणार आहे. याखेरीज ग्रामीण भागातील असंख्य शेतकऱ्यांना अल्पमुदतीचे आणि दीर्घकालीन मुदतीचे तसेच विविध बँकिंग सेवा या सोसायट्यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. व्यवसायात विविधता आणण्यासाठी आणि शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न उपलब्ध व्हावे यादृष्टीने पतसंस्थांची संख्या वाढविण्यात येणार आहे.

## जगातील डिजिटल व्यवहारात भारताचा वाटा वाढणार

**मुंबई –** जगातील डिजिटल व्यवहारात भारत देशाचा वाटा ४८.५ टक्के इतका झाला असून आगामी दोन वर्षाच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वाढण्याचा अंदाज आरबीआयने अहवालात स्पष्ट केला आहे. ही वाढ एक दशशांवरून एक पंचमांश असा असण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. विविध देशात स्थायिक असणाऱ्या भारतीयांनी मायदेशात पैसे पाठविण्याचे प्रमाण सर्वात जास्त गतवर्षी होते. ही रक्कम ११५.३ अब्ज डॉलर असल्याचे चलन आणि वित्त अहवालातून समोर आले आहे. जगातील डिजिटल व्यवहारातील ४८.५ टक्के वाट्यासह देश आघाडीवर आहे. मोबाइल आणि डिजिटलच्या माध्यमातून जगातील विविध देशातून मायदेशात पैसे पाठविण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. डिजिटल क्षेत्रात भारताचे स्थान वरचे आहे आणि गेल्या ७ वर्षाच्या काळात डिजिटल व्यवहारातील वार्षिक वाढीचा दर वाढला असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तरी सायबर सुरक्षेचे आव्हान तितकेच महत्वाचे आहे असे नमूद करण्यात आले आहे. कारण या धोक्यांचे स्वरूप हळूहळू बदलत आहे. यातील सुविधांना लक्ष करण्यात येत आहे असे नमूद करण्यात आले आहे.

# नवीन राष्ट्रीय सहकार धोरणाचा समावेश अर्थसंकल्पात करुन सरकारने दिली सहकार क्षेत्राला राजमान्यता



देश स्वतंत्र झाल्यावर खासगी व सार्वजनिक क्षेत्राचा सुवर्णमध्य म्हणून शासनाच्या पाठिंब्याने सहकार क्षेत्राचा उदय झाला. गोरावाला समितीच्या शिफारसींनुसार देशाच्या नियोजनात सहकारावर एक स्वतंत्र प्रकरण टाकण्यात आले होते. सरकारच्या मूळ उद्दिष्टांनुसार सहकारात सरकारची भागिदारी अपेक्षित होती. परंतु सहकार ही शासनप्रणीत चळवळ आहे, याचा विसर केंद्र शासनास पडला होता. किंबहुना 'सहकार' हा विषय घटनेत राज्याच्या अखत्यारित येतो. या सबबीखाली केंद्र सरकारने सहकाराकडे कधीच लक्ष दिले नाही. केंद्र शासनाकडे सहकार हा विषय नेहमीच उपेक्षित राहिला. परंतु केंद्र सरकारने नवीन सहकार मंत्रालय स्थापन केल्यापासून व त्या खात्याची धुरा मा. श्री. अमितजी शहा यांनी स्वीकारल्यापासून, सहकार चळवळ ही शासनप्रणीत चळवळ आहे, याचे प्रत्यंतर त्यांनी घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे येऊ लागले होते. त्यातच यंदाच्या अर्थ संकल्पात संपूर्ण नवीन सहकार धोरणाचा समावेश करून शासनाने सहकार क्षेत्राला राजमान्यता दिली आहे असे नमूद केल्यास वावगे होणार नाही.

केंद्रीय सहकार मंत्रालयाने सन २०२३मध्येच नवीन राष्ट्रीय सहकार धोरण आखण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री मा. श्री. सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. सदर समितीने संपूर्ण देशभर दौरा करून नवीन सहकार धोरणाचा मसुदा तयार केला आहे. सदर मसुदा अंतिम मान्यतेसाठी केंद्र सरकारकडे सादर केला आहे. नेमके हेच धोरण माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात मान्यतेसाठी सभागृहापुढे ठेवले आहे, सरकारकडे सादर केला आहे. नेमके हेच धोरण माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात मान्यतेसाठी सभागृहापुढे ठेवले आहे.

यापूर्वी मा. वाजपेयीजींचे सरकार असताना सन २००२मध्ये शेवटचे सहकार धोरण प्रसिद्ध झाले होते. परंतु संपूर्ण धोरणास अर्थसंकल्पात जागा मिळण्याची ही पहिलीच वेळ असून त्यामुळे सहकार ही शासनप्रणीत चळवळ असल्याचे मान्य झाल्याने सहकार क्षेत्राला याचा फायदा सर्वच आघाड्यांवर होणार आहे.



**विद्याधर अनास्कर**
**मो.नं. ९८५०९७४०७५**

कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांचे आयुष्यमान सुधारण्यासाठी यंदाचे अर्थसंकल्पात सरकारने १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल उचलले आहे हे मान्य करावयास हवे. कृषी क्षेत्रामध्ये सहकार क्षेत्राचे योगदान मोठे आहे. देशातील ९१% भागात सुमारे ९८००० विविध कार्यकारी सहकारी संस्था कार्यरत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या या विविध कार्यकारी संस्था शेतकऱ्यांच्या जीवन वाहिनी आहेत असे नमूद केल्यास वावगे होणार नाही.

देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३० कोटी जनता, ज्यामध्ये १३ कोटी शेतकऱ्यांचा समावेश आहे, ही या ना त्या प्रकारे सहकार क्षेत्राशी जोडलेली आहे. अर्थसंकल्पात केलेल्या भरीव तरतुदींचा विनियोग कृषी क्षेत्रातील सहकारी संस्थांना त्यांच्या उत्पादन, मार्केटिंग व इतर क्षेत्रात संशोधनाद्वारे विकास साधण्यासाठी करता येणार आहे. अशा प्रकारे नवीन सहकार धोरणातील सर्वच बाबींची अंमलबजावणी होण्याची आशा असून त्यामुळे 'सहकारातून समृद्धी' हे केंद्रीय सहकार मंत्रालयाचे ब्रीद वाक्य प्रत्यक्षात उतरण्याची आशा करण्यास हरकत नाही.

नवीन राष्ट्रीय सहकार धोरणात सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये सहकार चळवळीचे सक्षमीकरण, खासगी व सार्वजनिक क्षेत्राप्रमाणे समान व्यवसाय संधी, सहकारी वित्तीय संस्थांचे सक्षमीकरण, क्षेत्रातील कामकाजांचे आधुनिकीकरण, प्रशिक्षण, संशोधन इ. सर्वच वावींचा समावेश असल्याने या राष्ट्रीय सहकार धोरणाचा समोवश अर्थसंकल्पात झाल्याने त्यामधील धोरणांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक तो निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध होणार हे निश्चित. या पार्श्वभूमीवर ज्या राज्य सरकारांच्या अखत्यारीतील सहकार हा विषय आहे, त्या राज्य सरकारांकडून केंद्राप्रमाणेच सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी सकारात्मक पावले उचलणे अपेक्षित आहे.

केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या शिफारसींनुसार यापूर्वीच केंद्र शासनाने देशातील विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे संगणकीकरण सुरू केले असून त्यासाठी आजतागायत राज्यांना ४३७.१७ कोटी रुपये वितरित केले आहेत. जगातील सर्वात मोठी गोदाम व्यवस्था सहकारी तत्त्वांवर उभारली जात आहे. विविध कार्यकारी सहकारी संस्थांना विविध व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात आली असून पेट्रोल पंप, एल.पी.जी., खतांची एजन्सी देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर नवीन सहकार धोरणास केंद्रीय अर्थसंकल्पात स्थान मिळाल्याने सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण असले तरी सहकारी बँकिंग क्षेत्राची आयकर माफीची गेल्या कित्येक वर्षांची मागणी मान्य न झाल्याने या क्षेत्रात निराशा आहे.

**– विद्याधर अनास्कर**
**राज्य सहकारी बँक प्रशासकीय**
**मंडळ अध्यक्ष,**
**बँकिंग तज्ञ**

*****

# केंद्रीय अर्थसंकल्पावरील प्रतिक्रिया

**※ आरबीआय संचालक सतीश मराठे –**



ग्रामीण भागातील सहकार क्षेत्राला तसेच विविध कार्यकारी सोसायटी दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय क्षेत्राला या अर्थ संकल्पाच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळणार आहे. परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होण्यास पाठबळ मिळणार आहे. याखेरीज कौशल्य आणि रोजगार कार्यक्रमासाठी करण्यात आलेली आर्थिक तरतूद स्वागतार्ह आहे. यामुळे युवकांना प्रशिक्षणाची सुविधा आणि रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. शेती उत्पादकता उद्योग, डिजिटल क्षेत्राला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भाजीपाला, डाळी, खाद्य तेलाच्या किमती कमी होण्यास चालना मिळेल.

**※ उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक दीपक शिकारपूर –**



भारताचे तंत्रज्ञान क्षेत्र वेगाने डिजिटल, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्स, स्मार्टफोन आणि इ-कॉमर्समधील सेवाक्षेत्रांनी ह्या क्षेत्राची क्रांतिकारी क्षमता सतत कक्षा रुंदावत आहे. निर्यातप्रधान उद्योग, स्टार्टअप व सर्वव्यापी डिजिटल इंडियाकडून अनेक पायाभूत सुविधा वृद्धी हे सरकारकडून अपेक्षित आहे. २०२३ मध्ये भारतातील आयटी-बीपीएम क्षेत्र २८० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतके होते. ६ टक्क्यांनी वाढत आहे आणि २०२७ पर्यंत या उद्योगाचा आकार ३५० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत जाईल, असा अंदाज आहे. रोजगार निर्मितीसाठी हे क्षेत्र महत्त्वाचे आहे. अर्थसंकल्पाकडे सर्वांचे लक्ष जादूच्या कांडीसारखे होते. सर्व अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. दीर्घ मुदतीच्या अनेक योजना आहेत. त्याचा फायदा संगणक व इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला मिळेल. अंदाजपत्रकात थेट कुठलीही घोषणा माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासाठी जाहीर झाली नाही. तरी अनेक अप्रत्यक्ष घोषणा या क्षेत्राला बळ देतील. या क्षेत्राला मनुष्य बळ पुरवणारे क्षेत्र म्हणजे उच्च शिक्षण क्षेत्र व कौशल्य वृद्धीवर असलेला भर. अर्थसंकल्पात या क्षेत्रासाठी अनेक स्तुत्य योजना प्रस्तावित केल्या आहेत. मनुष्य बळ विकास करताना पायाभूत सुविधांचे प्रकल्प डोळ्यासमोर ठेवून त्या प्रकारचेच प्रशिक्षण देण्यात येणार आहे. स्टार्टअप उद्योग क्षेत्राला अधिक आयकर लाभ प्रदान करण्यात येणार आहे. एंजल फंडवरील लाभ करमुक्त असणार आहे. मोबाईल फोनवरील आयात कर कमी झाल्याने किमती कमी होतील.

१ लाख कोटींचा इनोव्हेशन फंड अभिनव भारत संकल्पाला मदत करेल. कृषी क्षेत्रातील डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा शेतकऱ्यांचा अधिक डेटा प्रदान करेल. फिनटेकला मुख्य प्रवाहातील क्रेडिट माहिती मिळवण्यास सक्षम करेल. क्रेडिट गुणवत्ता सुधारेल आणि शेतकऱ्यांचा आर्थिक समावेश वाढेल. ग्रामीण कारागिरांची बाजारपेठ वाढवण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे इ-कॉमर्स आणि निर्यातकेंद्रे स्थापन होतील, ही एक स्तुत्य बाब आहे. कौशल्य कार्यक्रम, ज्याचे उद्दिष्ट २० लाख तरुणांना पाच वर्षांमध्ये उद्योगांनी विकसित केलेल्या अभ्यासक्रमांद्वारे प्रशिक्षित करण्याचे आहे. या उपक्रमामुळे रोजगारक्षमता वाढेल, बेरोजगारी कमी होईल.

**※ सीए चंद्रशेखर चितळे –**



केंद्रीय अर्थसंकल्पात कररचनेबाबत जे बदल सुचविण्यात आले आहेत, ते स्वागतार्ह आहेत. आयकर कायद्यात काही दूरगामी बदल करण्यात आले आहेत. मात्र सर्वसामान्य करदात्यासाठी अर्थसंकल्पात काही दिसत नाही. पगारदार वर्गाला वाढलेली स्टँडर्ड वजावट आणि एनपीएस वजावट कमी करण्यात आलेल्या आयकर दरामुळे आनंद देणार आहे. कर बचतीमुळे महागाईची झळ थोडी कमी होणार आहे. टीडीएसला सुव्यवस्थित करणे स्वागतार्ह आहे. मात्र नवीन कर कायद्याच्या अंमल बजावणीत अडचणी येण्याची शक्यता आहे.

---

अर्थसंकल्पीय विवेचनात्मक विशेष लेख...

# विवेकी अर्थसंकल्प



**नंदकुमार काकीर्डे**

**९९६०४ ३७००३**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेमध्ये सातव्यांदा अर्थसंकल्प सादर केला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली तिसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या एनडीएच्या आगामी पाच वर्षांतील हा पहिला अर्थसंकल्प.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीएने तिसऱ्यांदा केंद्रामध्ये आगामी पाच वर्षांसाठी सरकार स्थापन केले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांचे सातवे अंदाजपत्रक संसदेत मांडले. सत्ताधाऱ्यांनी नेहमीप्रमाणे त्याचे तोंड भरून कौतुक केले. अर्थात प्रत्येक अर्थमंत्र्याला निर्णय घेण्यासाठी काही मर्यादा असतात. देशाच्या अर्थव्यवस्थेचा सारासार विचार करून त्यांना तरतुदी करावयाच्या असतात आणि त्या अंदाजपत्रकाच्या माध्यमातून संसदेकडून मंजूर करून घ्यायला लागतात.

देशाचा आर्थिक पाहणी अहवाल अंदाजपत्रकाच्या आधी संसदेत सादर झाला. हा अहवाल केंद्र सरकारने नेमलेल्या विविध आर्थिक सल्लागारांनी लिहिलेला असतो. त्यात एका बाजूला सरकारने आर्थिक आघाडीवर मिळवलेले यश व दुसरीकडे अर्थव्यवस्थेतील वस्तुस्थिती सादर करणे अपेक्षित असते. यामध्ये देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे जीडीपी चांगली कामगिरी करत असल्याचे स्पष्ट झाले होते. त्याचवेळी देशातील घटते कृषी उत्पादन, वाढती बेरोजगारी व महागाई याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती.

देशातील बेरोजगारी, महागाई वाढलेली आहे. त्याचा फटका लोकसभा निवडणुकीत भाजपला बसला. परंतु एकटे केंद्र सरकार किंवा विविध राज्ये सर्वांना शासकीय नोकऱ्या देऊन बेरोजगारी दूर करतील अशी शक्यता नाही. त्यामुळे या प्रश्नासाठी अत्यंत वेगळ्या पद्धतीने अर्थमंत्र्यांनी भरीव तरतूद केलेली आहे. अंदाजपत्रकात खासगी उद्योग क्षेत्रांसाठी विशेष तरतूद केली आहे.

**पुढील पानावर...**

# विवेकी अर्थसंकल्प...

बेरोजगार पदवीधरांसाठी केलेली तरतूद ही तब्बल दोन लाख कोटी रुपयांची आहे. पुढील पाच वर्षांत चार कोटींपेक्षा जास्त युवकांना रोजगार, कौशल्य विकास व इतर संधी उपलब्ध होणार असल्याचे केंद्र सरकारने आश्वासन दिले आहे. या कालावधीत कौशल्य, प्रशिक्षण व रोजगार निर्मितीसाठी १.४५ कोटी रुपयांचा निधी अर्थमंत्र्यांनी दिला आहे. कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी संस्थेच्या माध्यमातून संघटित क्षेत्रातील नव्या कर्मचाऱ्यांसाठी १.७० कोटी रुपयांचे सहाय्य जाहीर करण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत एक कोटी युवकांसाठी ५०० सर्वोत्तम कंपन्यांमध्ये इंटर्नशिप योजना तयार करण्यात आली आहे. या अंतर्गत युवकांना ५००० रुपये भत्ता देण्यात येणार आहे. त्यांना कंपन्यांमध्ये एक वर्षे प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे. यामुळे देशभरात दोन कोटींपेक्षा जास्त युवकांना लाभ होण्याची अपेक्षा असून सर्व क्षेत्रातील कंपन्यांसाठी ही योजना लागू आहे. ज्याप्रमाणे भारतातील उद्योगांना उत्पादनासाठी आधारित प्रोत्साहन योजना आहे त्याच धर्तीवर रोजगार देणाऱ्या कंपन्यांना प्रोत्साहनपर निधी दिला जाणार आहे. केंद्र सरकारच्या रोजगार वाढीसाठी घेतलेला नवा दृष्टिकोन हा सकृतदर्शनी चांगला वाटत असला तरी प्रत्यक्ष खासगी क्षेत्रातील मालक त्याचा योग्य वापर करतील किंवा कसे याबाबत साशंकता आहे. त्यांच्याकडील जुन्या पण हंगामी असलेल्या कर्मचाऱ्यांना याचा लाभ देऊ शकतील व खऱ्या अर्थाने नवीन भरती होण्याची शक्यता कमी वाटते. एकूणच कामगार कायदे त्यांची भरती व रोजगार निर्मिती हे सर्व विषय क्लिष्ट असून खाजगी क्षेत्राला विश्वासात घेऊन त्यांच्या विविध संघटनांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती केली पाहिजे. मुळातच सर्व खासगी उद्योगांना अत्यंत पारदर्शक पद्धतीने प्रशासनाने सहकार्य केले पाहिजे. कंपन्यांना उत्पादन वाढीसाठी संपूर्ण मुभा देऊन त्यांना रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याची गरज आहे. भारतात अप्रेंटिसशीप कायदा आला. परंतु त्याला अपेक्षित यश लाभलेले नाही. त्याची कारणे शोधून उद्योगांना सढळ हाताने केंद्राने मदत करण्याची गरज आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पदवीधर तरुणांना किंवा बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दीर्घ काळ टिकणारे व्यवसाय शिक्षण दिले गेले आणि त्यांच्या नोकरीसाठी आवश्यक असणारे गुण निर्माण करण्यात आले तर ते अवघड जाणार नाही. देशातील औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या १ हजार आयटीआय संस्था अधिक सक्षम करण्याची घोषणाही केली आहे. बेरोजगारांची संख्या यामुळे कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या आघाडीवरील अर्थसंकल्पातील तरतुदी निश्चित स्वागतार्ह आहेत.

देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेऊन अर्थमंत्र्यांनी कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या क्षेत्रातील संशोधनासह विकासावर भर देण्यात आला असून कडधान्य व तेलबियांचे उत्पादन साठवण आणि त्याची विपणन यावर अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी यंत्रणा उभारण्याचे अर्थसंकल्पात नमूद केले आहे. मोहरी, भुईमूग, सोयाबीन, सूर्यफूल व तीळ या तेलबियांबाबत देश आत्मनिर्भर होण्यासाठी प्राधान्य दिले जाणार आहे. पुढील तीन वर्षांत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा डीपीआय उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. डीपीआय वापरून देशातील ४०० जिल्ह्यांमध्ये पिकांचे संरक्षण सर्वेक्षण केले जाणार असून त्यातून सुमारे सहा कोटी शेतकरी व त्यांच्या जमिनीचा तपशील एकत्र केला जाणार आहे. जनसमर्थ आधारित किसान क्रेडिट कार्ड वितरण पाच राज्यांमध्ये केले जाणार आहे. अन्नधान्य भाव वाढीवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवणे शक्य होईल अशी अपेक्षा अंदाजपत्रकात व्यक्त करण्यात आली आहे. मात्र शेतकऱ्यांना मिळणाऱ्या किमान हमीभावाबाबत अंदाजपत्रकात काहीही उल्लेख नाही. कृषी मंत्रालयाने याबाबतीत लक्ष घालून संवेदनशीलतेने काम करण्याची गरज आहे.

आण्विक, अक्षय आणि औष्णिक वीजनिर्मितीबाबत अंदाजपत्रकात भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. पीएम आवास योजनेअंतर्गत एक कोटी गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांच्या निवाऱ्यासाठी दहा लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे केंद्र सरकारने ठरवले आहे. पुढील पाच वर्षांत केंद्र सरकारकडून दोन लाख वीस हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाणार आहे. देशातील शंभर शहरांमध्ये प्लग अँड प्ले धर्तीवर औद्योगिक क्षेत्र विकसित केले जाणार आहे. पायाभूत क्षेत्रासाठीही केंद्र सरकारने सर्वाधिक तरतूद केलेली आहे.

या अर्थसंकल्पात विकसित भारताच्या निर्मितीला चालना दिली असून त्यातून शक्तिशाली भारताची निर्मिती करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्या दृष्टिकोनातून शेतकरी गरीब महिला व तरुण व मध्यमवर्ग यांच्या कल्याणावर भर देण्यात आला आहे. उद्योगांना विस्तार करणे सुलभ व्हावे म्हणून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी कर्ज हमी योजना जाहीर करण्यात आली असून त्यात छोट्या व्यवसायिकांना कोणत्याही हमीशिवाय कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. देशात सध्या एक लाख १७ हजार नोंदणी खूप स्टार्टअप असून त्या सर्वांना स्टार्टअप इंडिया योजनेअंतर्गत विविध सुविधा दिल्या जातात. या कंपन्यांवर यापूर्वी आकारला जाणारा एंजल कर हा रद्द करून मोठा दिलासा देण्यात आला आहे. देशातील ग्रामीण भागाचा विकास साधण्याच्या दृष्टिकोनातून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून २५ हजार गावांना जोडले जाणार आहे. ग्रामीण विकासासाठी २ लाख ६६ कोटींची निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पगारदार नोकरदारांसाठी मोठ्या प्रमाणावर नसली तरी करपात्र उत्पन्नातून ७५ हजार रुपये वाचण्याची तरतूद स्टँडर्ड रिडक्शनची रक्कम वाढवून केली आहे. यामुळे सरकारी व खासगी नोकरदारांना चांगला लाभ होणार आहे.

आंध्र प्रदेश राज्याला अमरावती येथे राजधानी स्थापन करण्यासाठी पंधरा हजार कोटी रुपयांची भरघोस मदत अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. बिहारला विशेष दर्जा देण्यात आला नसला तरी वीज निर्मिती केंद्रित विमानतळ व वैद्यकीय महाविद्यालय यांच्याद्वारे राज्याला पायाभूत सुविधांसाठी चांगली मदत करण्यात आली आहे. सरकारच्या उत्पन्नापेक्षा केलेला खर्च जास्त असल्याने प्रत्येक अंदाजपत्रकात वित्तीय तूट वाढताना दिसते. विद्यमान अर्थमंत्र्यांनी त्यावर नियंत्रण मिळवले असून ही वित्तीय तूट अत्यंत मर्यादित ठेवलेली आहे. चालू वर्षात ही वित्तीय तूट ४.९ टक्के राहील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

विविध राज्यांचा भांडवली खर्च गेल्या काही वर्षांत वाढत असला तरी त्यांच्या महसुली उत्पन्नातही चांगली वाढ होताना दिसत आहे. केंद्रांच्या योजना राबवण्यासाठी राज्यांना अधिक आर्थिक तरतूद मिळत आहे. बिहारसाठी त्यांनी एकूण ५९ हजार कोटींची आर्थिक मदत दिली आहे तर आंध्रप्रदेशालाही भरघोस अर्थसहाय्य केले आहे. पूर्वोदय सारखी विकास योजना बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, ओरिसा व आंध्र प्रदेश या पाचही राज्यांसाठी देण्यात आली आहे.

एकंदरीत अत्यंत प्रतिकूल आर्थिक व राजकीय पार्श्वभूमीवर अर्थमंत्र्यांनी देशाचा एकूण आर्थिक विकास व सुधारणा यांची योग्य, मध्यम मार्गी दिशा कायम ठेवली असून अर्थसंकल्पात कोणत्याही आकर्षक किंवा लोकप्रिय घोषणा केलेल्या नाहीत. त्यात धक्का तंत्र व नाट्यमयता आणलेली नाही हेच या अर्थसंकल्पाचे यश आहे. त्यामुळेच या विवेकी अर्थसंकल्पाचे स्वागत केले पाहिजे.

**– प्रा. नंदकुमार काकिर्डे, मोबाईल – ९९६०४ ३७००३**

**लेखक जेष्ठ अर्थविषयक पत्रकार व बँक संचालक आहेत.**

*****

# भारताच्या नवआकांक्षांना बळ देणारा अर्थसंकल्प

**मोदी सरकारच्या तिसऱ्या पर्वातील पहिला अर्थसंकल्प हा सर्वस्वी भारताच्या नवआकांक्षांना बळ देणारा अर्थसंकल्प म्हणावा लागेल. कारण, या अर्थसंकल्पात शेतकरी, उद्योग, तरुण, महिला अशा समाजातील सर्व घटकांसाठी सरकारतर्फे भरीव तरतूद करण्यात आली आहे. हे सरकार आजही 'सबका साथ, सबका विकास' या सर्वसमावेशकतेच्या तत्त्वानुरूपच कार्यरत असल्याचे प्रतिबिंब यंदाच्याही अर्थसंकल्पात उमटलेले दिसते. तेव्हा, यंदाच्या अर्थसंकल्पाची काही ठळक वैशिष्ट्ये अधोरेखित करणारा हा लेख...**



**शशांक गुळगुळे**
**संचालक, एनकेजीएसबी**
**९९२०८ ९५२१०**

आर्थिक वर्ष २०२४-२५चा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी लोकसभेत सादर केला. निर्मला सीतारामन यांनी मांडलेला हा सलग सातवा अर्थसंकल्प. मोदींच्या तिसऱ्या कारकिर्दीत सादर केलेल्या या पहिल्या अर्थसंकल्पात 'सबका साथ, सबका विकास'चा पुनश्च प्रत्यय आला. सर्वसामान्य जनतेला भुरळ पडेल असा अर्थसंकल्प सादर करणे, हा खरं तर आपल्या देशात एक 'ट्रेंड'च अलीकडे निर्माण झालेला दिसतो. मग तो अर्थसंकल्प केंद्राचा असो की राज्यांचा. बरेचदा अर्थसंकल्पापर्यंतही न थांबता, तिजोरीत निधी आहे की नाही याकडेही दुर्लक्ष करून मोठमोठ्या खर्चिक योजनाही आपल्या देश अथवा राज्य पातळीवर जाहीर केल्या जातात. पण, मोदी सरकारने असा लोकप्रिय अर्थसंकल्पीय घोषणांचा मोह टाळलेला दिसतो.

अर्थसंकल्प मांडायच्या प्रारंभी अर्थमंत्री सीतारामन यांनी सर्वप्रथम असे नमूद केले की, जनतेचा 'एनडीए'च्या धोरणांवर विश्वास आहे. त्यांनी असेही सांगितले की, हा अर्थसंकल्प महिला, युवा आणि अन्नदात्यांचा आहे आणि याची प्रचीती त्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पातही दिसून आली. सीतारामन आपल्या भाषणात पुढे असेही म्हणाल्या की, भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. त्यांचे हे म्हणणे खरे असले तरी, ज्या वेगाने अर्थव्यवस्था वाढत आहे, त्या प्रमाणात रोजगार वाढत नाहीत व याची जाणीव अर्थसंकल्प तयार करणाऱ्यांना असावी. म्हणूनच या अर्थसंकल्पात रोजगार निर्मितीसाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पीएम गरीब कल्याण योजना' पाच वर्षांसाठी वाढविण्यात आली. याचाच अर्थ 'सबका विकास' ही प्रक्रिया अजून पूर्ण झालेली नाही. खरं तर देशात विकासाचे विविध लक्षणीय टप्पे गाठले गेले, पण शेवटी ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. हे लक्षात घ्यायला हवे.

अतिसूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग हे अर्थव्यवस्थेचा कणा आहेत, जे 'एमएसएमई' म्हणून ओळखले जातात. या उद्योगांमुळे रोजगारनिर्मितीही मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे या अर्थसंकल्पात 'एमएसएमई'ना प्रोत्साहन देणारे धोरण घोषित करण्यात आले. अर्थमंत्र्यांनी असेही सांगितले की, चलनवाढीचा दर स्थिर व नियंत्रणात आहे. पण, किरकोळ बाजारपेठांमध्ये प्रचंड भाववाढ अनुभवाला येत आहे. याबाबत अर्थसंकल्पात काही ठोस उपाययोजना अपेक्षित होती. पण, त्याबाबत काहीशी निराशाच पदरी पडलेली दिसते. महागाईचा दर-वाढ ही चार टक्क्यांवर आणण्यास प्रयत्नशील राहणार आहे, असा वादा अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. याबाबत आपण आशावादी राहूया!

या अर्थसंकल्पात रोजगार व कौशल्य विकासासाठी पाच योजना जाहीर करण्याची घोषणा करण्यात आली असून, या योजनांवर खर्च करण्यासाठी दोन लाख कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. रोजगारनिर्मिती हे सरकारचे प्राधान्य राहणार आहे, अशी ग्वाही या अर्थसंकल्पात देण्यात आलेली आहे.

**※ भारताच्या विकासासाठी नऊ प्राधान्यांचा समावेश –**

भारताच्या विकासासाठी या अर्थसंकल्पात नऊ बाबी विशेष 'अजेंड्या'वर सरकारवर घेण्यात आल्या आहेत.

**१) कृषी उत्पादकता –** आपल्या देशात कृषी उत्पादन अजूनही चांगले आहे. कोरोनात आपल्या देशाला कृषी क्षेत्रानेच तारले होते. पण, निसर्गाची अवकृपा, साठवणुकीच्या अपुऱ्या सोयी, शेतकऱ्यांना मिळणारे कमी उत्पन्न, शेतकरी करीत असलेल्या आत्महत्या. या सरकारने पाच वर्षांत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू म्हणून केलेली व प्रत्यक्षात फसलेली घोषणा यात बदल हवा. **२) रोजगार कौशल्य –** देशात अकुशल कामगारांची संख्या मोठी आहे. पण, आजही कुशल कामगारांची कमतरता जाणवते. त्या अर्थसंकल्पात याला महत्त्व दिले, हा चांगला निर्णय आहे. **३) मनुष्यबळ –** देशात मनुष्यबळाची कमतरता नाही. पण, या मनुष्यबळाचा चांगला वापर करून घेणे याला प्राधान्य द्यायला हवे. **४) उत्पादन आणि सेवा क्षेत्र –** देशात कृषी आणि सेवा क्षेत्र प्रगतीमध्ये सर्वाधिक अग्रेसर आहेत. मात्र, उत्पादन क्षेत्र त्या तुलनेत अग्रेसर नाही. ते अग्रेसर झाले, तरच अर्थव्यवस्थेला गती येईल. रोजगारनिर्मिती होईल. **५) ऊर्जा सुरक्षा –** या महत्त्वाच्या मुद्यालाही अर्थसंकल्पात प्राधान्य दिले आहे. **६) इनोव्हेशन, रिसर्च व विकास –** संशोधनात आजही अन्य देशांच्या तुलनेत आपला देश मागे आहे. त्यामुळे तरुण पिढी सीए, डॉक्टर, इंजिनीअर व एमबीएच्या मागे न धावता, संशोधनाकडेही वळेल, असा सरकारचा प्रयत्न राहील. **७) पुढची पिढी –** आजची पिढी उच्चशिक्षण घेऊन अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया येथे पळायला बघते. पुढच्या पिढीची मनोवृत्ती बदलून त्यांनी भारतातच राहावे, यासाठी प्रयत्न करावे लागतील व त्यांना ज्या सुखसोयी तेथे मिळतात, त्या येथेच उपलब्ध व्हावयास हव्यात, हे सरकारपुढचे मोठे आव्हान आहे. **८) शहरांचा विकास –** वडापावच्या गाड्या शहरभर लागणे म्हणजे शहरांचा विकास अजिबात नव्हे. तेथे सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध हव्या. पायाभूत सुविधांनी सामान्यांचे जीवनही सुसह्य होते व औद्योगिक विकासही होतो.

**※ कृषी क्षेत्रासाठी तरतुदी –**

या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. डाळी, तेलबिया क्षेत्रात स्वयंपूर्णतेवर भर देण्यात येणार आहे. त्यामुळे महागाई आटोक्यात येईल. जैविक शेतीवर सरकारचा भर राहणार आहे. भाजी उत्पादन पुरवठा साखळीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म उभारण्यात येणार आहेत. पण, हा डिजिटल प्लॅटफॉर्म उभारण्यापूर्वी शेतकऱ्यांना संगणकीय साक्षर करावे लागेल. १०० बायोगॅस सेंटर उभारण्यात येणार आहेत. सहा लाख कोटी शेतकऱ्यांचा रेकॉर्ड डिजिटल करण्यात येणार आहे. हा फार चांगला निर्णय आहे. यापूर्वी बऱ्याच अशिक्षित शेतकऱ्यांना फसवून त्यांच्या जमिनी बळकावण्याचे प्रकार फार मोठ्या प्रमाणावर घडले आहेत. नैसर्गिक शेतीवर

**पुढील पानावर...**

भर देण्याचे प्रस्तावित आहे. शेतकऱ्यांसाठी सहकार क्षेत्राचा व ग्रामीण भागाचा विकास करण्याचेही प्रस्तावित आहे. जैविक शेतीसाठी एक कोटी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याचेही प्रस्तावित आहे.

**※ महिलांसाठी काय ?**

कामगारांच्या संख्येत महिलांचा टक्का वाढविण्याचे प्रस्तावित आहे. महिलांसाठी योग्य असे कौशल्यविकास कार्यक्रम सरकार राबविणार आहे. यातून महिला अर्थार्जन करू शकतील. तसेच महिलांच्या योजनांसाठी तीन लाख कोटी रुपयांचीही तरतूद करण्यात आली आहे.

**※ तरुणांच्या उन्नतीसाठी... –**

२० लाख तरुणांसाठी रोजगारनिर्मिती करण्याचे या अर्थसंकल्पात प्रस्तावित आहे. भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दहा लाख रुपयांची मदत करण्याचेही प्रस्तावित आहे. तरुणांना रोजगार मिळावे म्हणून या अर्थसंकल्पात दोन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नवे व्यवसाय सुरू करण्यासाठी तरुणांना कर्जे देण्याचेही प्रस्तावित आहे. कौशल्यविकास कोर्स सुरू करण्यात येणार आहेत. सध्या यासाठी आयटीआय ही यंत्रणा आहे. पण इच्छुक अधिक आणि जागा मर्यादित त्यामुळे बऱ्याच तरुणांना निराश व्हावे लागते. म्हणून कौशल्यविकास कोर्स सुरू करण्याच्या प्रस्तावाचे स्वागतच करावयास हवे. १२ नवे औद्योगिक हब उभारणार. ते कुठे उभारणार हे अर्थमंत्र्यांनी सांगितले नाही. देशातील ५०० टॉप कंपन्यांत इंटर्नशिप प्रोग्राम सुरू करणार. हा इंटर्नशिपचा कालावधी १२ महिन्यांचा असणार व महिलांना पाच हजार रुपये स्टायपेंड मिळणार. घरी बसून असलेल्या तरुणांसाठी ही योजना चांगली. इंटर्नशिपमध्ये १२ महिने अनुभव घेतल्यानंतर ही चांगली संधी आहे. चार वर्षांत एक कोटी तरुणांना इंटर्नशिप मिळवून देण्याचे प्रस्तावित आहे. २० लाख तरुणांना कौशल्यविकासाचे प्रशिक्षण देण्याचेही प्रस्तावित आहे.

**※ मित्रपक्षांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार –**

२०१४ आणि २०१९च्या लोकसभा निवडणुकांमध्ये सध्याच्या सरकारला 'सबका साथ' मिळाला, पण यंदाच्या निवडणुकीत भाजपला बहुमतापासून दूर राहावे लागले. बिहार व आंध्र प्रदेश येथील जेडीयू आणि तेलुगु देसम या राओलातील मित्रपक्षांनीही भाजपला पाठिंबा दिला. म्हणून या अर्थसंकल्पात बिहार व आंध्रप्रदेश या राज्यांसाठी विशेष पॅकेजची घोषणा करण्यात आली आहे. बिहारला पायाभूत सुविधांसाठी २६ हजार कोटी रुपये, तर आंध्र प्रदेशला १५ हजार कोटी रुपये दिले जातील. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी महाराष्ट्रात असल्यामुळे केंद्राला जास्तीत जास्त उत्पन्न महाराष्ट्रातून मिळते. त्यामुळे महाराष्ट्राचाही यंदाच्या अर्थसंकल्पात प्रकर्षाने विचार करण्यात आला आहे. महाराष्ट्रात शिवकालीन कित्येक गड, किल्ले ढासळलेले आहेत. त्यांची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जावयास हवी होती.

भविष्य निर्वाह निधी धारकांसाठी काही योजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. पहिली नोकरी करणाऱ्या भविष्य निर्वाह निधी धारकाला एक पगार देण्यात येणार आहे. एक लाख रुपयांपर्यंत पगार असणाऱ्यांना तीन हप्त्यांत १५ हजार रुपये देण्यात येणार आहेत. यासाठी येणारा खर्च हा सरकार करणार की भविष्य निर्वाह निधीतील पैसा वापरणार, याबाबतची माहिती अर्थमंत्र्यांनी दिली नाही. ही मदत एकदाच केली जाणार, की दरवर्षी केली जाणार हेदेखील अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले नाही. जेव्हा लोकसभेत अर्थसंकल्पावर चर्चा होईल, तेव्हा याबाबतच्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील.

छोटे उद्योजक जास्त तयार व्हावेत, प्रत्येकाने नोकरी मागू नये, स्वतः चा छोटा व्यवसाय सुरू करावा, म्हणून मुद्रा कर्जाची मर्यादा वाढवून २० लाख रुपयांपर्यंत करण्याचा प्रस्ताव या अर्थसंकल्पात आहे.

पायाभूत सुविधांचा एक भाग म्हणजे रस्तेबांधणी. यात २६ हजार कोटी




रुपयांचे नवे रस्ते बांधण्याचे प्रस्तावित आहे. हा सरकारचा रस्तेबांधणी कार्यक्रम यशस्वी ठरला आहे.

**※ कोणत्या वस्तू/सेवा स्वस्त होणार? –** कर्करोगावरील तीन प्रकारची औषधे, मोबाईल फोन, मोबाईल चार्जर, सोने-चांदी, चामड्याच्या वस्तू, २५ प्रकारची खनिजे, प्लॅटिनम, सोलर पॅनेल, इलेक्ट्रिक वाहने इत्यादी वस्तू-सेवा स्वस्त होणार आहेत.

**※ कररचना –** 'कॅपिटल गेन'च्या कररचनेत नागरिकांना फायदा होणारे बदल सरकारने प्रस्तावित केले आहेत. सीतारामन यांनी आपल्या भाषणात सांगितले की, टीडीएस उशिरा भरणे यापुढे गुन्हा मानला जाणार नाही. कररचना सुलभ, सोपी व सुटसुटीत करण्यावर सरकारचा भर राहणार आहे. 'आयटीआर' भरण्याची प्रक्रिया ही सोपी करण्याचे प्रस्तावित आहे. त्यापुढे म्हणाल्या की, सध्याचा प्राप्तीकर कायदा १९६१ सालचा, म्हणजे ६३ वर्षे जुना आहे. त्यात सद्य परिस्थितीनुसार, सद्य आर्थिक व्यवहारांनुसार येत्या सहा महिन्यांत बदल करणार. सध्याचा कायदा बराच किचकट आहे. सध्याच्या कायद्याला 'वकिलांचे नंदनवन' म्हणतात. करविषयक लाखोंनी खटले न्यायालयात सुरू आहेत. त्यामुळे त्यात बदल व्हायला हवा व तो 'टॅक्सपेअर- फ्रेंडली' व्हायला हवा होता. कायदा असा हवा की जो पाळताना प्रत्येकाला समाधान मिळाले पाहिजे.

अर्थमंत्र्यांनी जुन्या प्राप्तीकर प्रणालीचा उल्लेखही केला नाही. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन तृतीयांश करधारक नवी प्रणाली वापरू लागले आहेत. त्यांनी 'स्टॅण्डर्ड डिडक्शन' जे पगारदारांसाठी रुपये ५० हजार इतके होते, ते त्यांनी आजच्या अर्थसंकल्पात रुपये ७५ हजार इतके प्रस्तावित केले. नवीन करप्रणालीसाठी त्यांनी प्रस्तावित केलेले कराचे दर –

| वार्षिक उत्पन्न (रुपये) | करांचे प्रमाण |
|---|---|
| १) ० ते ३ लाख | शून्य |
| २) ३ लाख ते ७ लाख | ५ टक्के |
| ३) ७ लाख ते १० लाख | १० टक्के |
| ४) १० लाख ते १२ लाख | १५ टक्के |
| ५) १२ लाख ते १५ लाख | २० टक्के |
| ६) १५ लाखांहून अधिक | ३० टक्के |

या अर्थसंकल्पात अंतराळ संशोधनासाठी एक हजार कोटी रुपये इतकी रक्कम प्रस्तावित केली आहे. परदेशी गुंतवणुकीचे नियम सुलभ करण्याचे प्रस्तावित आहे. मंदिर पर्यटनावर भर देण्याचे प्रस्तावित आहे. काशीविश्वनाथसारखा बिहारमध्ये कॉरिडोर सुरु करण्याचेदेखील प्रस्तावित आहे. ओडिशा राज्यातही पर्यटनाचा चालना देण्यासाठी विशेष तरतूद करण्यात

**पुढील पानावर...**

# सहकारी संस्थांचे जाळे विस्तारीकरणावर भर देणार - केंद्रीय सहकार राज्यमंत्री मोहोळ




**पुणे –** ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी आणि सर्वसमावेशक वाढ व शाश्वत विकासासाठी सामाजिक-आर्थिक विकास सुनिश्चित करण्यात सहकारी संस्था महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत. यासाठी सहकारी संस्थांचे जाळे मोठ्या प्रमाणावर विस्तारण्यावर अधिक भर दिला जाणार आहे असे मत केंद्रीय राज्यमंत्री नागरिक विमान वाहतूक आणि सहकार मंत्रालय मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले. वैकुंठ मेहता संस्थेत पदवीप्रदान सोहळा उत्साहात पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

सहकार क्षेत्राचा डेटाबेस तयार करण्यावर अधिक भर दिला जाणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, याबाबतची संकलित माहिती कोठेही उपलब्ध नाही, म्हणून डेटाबेस तयार करण्याची गरज आहे. सहकारी संस्थांसाठी उपविधी तयार करणे, विकास सोसायट्यांचे संगणकीकरण आणि खाद्यान्न गोदामांची संख्या वाढविणे आदी बाबींचा समावेश आहे. भविष्यकाळात कृषी आणि सहकार क्षेत्रात मोठी क्रांती होणार असून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. रिकाम्या हाताला काम आणि प्रत्येकाला रोजगार मिळणार असून या क्षेत्रात मोठी क्रांती घडेल, असे सूतोवाच त्यांनी केले.

वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंटचा पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा - कृषी व्यवसाय आणि व्यवस्थापन (२०२२-२०२४) सालाच्या ३० व्या तुकडीचा दीक्षांत समारंभ पार पडला. राज्यमंत्री मोहोळ व वैमनिकॉमच्या संचालिका डॉ. हेमा यादव यांच्या हस्ते दीक्षांत समारंभात २०२४मध्ये पदवीधर झालेल्या ९६ विद्यार्थ्यांना व्यवस्थापन-कृषी व्यवसाय आणि व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदविका प्रदान करण्यात आली.

अभ्यासक्रमातून पदवीधर झालेल्या तरुणांना कृषी व्यवसाय आणि सहकार क्षेत्रात यशस्वी करिअर मिळेल. सहकार क्षेत्र हे जगातील सर्वात मोठे क्षेत्र आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. भारतात ८.५ लाखांहून अधिक सहकारी संस्था आहेत. ज्यांचे २९ कोटी सदस्य आहेत. हे लक्षात घेऊन सरकारने ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट आणि सक्षम करण्यासाठी स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली आहे. ग्रामीण भागाचा विकास करणे आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांना सहकाराच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट आहे.

डॉ. यादव म्हणाल्या वैमनिकॉम शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे मुलींच्या शिक्षण आणि महिला प्रशिक्षणाला प्रोत्साहन देत आहे. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील सरकारी संस्थांमध्ये आणि देशभरातील आघाडीच्या २५ बी-स्कूलमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनंतर भारत सरकार पीजीडीएम-एबीएमच्या विद्यार्थ्यांना २ लाख रुपयांची शिष्यवृत्ती देत आहे.

# ‘अष्टावधानी बँकिंग’ पुस्तकाचे प्रकाशन येत्या दि. ५ ऑगस्ट रोजी

**पुणे –** बँकिंग तज्ञ आणि सल्लागार गणेश रामचंद्र निमकर लिखित ‘अष्टावधानी बँकिंग’ या पुस्तकाचे प्रकाशन येत्या दि. ५ औगस्ट रोजी होत आहे. येथील अनुनाद प्रकाशनाच्या वतीने पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे.

या पुस्तकासाठी जेष्ठ बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर, राज्य सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष काका कोयटे, माजी सहकार आयुक्त आणि राज्य निवडणूक प्राधिकरण अध्यक्ष अनिल कवडे, सहकार खात्याचे वरिष्ठ अधिकारी शैलेश कोतमिरे, बुलढाणा अर्बनचे शिरीष देशपांडे यांनी पुस्तकासाठी अभिप्राय दिले आहेत. या पुस्तकाच्या माध्यमातून सभा व्यवस्थापन, इतिवृत्त, भांडवल उभारणी, कर्जमंजुरी वितरण अंतर्गत नियंत्रण, व्यवसाय आणि ग्राहक वृद्धी आदी विषयांची मांडणी करण्यात आली आहे.

मागील पानावरून...

# भारताच्या नवआकांक्षांना बळ देणारा अर्थसंकल्प

येणार आहे. बिहारमधील नालंदा विद्यापीठही पर्यटनक्षेत्र करण्याचे प्रस्तावित आहे. गावोगावी एकूण १०० पोस्टाच्या बँका उघडण्याचेही सरकारच्या विचाराधीन आहे.

१०० शहरांत स्वच्छ पाणी योजना देण्याचेही मोदी सरकारने घोषित केले आहे. म्हणजे गेली कित्येक वर्षे या शहरांतील लोक अस्वच्छ पाणी पीत आहेत. स्वातंत्र्याला. ७७ वर्षे झालेल्या देशाला ही तरतूद करावी लागावी, हे दुर्दैवीच. ११ लाख, ११ हजार कोटी रुपयांची तरतूद पायाभूत सुविधानिर्मितीसाठी करण्यात येणार आहे. १०० शहरांत ‘स्ट्रीट मार्केट’ सुरू करणे प्रस्तावित आहे, हे होणे गरजेचे आहे. नुकतेच न्यायालयाने फेरीवाल्यांबाबत मुंबई महानगरपालिका व पोलीस खाते यांना चांगलेच शाब्दिक फटके दिले. ‘पीएम ग्राम सडक योजने’चा चौथा टप्पा या आर्थिक वर्षात राबविण्याचा सरकारचा प्रयत्न राहणार आहे. यातून २५ हजार गावे पक्क्या रस्त्यांना जोडली जाणार आहेत. ‘पीएम ग्राम उन्नत योजना’ ही राबविली जाणार आहे. भारतातील कित्येक खेडी बघितली की मनात असा विचार येतो की, ही खेडी उन्नत होतील की नाही? राज्यांना १५ वर्षांसाठी बिनव्याजी कर्ज देण्याचाही प्रस्ताव आहे.

*** आवास योजना –** ‘पीएम आवास योजना’ जी गेली कित्येक वर्षे या देशात सुरू आहे, त्यासाठी या आर्थिक वर्षात दहा कोटी रुपयांचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. शहरी भागात एक लाख घरे बांधण्याचा प्रस्ताव आहे. शहरी गरिबांच्या निवासाची काळजीही या अर्थसंकल्पात घेण्यात आली आहे. ३० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी ही योजना असून, यासाठी अर्थसंकल्पात २.२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एक कोटी घरांसाठी सौरऊर्जा पुरविण्याचेही प्रस्तावित आहे.

**– शशांक गुळगुळे** *****

# शाश्वत विकासासाठी प्राचार्य राजाभाऊ धाट यांचे मौलिक कार्य -सतीश मराठे




**अंबेजोगाई –** विद्यार्थी परिषद व सहकार भारती यांच्या उभारणीत तसेच ग्रामीण भागात शेती, बँक, संशोधन, विकास सोसायटीच्या माध्यमातून शाश्वत विकासासाठी प्राचार्य राजाभाऊ धाट यांनी केलेले कार्य मौलिक आहे, असे सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.

विद्यार्थीप्रिय आणि प्रयोगशील प्राचार्य म्हणून ज्यांचा नांवलौकिक असून ज्यांनी शिक्षणासोबतच वित्त, ग्रामीण आणि कृषी विकास, अ.भा.वि.प. सहकार भारती अशा विविध क्षेत्रातील संस्था आणि सेवाकार्याच्या उभारणीत तसेच विकास कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्या प्राचार्य राजाभाऊ धाट यांच्या कार्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्राचार्य धाट यांचे चाहते, विद्यार्थी, कुटुंबीय व विविध क्षेत्रातील सहकारी यांनी समारोह समितीच्या माध्यमातून सहस्त्रचंद्रदर्शन समारोहाचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय संघटनमंत्री सूर्यकांत केळकर होते. व्यासपीठावर संचालक सतीश मराठे हे प्रमुख अतिथी आणि गौरवमूर्ती प्राचार्य राजाभाऊ धाट, सुलभा धाट, वसंतराव देशमुख, प्रा. डॉ. शरदराव हेबाळकर, डॉ.अ.द.पत्की उपस्थित होते. धाट दांपत्याचा सन्मानपत्र, पुष्पगुच्छ, शाल, भेट वस्तू आणि चित्रकार उमेश डोंगे यांनी काढलेले अप्रतिम रेखाचित्र भेट देऊन हृद्य सत्कार करण्यात आला.

**⁕ विरोधी विचारांच्या कार्यकर्त्यांशी मैत्री जोपासली –** सत्काराला उत्तर देताना प्राचार्य राजाभाऊ धाट यांनी क्षीरसागर यांच्यामुळे घडलो. भाशिप्र, दीनदयाळ बँक, दीनदयाळ शोध संस्थान, वृद्धांसाठी प्रकल्प उभारणी, संघ परिवार, विद्यार्थी परिषद, सहकार भारती याद्वारे देशभक्ती व संस्कार समाजात पुढे नेला. समाजात एकोपा वाढीस लागावा म्हणून प्रसंगी विरोधी विचारांच्या कार्यकर्त्यांशी मैत्री जोपासली. सत्कार केल्याबद्दल संयोजन समिती व उपस्थितांचे त्यांनी आभार मानले.

दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने अध्यक्ष मकरंद पत्की, सर्व संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांनीही सत्कार केला. प्रास्ताविक संयोजन समितीचे डॉ. अ. द. पत्की तर मानपत्राचे वाचन अभिजीत जोंधळे यांनी केले. सन्मानपत्राचे लेखन प्रा. शाम बारडकर व प्रा. दत्तप्रसाद गोस्वामी यांनी केले. प्राचार्य धाट यांचे विषयी बोलताना प्रा. डॉ. हेबाळकर यांनी ऋग्वेदातील संदर्भ देत आजच्या सहस्त्रचंद्र दर्शन समारोहाचे सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या मोठे महत्त्व आणि उपयोगिता नमूद केले आणि सहस्त्रचंद्रदर्शन समारोह करण्यामागील उद्देश सांगितला.

**⁕ समाजासाठी अध्यापन केले –** वसंतराव देशमुख यांनी संघ परिवार, विद्यार्थी परिषद, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था आणि सहकार भारतीच्या माध्यमातून प्राचार्य धाट यांनी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. अध्यक्षीय समारोप करताना केळकर यांनी सांगितले की, प्राचार्य धाट यांनी समाजासाठी नि:स्वार्थ, समर्पण भावनेतून अध्ययन व अध्यापन केले. त्यांनी केलेले सातत्यपूर्ण परीश्रम, ध्यासपूर्ण कार्याचा हा गौरव आहे. धाट यांनी समाजकार्य हा यज्ञ आरंभला. आजच्या काळात समर्पित भावनेतून समाजकार्य करणाऱ्या प्राचार्य धाट यांचा सत्कार होणे ही अभिनंदनिय बाब आहे. यावेळी प्राचार्य धाट यांच्या जीवनकार्याचा परीचय करून देणाऱ्या प्राजक्त गौरवग्रंथाचे विमोचन करण्यात आले.

गौरवग्रंथात ९ विभागात ६२ वाचनीय लेख आहेत. गौरवग्रंथ १६८ पानांचा आहे. ज्यात सचित्र वृत्तांत आहे. गौरवग्रंथाचे संपादन प्रा. सतिश हिवरेकर, प्रा. शाम बारडकर, प्रा. दत्तप्रसाद गोस्वामी, प्रा. डॉ. दिगंबर मुडेगावकर श्रीकांत देशपांडे यांनी केले. यासाठी माणिक जैन यांचे मोठे सहकार्य लाभले. पहिल्या सत्राचे उद्घाटन दीपप्रज्ज्वलन आणि भारतमातेच्या प्रतिमापूजनाने करण्यात आले.

सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. सतिश पत्की हे होते. पहिल्या सत्रात मला भावलेले धाट सर या विषयावर ॲड. किशोर गिरवलकर, संजय सराफ, प्रा. प्रदीप रत्नपारखी, विष्णु बोबडे, गिरीश कऱ्हाडे, महेश वैद्य, रजनी सोनवळकर, रमेश पांडव, उन्मेष मातेकर, भगवानराव शिंदे, भक्तराम हळबे, सुजाता धाट, निवृत्ती दराडे, डॉ. गोपाळ चौसाळकर यांनी धाट सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू, भूमिका, स्वभाव वैशिष्ट्ये, कार्यकर्तृत्व उलगडून दाखवत स्वानुभव कथन केले. सत्राचा समारोप प्रा. सतिश पत्की यांनी केला.

कार्यक्रमास विष्णू बोबडे (ठाणे), नंदू पावगी (पालघर), गणेश गाडगीळ (सांगली), उमेश कुलकर्णी यांचे स्वागत करण्यात आले. चित्रकार उमेश डोंगे यांनी काढलेली रांगोळी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

प्रथम सत्राचे सूत्रसंचालन प्रा. शाम बारडकर यांनी केले. तर आभार संकेत धाट यांनी मानले. संघ परिवार, विद्यार्थी परिषद, सहकार भारती, भाशिप्र संस्था, दीनदयाळ बँक, दीनदयाळ शोध संस्थान यांच्यासह विविध प्रकोष्ठ यांच्याशी निगडित कार्यकर्ते, स्वयंसेवक, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, माजी नगराध्यक्ष महादू मस्के, डॉ. सुरेंद्र आलुरकर, डॉ. नरेंद्र काळे, पंजाबराव मस्के, राम कुलकर्णी, महेंद्र निकाळजे आदींसह शिक्षण, समाजकारण, सहकार, अर्थ, वैद्यकीय, पत्रकारिता, विधी, व्यापार, कृषी, सांस्कृतिक, संगीत, क्रीडा आदी क्षेत्रातील माजी विद्यार्थी, सहकारी, नातेवाईक, स्नेही उपस्थित होते.

वैयक्तिक पद्य विश्वजीत धाट यांनी तर आभार समीर धाट यांनी मानले. कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बँक राष्ट्रीयीकरण- एक पुनरावलोकन

बँक राष्ट्रीयीकरणास ५५ वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्यानंतर बँकिंग क्षेत्रातील फार मोठा निर्णय तत्कालीन गांधी सरकारने घेतला. तो म्हणजे दि. १९ जुलै १९६९ रोजी देशातील प्रमुख १४ खाजगी क्षेत्रातील बँकांचे राष्ट्रीयीकरण म्हणजे सरकारीकरण केले.

सरकारचे असे ठाम मत झाले की, बँका या ठराविक श्रीमंतांचे आर्थिक हित पाहत आहेत. खेड्यापाड्यातील गरीब व छोट्या शेतकऱ्यांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचतच नाहीत. त्याचे लाभापासून तो वर्ग सतत वंचित राहत आहे. खासगी बँका खेडेगावात जात नाहीत. त्यामुळे गरीब व छोटे शेतकरी सावकारी पाशात अडकत आहेत. मूठभर श्रीमंत लोक बँकिंग क्षेत्राचे मालक आणि उपभोक्ते झाले आहेत. गरीब अधिकच गरीब होतो आहे. गरिबी हटाव हा प्रमुख कार्यक्रम घेऊन इंदिरा सरकारने बँकांचे राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेतला. प्रथम प्रमुख १४ खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले गेले आणि त्या धर्तीवर आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयीकरण केले गेले.



**अविनाश जोशी**
**९८१९३ २९७५०**

दोन्ही वेळच्या राष्ट्रीयीकरणामुळे बँकिंगचे बदलते स्वरूप, त्यांचे बरे वाईट परिणाम, त्यांचा हेतू खरोखर साध्य झाला का, आणि या पार्श्वभूमीवर आजपर्यंत हे बदल का टिकू शकले नाहीत, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. खरंच राष्ट्रीयीकरण यशस्वी झाले असे मानले तर आपण काहीशी विपरीत परिस्थिती बँकिंग क्षेत्रात अनुभवतो आहोत. खासगी मालकीच्या बँकांचे सरकारीकरण म्हणजे राष्ट्रीयीकरण झाले. सन १९९१ साली खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणाची अंमलबजावणी करत असताना त्यावेळच्या सरकारने पुन्हा खासगीकरणाला महत्त्व दिले. आता पुन्हा भारतीय रिझर्व बँकेने भांडवली पाया मोठा असलेल्या आणि प्रगत माहिती तंत्रज्ञानावर आधारित काम करणाऱ्या खासगी बँकांना लायसन्स दिली आहेत.

या बँका टेक्नॉलॉजीचा वापर करून ग्राहकांना विशेषतः तरुण ग्राहकांना आकर्षित करत आहेत. म्हणजेच हे सर्व घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याचा प्रकार आहे. आपण पैशाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी उद्योगपतींच्या हातून बँकिंग व्यवस्था काढून घेऊन सामान्य गरीब शेतकरी, कष्टकरी यांचे फायद्यासाठी राष्ट्रीय करणाचे पाऊल उचलले. मात्र आज पुन्हा मोठे उद्योगपतीच खासगी बँका काढताना दिसत आहेत.




बँक राष्ट्रीयीकरणाची प्रमुख उद्दिष्टे जर पाहिली तर सामाजिक कल्याण, गरीब, गरजू शेतकरी, कष्टकरी यांना पत मिळवून देणे. मोठमोठ्या उद्योगपतींच्या हाती एकवटलेले आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करणे, बँकिंग सेवा तळागाळातील गरिबांपर्यंत पोहोचविणे, यासाठी बँकिंग शाखांचे जाळे खेडेगावापर्यंत नेणे. यांतून सामाजिक असमतोल कमी करणे, शेती, लघु उद्योग यासारख्या क्षेत्रातील उद्योगांना अर्थपुरवठा जलद गतीने करणे. सामान्य लोकांना बचतीची सवय लावणे, गरीब कुटुंबे, शेतकरी, कष्टकरी समाजाची सावकारी पाशातून मुक्तता करणे. सरकारी नियंत्रणे, लायसन्स राज वगैरे कमी करून उपेक्षित समाजातील लोकांना पत उपलब्ध करून देणे, हेच उद्दिष्ट राष्ट्रीयीकरण करण्यामागे होते. मात्र आता हे धोरण राबवत असताना सरकारी बँकांत ग्राहक सेवेचा दर्जा घसरू लागला. नोकरशाहीची अरेरावी, राजकीय हस्तक्षेप, व्यावसायिकतेचा अभाव या गोष्टी बँकिंगमध्ये प्रकर्षाने जाणवू लागल्या आहेत. बँकांची नफाक्षमता कमी होऊन अनुत्पादक कर्जात वाढ दिसून येत आहे. तोटे असूनही काही प्रमाणात वर दिलेली उद्दिष्टे पूर्ण झाली आहेत. शाखा विस्तार खेडेगावापर्यंत झाला. अग्रक्रम क्षेत्रास पतपुरवठा उपलब्ध झाला, हे मान्य करावे लागेल.

बँक राष्ट्रीयीकरणबाबत त्यांवेळच्या मंत्रिमंडळातील अर्थमंत्री मोरारजी देसाई यांनी काही मुद्द्यावर फेरविचाराची कल्पनाही मांडली. मात्र सरकारने वटहूकूम काढून हा निर्णय अंमलात आणला. त्यात दोन मतभेदाचे मुद्दे होते. एक म्हणजे खासगीकरण करून बँका सरकारने ताब्यात / विकत घ्याव्यात, हे काहींना मान्य नव्हते आणि संसदेस असा अधिकार आहे काय याविषयीसुद्धा दुमत होते. त्याचबरोबर खासगी बँकांचे मालक सरकार देत असलेल्या नुकसान भरपाईस राजी नव्हते. काही तरतुदी घटनाबाह्य आहेत, म्हणून रद्द करण्याची मागणी केली गेली. केंद्र सरकारने बँक राष्ट्रीय करण्याबाबत दुसरा वटहुकूम काढला. आणि तो पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच लागू असल्याचे जाहीर केले.

पुन्हा बँकांची संख्या एकत्रीकरणाने किंवा विलीनीकरणाच्या माध्यमातून कमी करणे, त्यांना खाजगी नव्या बँकांशी स्पर्धा करून, राष्ट्रीयीकृत बँकानी बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तत्पर व विनम्र ग्राहक सेवा यांचा अंगीकार करणे, राष्ट्रीयीकृत बँकांसाठी आवश्यक झाले असून तशी सुधारणा त्यांचे कार्यपद्धतीत हळुहळू दिसू लागली आहे. मार्च २३च्या आकडेवारीनुसार सर्व राष्ट्रीयीकृत बँका नफ्यांमध्ये आल्या आहेत. थकीत कर्जांचे प्रमाणही कमी झाले आहे.

मार्च २३ अखेर ग्रॉस एनपीए ३.९ टक्के असून नेट एनपीए केवळ एक टक्का आहे. कर्ज वसुलीचे प्रमाण चांगले झाल्यानेच हे शक्य झाले आहे, असे आकडेवारी वरुण दिसून येते. राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांची संख्या आज १२ वर आली आहे. त्यांचे कार्य तत्परतेत खाजगी बँकांचे स्पर्धेमुळे सुधारणा झाली आहे, यात शंका नाही. परंतु हेही सत्य आहे की, घड्याळाचे काटे पुन्हा उलटे फिरू लागले आहेत. खासगीकरणाचे महत्त्व त्यामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. रिझर्व बँकेने खाजगी क्षेत्रात एचडीएफसी, आयसीआयसीआय, कोटक महिंद्रा, येस यांसारख्या बँकांना त्याचबरोबर स्मॉल फायनान्स पेमेंट बँकांना नवे तंत्रज्ञान आणि भक्कम भांडवली पाया देऊन स्पर्धेत उतरवले आहे. या सर्व बँका पुन्हा मोठमोठ्या उद्योगसमूहांनी सुरू केलेल्या बँका आहेत. थोडक्यात राष्ट्रीयीकरण ऐवजी पुन्हा खासगीकरणाच्या दिशेने बँकिंगचा प्रवास सुरू झाला आहे.

सप्टेंबर २०२०मधील बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमध्ये झालेल्या सुधारणांमुळे रिझर्व बँकेस खूपच अधिकार मिळाले आहेत. टेक्नॉलॉजी, संगणकीकरण यांमुळे सायबर सिक्युरिटीचे धोके वाढले आहेत. कॅशलेस, डिजिटल बँकिंग, आभाशी चलनाचा वाढता वापर, सीबीडीसी नावाने रिझर्व बँकेचे मान्यता प्राप्त चलनातून आता व्यवहार वाढत आहेत. जोखीम व्यवस्थापन यास अधिकाधिक महत्त्व रिझर्व बँक देत आहे. खरे तर आजचा ग्राहक आणि विलफूल डिफॉल्टर ही मोठी रिस्क बनली आहे. त्यामुळे तळागाळातील सर्वसामान्य गरीब लोकांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी निर्माण

**पुढील पानावर...**

# सहकार भारती प्रदेश अधिवेशन २१-२२ सप्टेंबर रोजी शिर्डी येथे होणार

**पुणे** – सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे त्रैवार्षिक अधिवेशन शनिवार दि. २१ सप्टेंबर व रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी शिर्डी येथे होत असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेशाचे महामंत्री विवेक जुगादे यांनी सांगितली. या अधिवेशनामध्ये महाराष्ट्रातील ३६ जिल्हे व ३०० तालुक्यांमधून सुमारे १००० च्या वर सहकार भारतीचे क्रियाशील कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

हे अधिवेशन केवळ सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांसाठीच असून अधिवेशन शुल्क प्रति कार्यकर्ता केवळ रु. ३००/- आहे. अधिवेशनाचे उद्घाटन शनिवार दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता होणार असून अधिवेशनाचा समारोप रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता होणार आहे. अधिवेशनस्थळी निवासाची व्यवस्था शुक्रवार दि. २० सप्टेंबर रात्रीपासून उपलब्ध राहील. अधिवेशनाचे स्थान साई पालखी निवारा हे असून शिर्डी बस स्टँड तसेच रेल्वे स्टेशनपासून केवळ १० मिनिटांच्या अंतरावर आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील अध्यक्ष, महामंत्री व संघटनप्रमुख यांना आवाहन करण्यात येते की, या अधिवेशनामध्ये अपेक्षित कार्यकर्त्यांची सूची रुपये ३००/- शुल्कासह लवकरात लवकर प्रदेश कार्यालयाला sbmaharashtra@gmail.com या ईमेल आयडीवर मेल करावी. जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांचे एकत्रित शुल्क नोंदणी फॉर्मवर दिलेल्या प्रदेश अधिवेशनाच्या बँक खात्यात जमा करावे. तसेच प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन यांना मो. ९२२५८२५३९९ या क्रमांकावर संपर्क साधून जिल्ह्याची नोंदणी झाल्याची खात्री करून घ्यावी असेही आवाहन करण्यात आले आहे.

या अधिवेशनाला केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा, सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आमंत्रित केले जाणार आहे. या अधिवेशनात राज्याच्या सहकार चळवळीबाबत विचारमंथन होणार असून नागरी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, मत्स्य संस्था, दूध डेअरी तसेच विविध कार्यकारी सोसायट्या संदर्भातील अडचणींवर तज्ञ व अनुभवी मार्गदर्शकांचे विचार ऐकायला मिळणार आहेत. तसेच विविध मुद्द्यांवर ठराव मांडण्यात येणार असून यासाठी सहकार आयुक्त व त्यांच्या कार्यालयातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना या अधिवेशनात विशेष अतिथी म्हणून बोलावण्यात येणार आहे.

सहकार भारतीच्या प्रदेश अधिवेशनात सहकारातील ज्येष्ठ कार्यकर्त्याला स्व. अण्णासाहेब गोडबोले स्मृती पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या अधिवेशनात सहकार महर्षी ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

याआधीचे प्रदेश अधिवेशन श्रीक्षेत्र आळंदी येथे २-३ ऑक्टोबर २०२१ रोजी घेण्यात आले होते. या अधिवेशनात सहकारातील ज्येष्ठ कार्यकर्ते हरिभाऊ बागडे यांना स्व. अण्णासाहेब गोडबोले स्मृती पुरस्कार देऊन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरविण्यात आले होते. आळंदी येथील या अधिवेशनात सहकार महर्षी ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. या अधिवेशनात डॉ. शशीताई अहिरे यांची प्रदेश अध्यक्षपदी तर विवेक जुगादे यांची प्रदेश महामंत्रीपदी निवड करण्यात आली होती.

**मागील पानावरून...**

## बँक राष्ट्रीयीकरण- एक पुनरावलोकन

केलेले राष्ट्रीयीकरण धोरण खरंच आजही आवश्यक आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

यापुढे नव्या सुधारणा या निश्चितच नव्या बँकिंगचे रूपाने तरुण पिढी आणि सामान्य गरीब लोकसुद्धा स्वीकारून भारताचे आर्थिक प्रगतीस हातभार लावतील, बँक राष्ट्रीयीकरणाचे पुनरावलोकन करताना एवढेच म्हणावेसे वाटते की, त्या काळात असलेल्या सामाजिक परिस्थितीमध्ये, त्यावेळच्या सरकारला हा निर्णय काळाची गरज म्हणून आवश्यक वाटला ही असेल आणि त्याचे फायदे निश्चितच मिळाले असतील. परंतु आज बँकिंग व्यवसाय व्यवस्थाच बदलली आहे. नवीन सामाजिक गरजा, उद्योगधंद्याची वाढ, आयटी क्षेत्रातील क्रांती याचा विचार करता, आज झालेले बदल स्वीकारणे अपरिहार्य आहेत. बदलते बँकिंग याची काळजी घेत आहे. मोबाईल बँकिंग, कॅशलेस, फेसलेस बँकिंग, डिजिटल, इंटरनेट बँकिंग ही आजच्या काळाची गरज आहे.

विशेषतः तरुण पिढीची ती गरज आहे. या पार्श्वभूमीवर आज जरी भारतीय रिझर्व बँकेचे नियंत्रण, सुपरव्हिजन, रेग्युलेशन हे जरी कडक वाटत असले, तरी सशक्त आणि सुदृढ बँकिंग व्यवस्था ठेवण्यासाठी ते आवश्यक आहे. देशाची आर्थिक प्रगती होऊन देश एक भक्कम अर्थव्यवस्था असलेला प्रगत देश म्हणून जगात नावारूपाला येईल.

**– अविनाश जोशी, मो. – ९८१९३ २९७५०**
**निवृत्त रिझर्व बँक अधिकारी,**
**बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य, वाई अर्बन बँक.**

*******



# व्यापारी क्षेत्रात मत्स्य व्यवसायास रोजगाराच्या संधी -ॲड. सुभाष मोहिते



**पुणे –** मत्स्य व्यवसाय हा पारंपारिक व्यवसाय असला तरीही अनेक वैशिष्ट्यांमुळे व आधुनिक तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे या व्यवसायास महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यापारी पद्धतीने मत्स्य व्यवसाय केल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, असे पुणे बँक असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुधीर मोहिते यांनी सांगितले.

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनांतर्गत लक्ष्मणराव इनामदार नॅशनल ॲकॅडमी फॉर को-ऑपरेटिव्ह रिसर्च ॲंड डेव्हलपमेंट (लिनॅक), प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, एनसीडीसी, सहकार मंत्रालय आणि मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मत्स्य व्यवसाय उत्पादक सहकारी संस्था बळकट करण्यासाठी मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांचा अभिमुखता कार्यक्रमात ते बोलत होते.

मत्स्य व्यवसाय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त विजय शिखरे, सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त अर्चना शिंदे आणि सहाय्यक निबंधक सुधीर खंबायत उपस्थित होते.

ॲड. मोहिते यांनी मच्छिमारांच्या उत्थानासाठी प्रकारचे प्रशिक्षण आणि विविध सहकारी क्षेत्रातील योजनांचे महत्त्व सांगितले. मत्स्य व्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी राज्य शासनाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले. शेती व्यवसायासोबत मत्स्य व्यवसाय हा पूरक व्यवसाय केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. यामध्ये लहान व मोठ्या धरणामध्ये मत्स्यसंवर्धन, मत्स्य बीज पुरविणे, मत्स्य तलावातील शोभिवंत मास्यांचे संर्वधन, मत्स्यटाकी बनविणे आणि विकणे, मुल्यवर्धित मत्स्यपदार्थ तयार करणे व विकणे, शास्त्रोक्त पद्धतीने मत्स्य खाद्य निर्मिती व जिवंत मासे विक्री केंद्रासारखे व्यवसाय करू शकतात. एनसीडीसीच्या अधिकाऱ्यांनी विविध योजनांची माहिती सांगितली. योजना अधिकारी सुरभी मेश्राम यांनी केंद्रीय योजना माहिती सांगितली.

# सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी सहकार भारतीच्या वतीने मार्गदर्शनाचा उपक्रम

**पुणे –** सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी, सदस्य व सभासद यांना संस्थेचे कामकाज कायदेशीर पद्धतीने चालविण्याचे दृष्टीने सहकार भारती संस्थेच्या पुणे महानगर शाखेच्या वतीने दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी संस्था कार्यालयात मोफत मार्गदर्शन सहकार संवाद सेतू या उपक्रमांतर्गत करण्यात येते.

सकाळी अकरा ते दुपारी एक या वेळेत संस्थेचे साकला आर्केड, पहिला मजला, एसएनडीटी शेजारी, कर्वे रोड कार्यालयात मार्गदर्शन करण्यात येते. पुणे जिल्ह्यामध्ये बावीस हजाराहून अधिक सहकारी गृहनिर्माण संस्था असून दिवसेंदिवस त्यामध्ये वाढ होत आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० अंतर्गत नोंदविण्यात येत असल्याने त्या सर्व संस्थांना सहकार कायदा व अधिनियम लागू असतो. या गृहनिर्माण संस्थांचे कामकाज सहकार कायदा व आदर्श उपविधीस अनुसरून चालणे आवश्यक आहे.

संस्था नोंदणी, कन्व्हेअन्स, वैधानिक लेखापरिक्षण, निवडणूक, थकबाकी वसुली, इमारतींचा पुनर्विकास, कायदे विषयक बाबी आदी विषयांवर माहिती दिली जाते. संस्थेचे विधी प्रकोष्ठ डॉ. वैशाली राणा, गृहनिर्माण प्रकोष्ठ शिरीष बोराळकर, सहप्रकोष्ठ प्रकाश पटवर्धन, साखर कारखाना प्रकोष्ठ व निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी साहेबराव खामकर मार्गदर्शन करतात.

गृहनिर्माण संस्थांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन व पुणे महानगरप्रमुख गिरीश भवाळकर यांनी केले आहे.

# खरीप हंगामासाठी पुणे जिल्हा सहकारी बँकेचे कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण

**पुणे –** खरीप हंगामासाठी पुणे जिल्हा सहकारी बँकेने कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे अशी माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी सांगितली. ते म्हणाले, कर्ज वाटपाचे २ हजार ५६ कोटी २८ लाख रुपये वाटपाचे उद्दीष्ट नक्की करण्यात आले होते. त्यातील म्हणजेच चार महिन्यात कर्ज वाटपाच्या एकूण उद्दिष्टाच्या १०१.७२ टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे. जिल्ह्यातील सर्व शाखांच्या माध्यमातून पीक कर्जाची उपलब्धता करण्यात आली आहे.

जिल्ह्यात शेतकऱ्यांची संख्या ५ लाखापेक्षा अधिक असून त्यातील प्रत्यक्ष बँक खातेदार ३ लाखांपेक्षा अधिक आहे. जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात सर्वाधिक म्हणजेच ३०० कोटी कर्जवाटप करण्यात आले आहे. आजवर जिल्ह्यातील सुमारे २ लाख १४ हजार ८६४ शेतकऱ्यांना पीक कर्जाची उपलब्धता करण्यात आली असून कर्ज वाटपाची व्यवस्था विकास सोसायटीच्या माध्यमातून करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

# विश्वेश्वर सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी अनिल गाढवे

**पुणे –** विश्वेश्वर सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी अनिल गाढवे आणि उपाध्यक्षपदी राजेंद्र मिरजे यांची निवड करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाची सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला. बँकेचा एकूण व्यवसाय ३५५० कोटी असून तो पांच हजार कोटींपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. ग्राहकांना डिजिटल सुविधा उपलब्ध करून देण्यावर बँकेचा भर असणार आहे असे अध्यक्ष गाढवे यांनी सांगितले.

# सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध

**सोलापूर –** जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली आहे. २१ जागांसाठी तितकेच उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणूक बिनविरोध झाली. अशी माहिती फेडरेशन अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी सांगितली. नूतन संचालकांमध्ये दिलीप पतंगे, श्रीशैल बनशेट्टी, मल्लिकार्जुन केंदळे, इंद्रजीत पवार, रंगनाथ गुरव, राजेंद्र कुलकर्णी, मुरलीधर चव्हाण, राजेश फडकुले, चंद्रकांत रमणशेट्टी, यांच्यासह अन्य सदस्य विजयी झाले आहेत.

# मोठ्या पतसंस्थांचे नागरी सहकारी बँकांमध्ये रूपांतर करणे अपरिहार्यः सहकार भारती राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी



**रायगड –** पतसंस्थांच्या ठेवीसाठी बँकांप्रमाणे ठेव विम्याचे संरक्षण द्यावे अशी मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या सहकार विभागाने रिझर्व बँकेसमोर प्रस्ताव ठेवला असून ज्या पतसंस्था नागरी सहकारी बँकेच्या प्रवेशाचे निकष पूर्ण करतील, त्यांना रिझर्व बँकेने बँक परवाने द्यावेत असे मत सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी यांनी व्यक्त केले.

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाच्या वतीने आयोजित रौप्यमहोत्सवी समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राज्य महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील, आमदार रविशेठ पाटील, महासंघाचे जिल्हा अध्यक्ष डॉ. जे. टी. पाटील, सचिव योगेश मगर, संचालक हेमंत पाटील, नरेन जाधव उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. पाटील यांनी सहकार चळवळ कोकणात खऱ्या अर्थाने रुजवावी, सर्वसामान्यांची आर्थिक गरज भागावी यासाठी २५ वर्षे महासंघ कार्यरत आहे असे सांगितले. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. सहकार भूषण पुरस्कार विजेते आदर्श पतसंस्था व देवेंद्रनाथ पतसंस्थेसह ७५ वर्षे वरील पतसंस्थांचा सन्मान करण्यात आला.

महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील म्हणाले की, सहकार खात्याकडून अंशदानासाठी जी पतसंस्थांकडे हजारी  १० पैसे मागणी होत आहे. ती पतसंस्थांना भविष्यात अडचणीची ठरणार आहे. येत्या ५ वर्षांत ५० टक्के पतसंस्था बंद पडतील अशी भीती त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात आमदार पाटील म्हणाले की, सर्वसामान्यांना राष्ट्रीय बँका कर्जासाठी जवळ करीत नाहीत. अशावेळेस पतसंस्था त्यांची पत निर्माण करून गरजेला उपयोगी पडते. पतसंस्थांनी वसुलीच्या बाबतीत ताठर भूमिका घेऊन सहकार क्षेत्र राजकारणापासून दूर ठेवावे असा सल्ला त्यांनी दिला. सूत्रसंचलन सचिव योगेश मगर यांनी केले.

## कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे प्रशिक्षण शिबिर यशस्वी

**अलिबाग –** येथील कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सेवकांसाठीच्या दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन आमदार प्रविण दरेकर यांचे हस्ते झाले. प्रशिक्षणासाठी सहकार कायद्यातील महत्त्वपूर्ण तरतुदी, एनपीए निकष व व्यवस्थापन, आधुनिक बँकिंग संकल्पना आणि कल्पना, पतसंस्था थकित कर्जवसुली तरतुदी आदी विविध विषयांवर वक्ते यांनी मार्गदर्शन केले  होते. समारोप प्रसंगी पतसंस्था व्यवहार आणि आव्हाने या विषयावर चर्चा झाली. चर्चासत्रात पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष तुळपुळे अध्यक्ष, संचालक, संस्थेचे वरिष्ठ अधिकारी व सेवक उपस्थित होते.

## जिल्हा माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी जानकीराम सपकाळे

**चोपडा, जळगाव –** जिल्हा माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी जानकीराम सपकाळे आणि सचिवपदी भावेश अहिरराव आणि खजिनदारपदी भगतसिंग पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहायक निबंधक विजय गवळी अध्यक्षस्थानी होते. पतसंस्थेचे अध्यक्ष शालिग्राम भिरुड तसेच संचालक व्यवस्थापक सुनील महाजन यावेळी उपस्थित होते.

# देवगिरी बँकेला ५० कोटींचा विक्रमी नफा सभासदांना १२% लाभांश जाहीर




**छत्रपती संभाजी नगर –** देवगिरी नागरी सहकारी बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ५० कोटींचा विक्रमी नफा मिळविला असून सदस्यांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. देवगिरी नागरी सहकारी बँकेची ४१वी वार्षिक सर्वसाधारण सभा येथे पार पडली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली. बँक अध्यक्ष किशोर शितोळे अध्यक्षस्थानी होते.

दहावी व बारावीतील गुणवंत पाल्य यांचा सन्मान यावेळी करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर यांनी स्वागत केले. भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून सभेस सुरुवात झाली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला.

बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी सादरीकरणाद्वारे, बँकेच्या प्रगतीची माहिती सांगितली. वाढत्या ठेवी, कर्जे, विक्रमी नफा, सीआरएआर, गुंतवणूक, निर्लेखित खात्यातील वसुली, नेट एनपीए, बँकेने राबविलेले विविध सामाजिक उपक्रम, नुकत्याच सुरू केलेल्या दोन नवीन शाखा, तसेच बँकेला मिळालेले विविध पुरस्कार इत्यादीचा समावेश होता.

उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक राजेश जैन, सजनराव मते, प्रशांत देशपांडे, सागर विध्वंस, नागनाथ काजळे, अमिता लेकुरवाळे, डॉ. प्रज्ञा तल्हार, सुरेश जगाडे, डॉ. सरदारसिंग बैनाडे, सीए अजिता पटेल यांच्यासह बँकेचे संस्थापक सदस्य व राज्याचे माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे व माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांची उपस्थिती होती.

मनोगत व्यक्त करतांना बागडे यांनी बँकेने केलेल्या प्रगतीचे कौतुक केले. बँक उल्लेखनीय प्रगती करत असून सहकार क्षेत्रात बँकेने आदर्शवत काम केले आहे. त्याबाबत संचालक मंडळाचे अभिनंदन केले. सभासदांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना व ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. नांदेडकर यांनी आभार मानले.

# भगिनी निवेदिता बँकेला ओरिसा सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट




**पुणे** – येथील भगिनी निवेदिता सहकारी बँकेला ओरिसा राज्याच्या सहकार विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधी मंडळाने नुकतीच सदिच्छा भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली.

प्रतिनिधी मंडळात ऑडिटर जनरल पी. के. पट्टनायक, सहकार खाते सहसचिव श्रीमती धरित्री मिश्रा, उपसचिव श्रीमती सुभद्रा पट्टनायक आदींचा समावेश होता. बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता देशपांडे यांनी स्वागत केले. बँक अध्यक्ष सीए डॉ. रेवती पैठणकर यांनी नागरी सहकारी बँकांसमोरील आव्हाने, वाढती स्पर्धा तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा दैनंदिन कामकाजात वापर सहकारी बँकांचा विस्तार याविषयी विवेचन केले.

तसेच बँक स्थापनेपासूनच्या वाटचालीची सविस्तर माहिती सांगितली. उपाध्यक्ष डॉ. नेत्रा आपटे यांनी आभार मानले. बँक संचालक आणि अधिकारी उपस्थित होते.

## श्री पंचगंगा नागरी सहकारी बँकेचा सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर

**कोल्हापूर** – श्री पंचगंगा नागरी सहकारी बँकेच्या विविध सेवा-योजनांचा सभासद आणि ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष राजाराम शिपुगडे यांनी केले. बँकेच्या ५३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वार्षिक सभेप्रसंगी ते बोलत होते. सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची घोषणा केली.

अध्यक्ष शिपुगडे यांनी बँकेच्या केलेल्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला. बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ३४७ कोटी ठेवी व २१२ कोटी कर्ज असा एकूण ५५९ कोटी रुपयांच्या मिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. बँकेने सातत्याने शून्य टक्के नेट एनपीए राखण्यात व ऑडिट वर्ग 'अ' ठेवण्यात यश संपादन केले आहे. ५३ वर्षांनंतर बँकेने विविध गरजू लोकांसाठी अनेकविध कर्ज योजना, अनेकविध ठेव योजना तसेच पासबुक प्रिंटर, एटीएम इतर संगणकीय व्यवस्था आणल्या आहेत.

अहवाल वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक फडणीस तर इतिवृत्त वाचन महाव्यवस्थापक सुशील कुलकर्णी यांनी केले. आभार उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र टोपकर यांनी मानले.

## फेडरेशनच्या माध्यमातून पतसंस्थांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यास प्राधान्य

**सोलापूर** – पतसंस्थांचे कवच या नात्याने फेडरेशन काम करीत असून फेडरेशनच्या माध्यमातून पतसंस्थांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यास प्राधान्य दिले जाईल, असे सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी येथे सांगितले. जागतिक सहकार दिनाच्या निमित्ताने मंगळवेढा येथील संत कान्होपात्रा महिला नागरी सहकारी बिगरशेती पतसंस्थेच्या वतीने सहकार दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्था संस्थापक सीमा भगरे होत्या.

ते पुढे म्हणाले, सहकाराच्या क्षेत्रात रोज बदल होत आहेत. त्याचा अंदाज घेऊन त्यानुसार आवश्यक ते बदल करण्याची मानसिकता असायला हवी. त्याचबरोबर संस्था संचालक यांनी प्रशिक्षणे, चर्चासत्रे, मेळावा यांचे आयोजन करण्याची गरज आहे. तसेच संस्थेचे कामकाज अधिकाधिक करण्यावर भर दिला पाहिजे, याबाबत नव्याने सुरू झालेल्या पतसंस्थांनी अधिक काळजी घेण्याची गरज आहे. कर्जवितरण करताना आवश्यक त्या बाबी तपासण्याची गरज आहे. यावेळी त्यांनी उपस्थित प्रश्नांना उत्तरे दिली.

सहकार भारतीचे माजी तालुका अध्यक्ष तात्या चव्हाण यांनी प्रास्ताविकात फेडरेशनच्या कार्याची माहिती सांगितली. आणि पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमास विविध पतसंस्थांचे पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

## जागतिक सहकार दिन आटपाडीत उत्साहात साजरा

**सातारा** – जागतिक सहकार दिन आटपाडीत येथे सिद्धनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था या संस्थेच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. सहकार भारती आटपाडी तालुका, सिद्धनाथ पतसंस्था आणि तालुका सचिव सेवक संघटनेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बँक ऑफ बडोदा शाखाधिकारी केतन भोईटे, सिद्धनाथ पतसंस्थेचे संचालक किशोर जाधव, मोहन ढगे, संजय गांधी निराधार समितीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब होनराव, सहकार भारतीचे जिल्हा महामंत्री सतीश भिंगे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब माळी उपस्थित होते. प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत गीत आणि सहकार गीत सहकार भारती सांगली जिल्हा पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख व आटपाडी तालुका सचिव सेवक संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय स्वामी यांनी सादर केले.

संत सावतामाळी पतसंस्थेचे सचिव तुकाराम जाधव यांनी प्रास्ताविक व पतसंस्थेचे सचिव महेश चांडवले यांनी स्वागत केले. सहकार भारतीच्या सदस्या सुमिता देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. वीरशैव पतसंस्थेचे सचिव प्रकाश शिंदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास चौंडेश्वरी पतसंस्थेचे सचिव बालक डोईफोडे, सिद्धिविनायक पतसंस्थेचे चंद्रकांत पोळ, सिरतुल पतसंस्थेचे सतीश साळुंखे, आटपाडी व्यापारी पतसंस्थेचे जीवन स्वामी, महात्मा फुले पतसंस्थेच्या सारिका चांडवले, विजयादेवी महिला पतसंस्थेच्या आस्मा वंजारी, आटपाडी अर्बन पतसंस्थेचे मनीषा बालटे, राजमाता अहिल्यादेवी पतसंस्थेचे विकास माळी, सिद्धनाथ पतसंस्थेचे नितीन खटावकर, संदेश रावण, सुनील कुंभार, सचिन जावीर उपस्थित होते.

## दि विश्वेश्वर सहकारी बँकेचा १० टक्के लाभांश जाहीर

**पुणे** – दि विश्वेश्वर सहकारी बँकेने सदस्यांसाठी १० टक्के लाभांश जाहीर केला आहे. तसेच नव्याने इंटरनेट बँकिंग सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे आणि त्याचा प्रारंभ बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते करण्यात आले. बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली.

बँक अध्यक्ष अनिल गाढवे यांनी सांगितले की, बँकेने जे उद्दिष्ट समोर ठेवले होते ते पूर्ण करण्यात यश मिळविले आहे व्यवसायात ६०० कोटींनी वाढ केली आहे. बँकेच्या ठेवी २१३९ कोटी झाल्या असून कर्ज वितरण १३४६ कोटी इतके झाले आहे. बँकेचा एकूण व्यवसाय ३४८५ कोटी झाला आहे असे त्यांनी सांगितले. उपाध्यक्ष श्रेयस रुकारी यांनी आभार मानले. बँक संचालक आणि अधिकारी सभेस उपस्थित होते.

# खासगी उद्योग समूहांना बँकिंग परवाने देण्याचे धोरण नाही - रिझर्व बँक ऑफ इंडिया

रिझर्व बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी खासगी उद्योग समूहांना बँकिंगचे परवाने देण्याचे सध्या धोरण नाही असे स्पष्ट केले आहे. एका वृत्तपत्राने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात त्यांनी मत व्यक्त केले. खासगी उद्योग समूहांनी बँकिंगच्या परवान्यासाठी यापूर्वी अर्ज केले होते, हे सर्व अर्ज धोरणात्मक कारणास्तव नाकारण्यात आलेले आहेत.

हा इतिहास आहे आणि गव्हर्नर यांनी याबाबतीत रिझर्व्ह बँकेचे धोरण या निमित्ताने स्पष्ट केले आहे. उद्योगांना बँकिंग चा परवाना दिल्यास बँकिंगमधील व्यवहार आणि उद्योगांमधील व्यवहार हे वेगळे करणे कठीण काम आहे, यात गुंतागुंत होऊ शकते.

उद्योग समूहांना बँकिंग व्यवसाय करण्यास परवानगी दिल्यास धोरणात्मक विरोधाभासाची (Conflict of Interest) शक्यता निर्माण होऊ शकेल. बँकिंग व्यवसायाची जोखीम यातून वाढण्याची भीती आहे, त्यामुळे उद्योगसमूहांना सध्या तरी बँकिंगचे परवाने देण्याचे धोरण नाही असे स्पष्ट केले आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने युनिव्हर्सल बँकिंग परवान्यासाठी OnTap धोरण बऱ्याच वर्षांपासून स्वीकारले आहे. या धोरणांतर्गत ज्यांना बँकिंग व्यवसाय सुरू करायचा आहे, त्यांनी रिझर्व बँकेच्या प्रचलित नियमानुसार अर्ज केल्यास, रिझर्व बँक त्याबाबत सकारात्मक विचार करून बँकिंग परवाना देण्याबाबत अंतिम विचार करू शकते. मागील दशकात अशी काही उदाहरणे आहेत. या On Tap धोरणाचा पुनरुच्चार करून गव्हर्नर यांनी उद्योग समूहांना बँकिंग परवाने दिल्यास त्यातील धोक्यांबाबत मत स्पष्ट केले आहे. जगभरामध्ये उद्योग समूहांना दिलेल्या बँकिंग परवान्याचा अनुभव फारसा चांगला नाही. या पार्श्वभूमीवर रिझर्व बँकेचे उद्योग समूहांना बँकिंग परवाना न देण्याचे धोरण अनुभवांती आणि त्यातील धोक्यांचा विचार करून तयार करण्यात आलेले आहे असे दिसते.

त्यांच्या मते सन १९६०च्या दशकात किंवा त्याआधी देशाने उद्योग समूहांच्या बँका या प्रकाराचा अनुभव घेतलेला आहे. मात्र १९ जुलै १९६९ म्हणजे बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर खासगी उद्योग समूह आणि बँका यांचा संबंध रिझर्व्ह बँकेकडून कायमचा तोडण्यात आलेला आहे. सन १९९० नंतर उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणाचा विचार करून नवीन बँकांना परवाने देण्यात आले होते. मात्र हे परवाने कोणत्याही उद्योगसमूहाच्या संदर्भातले नव्हते ही वस्तुस्थिती आहे.

सन २०२० या वर्षात रिझर्व बँकेच्या अंतर्गत कार्य गटाने (Internal Working Group) या विषयाबाबत पुन्हा नव्याने चर्चा सुरू केली होती, मात्र या प्रकारच्या चर्चांना आता पूर्णविराम दिलेला असून कोणत्याही उद्योगसमूहांना बँकिंगचे परवाने दिले जाणार नाहीत हे स्पष्ट केले आहे. अंतर्गत गटाच्या चर्चेमागे बँकिंगमध्ये नव्याने पुरेसे भांडवल यावे, अधिक बँका याव्यात हा उद्देश होता. मात्र माननीय गव्हर्नर यांनी बँकांची संख्या वाढवण्यात रिझर्व बँकेला फारसे स्वारस्य नसून बँकांनी नियमांच्या चौकटीत व्यवस्थित काम करावे हे अपेक्षित आहे. नियामक म्हणून हा निर्णय अत्यंत योग्य असून उद्योग आणि बँकिंग यांनी मालकीच्या निमित्ताने परस्परांत ढवळाढवळ करू नये हे स्पष्ट करणारा आहे. उद्योग समूहांचे स्वारस्य वेगळ्या प्रकारचे असू शकते, जे बँकिंगच्या नियमांच्या चौकटीत किंवा मार्गदर्शक तत्वांपासून वेगळे असू शकते.



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

उद्योग समूहांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बँकिंग आणि व्यावसायिक निर्णय वेगवेगळे करणे हे केवळ अशक्य ठरेल आणि त्यामुळे रिझर्व बँक ऑफ इंडियाने हा निर्णय घेतला असावा. उद्योग समूहाचे स्वारस्य आणि बँकिंगची तत्त्वे ही परस्परांशी मिळती जुळती असू शकणार नाहीत, असे केल्यास बँकिंग या व्यवसायावर त्याचा दुष्परिणाम होण्याची भीती आहे. याचा साकल्याने विचार करून रिझर्व बँक ऑफ इंडियाने हे धोरण निश्चित केले असावे. त्याच्या या स्पष्टोक्तीमुळे उद्योग समूहांनी बँकिंग व्यवसायात उतरण्याचा विचार करू नये हे इष्ट!

**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक देवगिरी बँकेचे माजी सीईओ असून, खामगाव अर्बन बँकेचे संचालक आहेत, बँकिंग या विषयाचे अभ्यासक आहेत.**


माणसांच्या मनांना विणणारी बँक
**कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.,**
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

शुभाशीर्वाद



आदरणीय कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा)
माजी खासदार व उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य

आमची प्रेरणा



आमदार प्रकाशआण्णा आवाडे
माजी वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य

चेअरमन



श्री. स्वप्निलदादा आवाडे

**बँकेच्या विविध कर्ज योजना**

- सावली गृह कर्ज योजना
- ॲग्री सावली कर्ज योजना
- शेती कर्ज योजना
- पुष्पक वाहन कर्ज योजना
- ज्ञानसाधना शैक्षणिक कर्ज योजना
- गृहसजावट कर्ज योजना
- डॉ.,सीए, इंजि. व्यावसाईक कर्ज योजना
- प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कर्ज योजना
- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कर्ज योजना
- आण्णासाहेब पाटील महामंडळ कर्ज योजना
- स्थावर व मशिनरी तारणी कर्ज योजना
- सोने तारण कर्ज योजना

**ठेवीवर आकर्षक व्याजदराच्या विविध योजना**

**महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात ४४ शाखांसह कार्यरत**

# दुग्ध व्यवसायाचे अर्थशास्त्र

**गेल्या काही महिन्यांत दुधाच्या दराचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. शासनाने याविषयी अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. मात्र दूध उत्पादक शेतकऱ्यांना यामुळे किती दिलासा मिळेल हा प्रश्न अनुत्तरीत आहे. याविषयी प्रकाश टाकणारा लेख...**



डॉ. विवेक क्षीरसागर
९९७०० ६६७८६

सध्या दूध खरेदी दराबाबत वातावरण तापलेले आहे. प्रसारमाध्यमांमध्ये याबाबत सातत्याने बातम्या येत आहेत. अनेक ठिकाणी दूध उत्पादक शेतकरी दूधवाला दर वाढवून मिळावा यासाठी आंदोलन करत आहेत. महाराष्ट्र शासनाने देखील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार काहीतरी उपाययोजना करायची म्हणून दुधाला प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्याचे जाहीर केलेले आहे. याला एक अट घातली असून दूध संघांनी दूध उत्पादकांना प्रति लिटरला ३० रुपये दर द्यावा मगच शासन पाच रुपये अनुदान पैट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणार आहे. त्याचप्रमाणे दूध पावडर उत्पादकांना देखील प्रति किलो ३० रुपये अनुदान देणार आहे. हा काही कायमस्वरूपी उपाय नाही. यातील अनुदानाचा लाभ किती शेतकऱ्यांना मिळेल/होईल हे सांगता येत नाही. कारण यापूर्वी देखील शासनाने दूध खरेदी अनुदान योजना राबविल्या होत्या. त्याचा लाभ सुमारे ५० ते ६० टक्केच शेतकऱ्यांना झालेला आहे.

मुळात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील दूध भुकटी व बटरच्या दराचा परिणाम हा दूध खरेदी दरावर होत असतो. आपणाकडे उत्पादित होणाऱ्या दुधापैकी बरेचसे दूध हे दूध भुकटी तयार करण्यासाठी साठी वापरले जाते. बाजारपेठेतील मागणी व पुरवठा यानुसार दूध भुकटी व बटरचे दर कमी जास्त होतात व त्याचाच परिणाम हा दूध खरेदी दरावर होत आहे. त्यामुळे दूध खरेदी दराचा प्रश्न हा सातत्याने निर्माण होत आहे. यासाठी दूध खरेदीला अनुदान देणे ही काही कायमस्वरूपी उपाययोजना नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध भुकटीचे दर वाढले की दुधाचे दर हे अगदी ३५ रुपये प्रति लिटर पर्यंत जातात पण दूध भुकटीचे दर कमी झाल्यावर हे दर अगदी १८ ते २० रुपये प्रति लिटरपर्यंत खाली येतात. दूध हे नाशवंत असल्याने साहजिकच यात दूध उत्पादक शेतकरी भरडला जातो. दुधाचा उत्पादन खर्च देखील यामधून निघत नाही. मुळातच वाढत्या महागाईमुळे म्हणजे चारा, वैरण, औषधे, पशुखाद्य इत्यादीच्या वाढत्या दराने शेतकऱ्यास दूध धंदा परवडत नाही. त्यातच दूध खरेदी दरातील अनियमितता त्यामुळे दूध उत्पादक अगदी मेटाकुटीला आला आहे. आज पाण्याची बाटली देखील २० ते २५ रुपयाला विकली जाते. त्या ठिकाणी दुधाला मात्र १८ ते २० रुपये दर मिळणे ही शोकांतिका आहे.



यावर उपाय एकच की दुधाची प्रतिमाणशी असणारी खपत म्हणजेच दुधाचा दरडोई वापर वाढविणे हा होय. पॅकबंद पिशवीच्या दूध विक्रीवर अवलंबून न राहता दुधापासून वेगवेगळे पदार्थ बनवून त्याचा वापर वाढवला पाहिजे की ज्यायोगे अतिरिक्त दुधाची भुकटी करण्याची वेळ येऊ नये. किंवा त्याचे प्रमाण कमी असावे. परदेशामध्ये दुधापासून वेगवेगळे प्रकार जसे दही, योगर्ट, चीज इ. तयार करून त्यांचा वापर केला जातो. परंतु आपल्याकडे दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन व वापर अत्यंत अल्प आहे. आपला महाराष्ट्र हा देशामध्ये दूध उत्पादनात सातव्या क्रमांकावर असून दुधाचा वापर करण्यात मात्र सतरावा आहे. आपणाकडे माणशी सुमारे ४०० ग्रॅम दुधाचे सेवन / वापर केला जातो.

आजमितीस महाराष्ट्रात प्रतिदिन सुमारे एक कोटी ८० लाख लिटर दुधाचे उत्पादन होते. एकेकाळी शासन व सहकाराच्या ताब्यात असलेला दुग्ध व्यवसाय जागतिकीकरणामुळे खासगीच्या ताब्यात गेला आहे. आज सुमारे ७०% पेक्षा जास्त हिस्सा हा खासगी व्यावसायिकांचा आहे. तर २८ ते २९ टक्के हिस्सा सहकाराचा राहिला असून फक्त एक टक्क्यांपेक्षा कमी हिस्सा हा शासनाचा आहे. त्यामुळे या व्यवसायावर शासनाचे नियंत्रण राहिलेले नाही.

आजमितीस १८ ते २० रुपयांपासून ३० ते ३२ रुपये प्रति लिटर दराने दूध खरेदी केली जाते मात्र बाजारपेठेमध्ये त्याची विक्री ही ५४ ते ५८ रुपये प्रति लिटर दराने होते. दूध संकलन, प्रक्रिया, वाहतूक, पॅकिंग, कामगारांचा पगार या बाबींसाठी प्रति लिटरला १४ रुपये खर्च जरी धरला तरी मधली बरीचशी रक्कम ही मधले दलाल खातात हे दिसते. एकीकडे शेतकरी गाय सांभाळतो मात्र त्याचा उत्पादन खर्च देखील निघत नाही. तर दुसरीकडे शहरातील दूध विक्रेता क्रेटमधून दुधाची पिशवी काढून ग्राहकास देतो त्याला मात्र प्रति लिटरला पाच ते आठ रुपये कमिशन मिळते ही विषमता आहे. याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

शेतकऱ्याला नियमितपणे हक्काचे उत्पन्न मिळवून देणारा दुग्ध व्यवसाय हा एकच व्यवसाय शेतकऱ्यांकडे शिल्लक राहिलेला आहे. याकडे शासनाने गांभीर्याने पाहून ठोस उपाय योजना न केल्यास शेतकरी या व्यवसायातून बाहेर पडेल व पर्यायाने गरिबी / बेरोजगारीमध्ये वाढ होईल.

आपल्याकडे किती पशुधन आहे, किती दुधाळ जनावरे आहेत. दुधाचे उत्पादन किती झाले याबाबतची कोणतीही ठोस अशी आकडेवारी उपलब्ध नाही आणि ती गोळा करण्याचा, त्यावर अभ्यास करण्याचा कसलाही प्रयत्न शासन स्तरावर केला जात नाही. इस्रायलमध्ये कोणत्या गायीने किती लिटर दूध दिले, एकूण दूध संकलन किती झाले इत्यादी बाबतचा सखोल अहवाल तेथील दुग्धव्यवसाय मंत्र्याच्या टेबलवर उपलब्ध असतो पण आपल्याकडे असे काही घडत नाही.

दूध व्यवसाय शेतकऱ्यास परवडण्यासाठी शासनाने अभ्यास करून धोरण आखले पाहिजे. दूध खरेदी अनुदानासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून प्रश्न तात्पुरता सोडविण्यापेक्षा दीर्घ मुदतीचे धोरण आखून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. यासाठी पुढील बाबींचा विचार केला जावा. –

✻ देशी दुधाळ जनावरांची पैदास होईल यासाठी जातिवंत सिमेस डोसेस उपलब्ध करून दिले पाहिजेत की जेणेकरून जास्त दूध देणाऱ्या गाई देशी गाई म्हशी यांची पैदास होईल.

✻ पशुखाद्य रास्त दरात उपलब्ध करून दिले पाहिजे.

✻ जनावरांसाठी डॉक्टर्स, दवाखाने, औषधे सहजी व रास्तदरात

# साखर उद्योगाच्या सर्वांगीण विस्तारासाठी ठोस निर्णयाची आवश्यकता

संपूर्ण जगामध्ये नुकत्याच संपलेल्या ऊसाच्या गाळप हंगामात एकूण १८६० लाख टन साखर उत्पादन झाले असून त्यामध्ये ब्राझीलने ४५० लाख टन साखर उत्पादन करून अग्रक्रम मिळविला आहे तर भारताचा दुसरा क्रमांक लागत असून ३४० लाख टन साखर उत्पादन झाले आहे. त्यापैकी महाराष्ट्र, उत्तर प्रदेश व कर्नाटक या राज्यांमध्ये ८५ टक्के साखर उत्पादन झाले आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक १०७ लाख टन साखर उत्पादन झाले आहे.



**साहेबराव खामकर**
**९६२५३ ४३४३४**

**साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वा स्थिर व सुदृढ राहण्यासाठी इथेनॉल धोरण, साखरेची किमान विक्री किंमत, सहवीज निर्मिती दर, साखरेची दुहेरी किंमत, कार्बन क्रेडिट, सौर ऊर्जा निर्मिती आदी बाबींवर धोरणात्मक व ठोस निर्णय होणे आवश्यक आहे.**

महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, उत्तराखंड, कर्नाटक, तामिळनाडू, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, पंजाब, बिहार, हरियाणा, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यांनी गाळप हंगाम घेतला. महाराष्ट्र १०७ लाख टन, उत्तर प्रदेश १०४ लाख टन, कर्नाटक ५४ लाख टन, तामिळनाडू १४.७५ लाख टन व गुजरात ९.२० लाख टन याप्रमाणे साखर उत्पादन झाले. या हंगामात देशामध्ये एकूण ५३४ कारखान्यांनी गाळप हंगाम घेतले. महाराष्ट्रात सुरुवातीला ९० लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज होता. परंतु प्रत्यक्षात एकशे तीस दिवसांपेक्षा जास्त दिवस गाळप हंगाम चालला असून १०७ लाख टन साखर उत्पादन झाले की जे मागील हंगामात १०५ लाख टन होते. राज्याचा सरासरी साखर उतारा १०.२६% असून मागील हंगामात तो ९.९८% होता. या वर्षी राज्यात एकूण २०७ साखर कारखान्यांनी गाळप हंगाम घेतले. त्यापैकी १०३ सहकारी व १०४ खासगी साखर कारखाने आहेत.



साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वा स्थिर व सुदृढ राहण्यासाठी इथेनॉल धोरण, साखरेची किमान विक्री किंमत, सहवीज निर्मिती दर, साखरेची दुहेरी किंमत, कार्बन क्रेडिट, सौर ऊर्जा निर्मिती आदी बाबींवर धोरणात्मक व ठोस निर्णय होणे आवश्यक आहे. सन २०१९-२०२० पासून केंद्र सरकारने साखरेची एमएसपी प्रति किलो रु. ३१/- निश्चित केली असून त्यात आजतागायत कोणतीही वाढ केली नाही. तथापि याच काळात एफआरपीमध्ये जवळपास पाच वेळा वाढ होऊन सन २०२४-२०२५ साठी १०.२५ टक्के पायाभूत उताऱ्यासाठी रु. ३४०/- प्रति क्विंटल करण्यात आली आहे. केंद्र सरकारने साखर साखरेची एमएसपी व एफआरपी याची सांगड घालण्याचे दृष्टीने एक मूलभूत सूत्र ठरविणे आवश्यक आहे. त्यामुळे सध्या आडातच नाही तर पोहऱ्यात कोठून येणार अशी गत होत आहे.

महाराष्ट्र राज्य हे सहकारी चळवळीतील एक महत्त्वाचे व अग्रगण्य राज्य आहे. सहकारामुळे राज्याचा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकास झालेला असून विशेषतः ग्रामीण भागाचा कायापालट होण्यासाठी सर्वात मोलाची मदत झाली आहे. काही वर्षांपूर्वी राज्यात सहकारी साखर कारखान्यांची संख्या सुमारे २२५ पर्यंत होती, परंतु कालांतराने दिवसेंदिवस त्यामध्ये घट होत चालली आहे. त्यातही राज्य सरकारने सन २००२ पासून नवीन सहकारी साखर कारखान्यांची नोंदणी बंद केल्यामुळे नवीन सहकारी साखर कारखान्यांची उभारणी होत नाही, तेदेखील एक कारण आहे. त्यामुळे राज्य सरकारने नवीन सहकारी साखर कारखान्यांची नोंदणी पूर्ववत सुरू करणे आवश्यक आहे.

सन २०२४-२०२५ गाळप हंगामासाठी गाळप परवाना मिळण्यासाठी सर्व साखर कारखान्यांना ऊस क्षेत्राची माहिती महा ऊस नोंद पोर्टलवर भरून देण्याच्या सूचना साखर आयुक्त कार्यालयामार्फत देण्यात आल्या होत्या. ऊस क्षेत्राचा व साखर उत्पादनाचा अचूक अंदाज असल्यास केंद्र सरकारला धोरण ठरविण्यामध्ये सुसूत्रता आणता येऊ शकेल.

**- साहेबराव खामकर,**
**सहकारी साखर कारखाना प्रकोष्ठ**
**सहकार भारती. ९६२५३ ४३४३४**

*****

---

**मागील पानावरून...**

# दुग्ध व्यवसायाचे अर्थशास्त्र

उपलब्ध व्हावीत.

✻ दूध खरेदी विक्री दरावर शासनाने नियंत्रण ठेवावे. त्याचप्रमाणे दुधासाठी किमान दर ठरवून द्यावा.

✻ दूध भेसळ करणाऱ्या वर कठोर व तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे.

✻ ग्राहकांना निर्भेळ, दर्जेदार दूध, दुग्धजन्य पदार्थ सहजी उपलब्ध होण्यासाठी योजना आखणे.

✻ दूध व दुग्धजन्य पदार्थाचा वापर वाढण्यासाठी प्रभावीपणे जाहिरात करून लोकजागृती करणे.

✻ शालेय पोषण आहारात दुधाचा समावेश करणे, परंतु हे योग्य तऱ्हेने होणे आवश्यक आहे.

✻ शासकीय कार्यालये, एसटी स्टँड, रेल्वे स्टेशन इत्यादी ठिकाणी दूध व दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध होण्यासाठी विक्री केंद्र सुरू करणे, यासारख्या उपाययोजना शासनाने प्रभावीपणे राबविल्यास दूध अतिरिक्त होणार नाही. दुधाची पावडर करावी लागणार नाही. त्यामुळे दुधाचे दर कमी जास्त होणार नाहीत व शेतकऱ्यास योग्य खरेदी दर मिळू शकेल.

**- डॉ. विवेक क्षीरसागर**
**माजी व्यवस्थापकीय संचालक,**
**पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित**
**कात्रज डेअरी, पुणे ४११०४६**
**मो. - ९९७०० ६६७८६**

******

# Factoring: Avenue to grow lending and priority sector portfolio for UCBS?

**What is Factoring:**

Factoring is the receivables of the seller of the goods, where ownership of the receivable is transferred to factor, indicating that the factor obtains all the rights associated with the receivables of the seller of the goods. Accordingly, the receivables becomes the factor's asset and the factor obtains right to receive the payments to be made by the debtor ( purchaser of the goods ) for the invoice amount and is free to pledge or exchange receivable assets.



**Nitin S. Sule**
**98212 56414**

There are three Parties involved in the factoring transaction, the factor who purchases the receivable , the seller of the goods (creditor), i.e. the one who sells the receivable and the buyer of the goods (debtor) who has the financial liability that requires him or her to make a payment to the owner of the invoice. The receivable is usually associated with an invoice for work performed or goods sold, which is essentially a financial asset that gives the owner of the receivable the legal right to collect the money from the debtor, whose financial liability corresponds to the receivable asset. The seller sells the receivable asset at discount to the third party, the specialised financial organisation i.e. the factor, to obtain the cash from him.

**Definition of Factor vis -a -vis whether UCBs can conduct business of factoring?**

The Factoring Regulation Act 2011,section 2(i) defines factor which includes any Bank engaged in the factoring business. The section 2(d) of the said Act defines Bank means Banking Company and as per section 2(e) of the said Act Banking Company shall have the meaning assigned to it in clause (C) of section 5 of the Banking Regulation Act 1949. As per said section Banking company means any company which transacts the business of Banking in India. As per section 56 a(i) of the said Act references to Banking Company shall be construed as a co-operative Bank, Thus any Bank (co-operative Bank) is a factor who is engaged in the business of factoring as per section 2 (i) and (j) of the Factoring Regulation Act 2011. As per section 5 of the said Act Bank (co-operative Bank) need not obtain registration certificate from RBI to commence or carry on the factoring business. To the best of my knowledge there is no RBI circular which prohibits or require RBI permission for UCBS for conducting the factoring business. Thus any co-operative Bank can commence factoring business without obtaining prior permission from RBI. However, few UCBS as an abundant precaution have sought the RBI permission/concurrence for conducting factoring business, but neither of them have received the clear cut mandate from RBI in respect of the same.

**Electronic platform for conducting the Factoring business:**

The Trade Receivable Discounting System (TReDS) is an electronic platform for discounting of trade receivables of Micro, Small and Medium Enterprises(MSMEs) through multiple financiers. These receivables can be due from corporates and other buyers including Government Departments and Public Sector Undertakings. Banks, NBFC and other financial institutions as permitted by RBI can participate as financiers in TReDS.s.

**RXIL and TReDS Platform**

Receivable Exchange of India Ltd. (RXIL) was incorporated as a joint venture of SIDBI and NSE. RXIL operates the TReDS Platform as per the TReDS guidelines issued by RBI. The major objective of the organization is to focus non-recourse receivables financing for MSMEs. They facilitates corporate buyers with a single seamless interface to provide their MSME suppliers to access at competitive rate in less than 48 hours.

The following categories of applicants can be registered on TReDS platform of RXIL subject to such applicant being engaged in business for at least 1 year (except financiers) prior to the date of registration:

- **Sellers –** The Sellers should be a MSME as defined under Section 7 of the Micro, Small and Medium Enterprises Development Act, 2006 **("MSMED Act"),** supplying goods and / or services to buyers.
- **Buyers –** Corporates including companies and other buyers including Government Departments and Public Sector Undertaking and such other entities as may be permitted by the Reserve Bank

of India ("RBI") from time to time to participate on the TReDS platform as buyers.

• **Financiers –** Banks, NBFC Factors, and such other institutions as may be permitted by RBI from time to time to participate in the TReDS platform as Financiers.

**Flow and Procedure of TReDS**

• The RXIL will provide the list of buyer with rating filtrated data

• Out of the said, the bank can select the buyer for sanctioning the limit to the company

• As per the request of the bank, RXIL will provide the documents for the sanctioning i.e. KYC, Financials & External Rating.

• Based on the above mentioned documents, the bank will have to sanction the limit & feed the limit on the platform

• The limit can be considered as MSME advances

• The bank will have to finance with zero margin

• Creation of temporary User ID & Online submission of Application and requisite documents

• Execution of Master Agreement & Submission of printed signed application and self-attested / attested documents to RXIL

• Verification of information provided in the application and documents by RXIL and confirmation to the Applicant & Payment of Registration Fee by the Applicant

• After the satisfactory completion of the process, RXIL will initiate the activation process for the applicant to use of TReDS platform.

• RXIL also execute the master agreement with Seller & Buyer who wish to get registered in this platform

• **Bank Details to be furnished by the Buyer:**

* All the working capital account details based on their borrowing arrangements along with the details of designated account from where repayment shall be arranged by the Buyer for the Factoring Units factored / financed on the TReDS platform.

• As the settlement of the TReDS transactions shall be carried out through auto debit & credit mechanism through NPCI, the Buyers have to submit an Auto Debit mandate to RXIL for onward submission to the respective Buyers' Designated Bank for Auto Debit for payment on Due Dates for Factoring Units factored / financed on the TReDS platform, based on the obligations generated and forwarded by RXIL

• As TReDS entities are covered under the Payment and Settlement Systems Act, 2007, TReDS entities need to do KYC of the participants registered on the TReDS platform. This includes all categories of participants such as MSME Sellers, Buyers (Corporates, Govt. Depts. and PSUs) and Financiers.

• The TReDS Instrument can be created on the TReDS platform either by Seller or buyer. The creation of Instrument is permitted on the TReDS platform only after the delivery of goods or for rendering of the service by Seller to Buyer and acceptance thereof by the Buyer. The Instrument can be created either by the Seller or the Buyer. However, the same has to be accepted by the Counterparty. The Originator needs to upload the Invoice and enter the Invoice details. The Originator may also upload following supporting documents to provide evidence for supply of goods or services.




*** Goods Receipt Note / Work Completion Certificate from Buyer**

*** Delivery Challan**

*** Lorry / Freight Receipt**

• The Financier (Leg-1)and the Buyer (Leg-2) needs to ensure that sufficient funds are made available by them at the designated bank accounts registered with TReDS , whenever the Financier decides to do the factoring of the trade receivable of the seller of the goods and intend to make the payment to the seller, should ensure that the sufficient funds are made available by them in the designated account registered with the TReDS .i..e., Leg-1 Whenever the buyer of the goods is require to make the payment on the due date to the financier, buyer should ensure that he maintainds the sufficient funds in the designated account registered with the TReDS. i.e., (Leg-2). The settlement under Leg-1 and Leg-2 shall not be a guaranteed settlement by RXIL and the same will depend on the successful settlement of the obligations by the paying party. RXIL shall not be responsible for any failure of the settlement under Leg-1 and Leg-2 and for any dispute between the respective Obligor and Beneficiary.

If Leg 2 transaction fails, the bank can file a suit against buyer under section 25 of The Payment & Settlement Act 2007. such person shall be deemed to have committed an offence and shall, without prejudice to any other provisions of this Act, be punished with imprisonment for a term which may be extended to two years, or with fine which may extend to twice the amount of the electronic funds

**Contd. on Next Page...**

# पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी डॉ. सुभाष जोशी



**बीड –** येथील पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्षपदी बालरोग तज्ञ डॉ. सुभाष जोशी यांची निवड करण्यात आली.

संचालक डॉ. पालवणकर यांनी मनोगत व्यक्त केले. उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर यांनी अध्यक्षांना शुभेच्छा दिल्या. नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. जोशी म्हणाले की, ज्या तळमळीने व मातृभावाने बँक नावारूपाला आणली. त्याच धर्तीवर त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली तेवढ्याच तळमळीने, समर्पित भाव ठेवून व निस्वार्थपणे बँकेला नवीन उंचीवर घेवून जाण्याचा मानस आहे. तसेच येत्या २०२५ अखेर बँकेचा एकूण व्यवसाय रू. २०२५ कोटी पर्यंत नेण्याचा मानस आहे.

मावळते अध्यक्ष डॉ. अरुण निरंतर म्हणाले की, वाढत्या वयोमानामुळे स्वेच्छेने अध्यक्षपद सोडत असलो तरी मी बँकेसाठी संचालक म्हणून सदैव आपणाबरोबर असणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रल्हाद राजुरीकर, सरव्यवस्थापक महेश पारगावकर, मुख्य हिशोबनीस अविनाश हिंगणीकर उपस्थित होते.

---

**From Pg. No. 31...**

transfer, or with both

As per the provisions of The Factoring Regulation Act, 2011, Assignor or Assignee need to serve a notice of assignment to the Debtor. The assignor in a transaction (Seller) has given authority to RXIL to send this notice on their behalf through the master agreement signed with RXIL. Based on this authorization, RXIL sends communication after successful Leg-1 settlement about the transaction undertaken and is sent to all the 3 parties involved in the transaction.

As per RBI TReDS guideline's, RXIL as intermediary of the Financier, shall file for the purposes of registration, the particulars of each Assignment in favour of the respective Financier arising from the Factored unit with the CERSAI within a period of thirty days from the date of such Assignment. The date of Assignment for this purpose will be the date of settlement of Leg-1 i.e., the date of payment of trade receivables by financier to the seller of the goods.

Audit & Inspection of invoices discounted on RXIL TReDS platform will be taken care by RXIL on sample basis & as per the TReDS guidelines. The inspection & audit has been done by RXIL employee or its authorized agencies for end use verification.

- RXIL has categorized the buyers into AAA, AA, A & BBB (with + & - variations within) & has also made tie-up with CRISIL who will provide in-depth external rating information of the company. The same along with the documents will be shared to our bank to sanction the limit for each buyer
- The present average lowest ROI for AAA buyers is 6.50% & highest ROI for BBB is 11.00%.

Thus it will be observed from above that there is well defined process flow and procedure prescribed by RXIL adhering the guidelines issued by RBI and other statutory bodies in this respect.

The total financing provided through RXIL TReDS platform during F.Y. 2023-24 is Rs.35482 Crs and 65 financiers were registered which mostly includes NBFC, Public sector and private bank and not a single cooperative bank is registered. Every year finance provided by RXIL to MSMEs has increased in leaps and bounds every year. It is understood that during last 3 years there is no NPA of any financier who had done the factoring business with RXIL TReDS platform. Thus there is huge opportunity to the UCBs for conducting the factoring business through this online platform. Further as per Master Directions of RBI dtd. 27.07.2023 on "Priority Sector Lending" para 9.1(iii) Factoring Transactions pertaining to MSMEs taking place through the TReDS shall also be eligible for classification under Priority Sector. However, it is mentioned therein that this para is not applicable to RRBs and UCBs. Thus though as mentioned hereinabove UCBs can conduct factoring business through online platform of TReDS, the business done by them will not be eligible for classification under Priority sector.

In the light of the above it is felt that UCBs and their various associations should consider about participation of UCBs in RXIL trade platform and represent to RBI for allowing the UCBs to classify the transactions of factoring to MSMEs taking place through TReDS as priority sector advance, which will enable the UCBs to achieve the priority sector target set by RBI and comply the guidelines of RBI in this respect.

**- Nitin S. Sule.**
**Deputy General Manager**
**Thane Bharat Sahakari Bank Ltd.**
**Mobile - 98212 56414**

*****

# नांदणी सहकारी बँकेचा सदस्यांसाठी १० टक्के लाभांश जाहीर




**कोल्हापूर** – नांदणी सहकारी बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा येथे पार पडली. त्यामध्ये सदस्यांसाठी १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

संचालक मनोहर माळी यांनी प्रास्ताविक केले. पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पी. एम. पाटील ज्येष्ठ सदस्य गणपती चकोते उपस्थित होते. प्रशिक्षण शिबिरात आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी पी. टी. कुंभार यानी मार्गदर्शन केले. बँकेचे ७५ वर्ष पूर्ण झालेले ज्येष्ठ सभासद यांचा सत्कार व दहावी परीक्षेत उत्कृष्ट गुणांकन मिळालेले विद्यार्थी-विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी पी. एम. पाटील व बाळासाहेब चकोते यांनी मनोगत व्यक्त केले.

बँकेचे अध्यक्ष आप्पा लट्ठे यांनी मनोगतात बँक ४०० कोटी ठेवींकडे झेप घेत असल्याचे जाहीर केले. स्पर्धेच्या युगात २९३ कोटींचा टप्पा गाठत असताना सभासद कर्जदार खातेदार यांच्या विश्वासामुळेच शक्य होत आहे. अहवाल सालात बँकेने रिझर्व बँकेच्या धोरणानुसार बँकेने ५ सदस्याचे व्यवस्थापकीय मंडळ स्थापन केले आहे. ठेव वाढ, कर्ज वसूली, योग्य गुंतवणूक, शाखा विस्तार, उत्तम प्रशासन व ऑडिट वर्ग अ, शून्य टक्के एनपीए व नफा या बाबींमध्ये आघाडी घेतली आहे. अहवाल सालात बँकेच्या ठेवींमध्ये भरघोस वाढ होऊन अहवाल सालात २९३ कोटींच्या ठेवी जमा झाल्या आहेत. लवकरच, बँक ४०० कोटींचा टप्पा ओलांडणार आहे. बँकेने शून्य टक्के एनपीएची परंपरा कायम राखत आहे. सभासदांना दहा टक्के लाभांशाची शिफारस केली आहे.

अहवाल वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र कसलकर यांनी केले. सूत्र संचालन बँकेचे वसुली अधिकारी रुस्तम मुजावर यांनी केले.

## राज्य काजू मंडळ संचालकपदी कृषि अर्थतज्ज्ञ डॉ. परशराम पाटील

**चंदगड, कोल्हापूर** – राज्य काजू मंडळ संचालकपदी कृषि अर्थतज्ज्ञ डॉ. परशराम पाटील यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या अपेडा संस्था तज्ज्ञ संचालक पदावर कार्यरत आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून कृषि अर्थशास्त्रात डॉक्टरेट पदवी संपादन केली आहे. राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवरील संस्थांमध्ये कृषि, अर्थशास्त्र वन, हवामान बदल या क्षेत्रातील शैक्षणिक आणि व्यावसायिक अनुभव आहे.

## राजर्षि शाहू सहकारी बँकेचा स्नेहमेळावा उत्साहात साजरा

**पुणे** – राजर्षी शाहू सहकारी बँकेच्या वतीने नुकताच कर्मचारी आणि अधिकारी यांच्यासाठी स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. बँकेचे अध्यक्ष सुधाकर पन्हाळे उपाध्यक्ष शांताराम धनकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब डोईफोडे संचालक अधिकारी उपस्थित होते. यावेळी मनाची अमर्याद शक्ती या विषयावर डॉ. दत्ता कोहीनकर यांनी सविस्तर विवेचन केले. निवृत्त झालेले अधिकारी रमेश पासलकर आणि नंदकुमार शेळके यांचा सन्मान करण्यात आला.

## सहकार विकास महामंडळाच्या व्यवस्थापक संचालकपदी मंगेश तिटकारे

**पुणे** – राज्याच्या सहकार विकास महामंडळाच्या व्यवस्थापक संचालकपदी साखर सहसंचालक मंगेश तिटकारे यांची नियुक्ती तर महामंडळाचे व्यवस्थापक संचालक मिलिंद आकरे यांची अपर निबंधकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या कार्यकाळात सहकार विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली होती.

तिटकारे यांनी सहकार विभागात विविध पदांवर काम केले असून शासकीय कामकाजाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे.

## 'सायबर सिक्युरिटी' विषयावरील कार्यशाळेत विविध विषयांवर चर्चा



**कोल्हापूर** – महाराष्ट्र को-ऑप. बँक्स फेडरेशन व कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर सिक्युरिटी' विषयावर रविकिरण मंकिकर यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण व चर्चासत्र आयोजित केले होते.

चर्चासत्रामध्ये फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा व उपाध्यक्षा वैशाली आवाडे व कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे यांनी मार्गदर्शन केले. सहकार भारती प्रदेशाध्यक्ष डॉ. शशिताई अहिरे, संचालक मिलिंद काळे, रत्नाकर कदम, मिलिंद आरोलकर, विजय ढेरे, नानासाहेब सोनवणे, चंद्रहास गुजराथी, अशोक शेळके, योगेश्वर बन, राजगोपाल मिणीयार, दत्ताराम चाळके, सतीश गुप्ता, फेडरेशनच्या सीईओ सायली भोईर यांच्यासह विविध बँकेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष प्रतिनिधी उपस्थित होते.

## आदर्श सहकारी सोसायटीला २३ लाख रुपयांचा नफा

**आटपाडी, सांगली** – येथील आदर्श सहकारी सोसायटीचे काम कौतुकास्पद असल्याचे मत जिल्हा परिषद माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी नुकतीच संस्थेला सदिच्छा भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश दोंडे, उपाध्यक्ष तसेच संचालक, अधिकारी उपस्थित होते. संस्थेच्या ठेवी ५ कोटी ६७ लाख आणि निधी ६१ लाख २१ हजार तसेच कर्जवाटप ५ कोटी ३४ लाख आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात संस्थेला २३ लाख ३८ हजार नफा झाला आहे.

## मोती बँकेच्या हुतात्मा चौक शाखेचे उद्घाटन



**नंदुरबार –** मोती बँकेच्या हुतात्मा चौक शाखेचे उद्घाटन शाखेचे व्यवस्थापक गणेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्ह्यातील मोती बँकेची ही सहावी शाखा असून ग्राहकांना सेवा पुरविल्या जात आहे. यंदा बँक स्थापनेस २५ वर्षे पूर्ण होणार असून रौप्य महोत्सव वर्ष म्हणून साजरी करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष निखिल तुरखीया यांनी सांगितली.

देवमोगरा संस्थेचे सचिव राजेंद्र गावीत, नंदुरबार तालुका विधायक समितीचे अध्यक्ष चंद्रकांत रघुवंशी, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अभिजीत मोरे, तळोदा नगराध्यक्ष अजय परदेशी, भाजपा शहर अध्यक्ष गौरव वाणी, सहकार भारतीचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष के. आर. पाठक, जिल्हा संघटनमंत्री महादू हिरणवाळे यासह बँकेचे ग्राहक व हितचिंतक उपस्थित होते.

अध्यक्ष तुरखिया यांनी सांगितले की, बँकेच्या माध्यमातून यू.पी. आय, आय.एम.पी.एस. मोबाईल ॲप, ए.टी.एम कार्ड, आदी सुविधा उपलब्ध आहेत. बँकेच्या शाखा तळोदा, नंदुरबार, विसरवाडी, शहादा, पिंपळनेर यासह हुतात्मा चौक अशा सहा शाखा असून जवळपास १०० कोटींच्या ठेवी आहेत.

## पुणे कॅन्टोन्मेन्ट सहकारी बँकेत सेवकांसाठी वेतन करार

**पुणे –** येथील पुणे कॅन्टोन्मेन्ट सहकारी बँकेत आगामी दोन वर्षासाठी सेवकांसाठी वेतन करार नुकताच करण्यात आला. अध्यक्षपदी बँकेचे विद्यमान अध्यक्ष कैलास कोंद्रे होते.

कराराबाबत अधिक माहिती सांगताना अध्यक्ष कोंद्रे म्हणाले, सेवकांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून समाधानकारक करार करण्यात आला आहे. हा विषय चर्चेत होता. याबाबत संचालक मंडळ आणि सेवक समिती प्रतिनिधी यांनी सविस्तर चर्चा करून त्यातून मार्ग काढला आहे. आरबीआयच्या नियमास अधीन राहून सेवकांच्या करारात कोणताही बदल करण्यात आला नाही. हा करार सन २०२० पासून २०२६ या कालावधीसाठी असणार आहे.

सेवकांमधून मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महाव्यवस्थापक पदाची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी उपाध्यक्ष साहेबराव लोंकर, तसेच संचालक बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य उपस्थित होते. गेले अनेक वर्षे प्रलंबित असणारा वेतन कराराचा विषय मार्गी लागल्याने कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजश्री पुरंदरे यांनी केले. या प्रसंगी बँकेचे संचालक तसेच अधिकारी उपस्थित होते.

## दि धरमपेठ महिला मल्टिस्टेटच्या महिलांसाठी व्यावसायिक कर्ज योजना

**नागपूर –** महिलांना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने दि धरमपेठ महिला मल्टिस्टेटच्या वतीने व्यावसायिक कर्ज योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेमुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा आणि घरगुती अथवा लघुउद्योग सुरू करण्यास मदत होणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून महिलांना रुपये दहा हजार ते एक लाखापर्यंत कर्ज उपलब्ध होणार आहे. आणि हे कर्ज अल्पावधीत सुलभ पद्धतीने उपलब्ध होणार आहे. त्याचा व्याज दर हा १२ टक्के असणार आहे. आणि कर्जाच्या परतफेडीची मुदत १२ ते ३६ महिने अशी असणार आहे. या कर्ज योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या अध्यक्ष नीलिमा बावणे यांनी केले आहे.

## आदर्श सहकारी सोसायटीचा आठवा वर्धापनदिन साजरा

**सांगली, आटपाडी –** येथील आदर्श सहकारी सोसायटीचा आठवा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. माजी आमदार राजेंद्र अण्णा देशमुख यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्था अध्यक्ष प्रकाश दोंडे यांनी स्वागत केले. यावेळी संस्थेचे संचालक, अधिकारी, खातेदार, ग्राहक तसेच विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी हितचिंतक उपस्थित होते.

## शाहू मल्टिस्टेट संस्थेचा गुरुपोर्णिमा उत्सव साजरा

**बुलढाणा –** येथील शाहू मल्टिस्टेट संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी उत्साहात गुरुपोर्णिमा उत्सव साजरा केला. संस्था संस्थापक संदीप शेळके आणि संस्था अध्यक्ष मालती शेळके तसेच संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते. उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. तसेच संस्थेच्या विविध योजनांबाबत माहिती सांगण्यात आली.

## जिल्हा राज्य शासकीय कर्मचारी पतपेढी अध्यक्षपदी वसंत काळकर

**जळगाव –** जिल्हा राज्य शासकीय कर्मचारी पतपेढीच्या अध्यक्षपदी वसंत काळकर आणि उपाध्यक्षपदी संतोष चौधरी यांची निवड करण्यात आली आहे. निवडणूक अधिकारी म्हणून एम. पी. भारंबे यांनी काम पाहिले. यावेळी माजी अध्यक्ष दिलीप बारी तसेच संचालक अधिकारी उपस्थित होते.

## श्री महावीर सहकारी बँकेच्या आठव्या शाखेचे उद्घाटन

**जळगाव –** येथील श्री महावीर सहकारी बँकेच्या आठव्या शाखेचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष दलिचंद जैन आणि उद्योजक देवीचंद छोरीया यांच्या हस्ते करण्यात आले. बँकेच्या वतीने माफक व्याजदरात गृह, वाहन, सोने तारण, शैक्षणिक, सोलार उपकरण खरेदी गृहोपयोगी वस्तू आदींसाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. त्यासाठी विविध योजना तयार करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे रुपये पांच लाखपर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्यात येते आहे.

याखेरीज ग्राहकांना सर्व स्वरुपाच्या अत्याधुनिक आणि तंत्रज्ञान युक्त सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. उद्घाटन प्रसंगी खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, जळगाव जनता सहकारी बँक अध्यक्ष सतीश मदाने उपस्थित होते.

# सारस्वत सहकारी बँकेचा ८२ हजार कोटींचा व्यवसायाचा टप्पा पूर्ण

**मुंबई –** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात सारस्वत सहकारी बँकेने व्यवसायाचा ८२ हजार कोटींचा टप्पा पूर्ण केला असून ५०३ कोटी रूपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे अशी माहिती बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगण्यात आली. बँक अध्यक्ष गौतम ठाकुर तसेच उपाध्यक्ष समीरकुमार बॅनर्जी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी समीरकुमार पाटील यावेळी उपस्थित होते.

बँकेचा एकूण व्यवसाय ८२ हजार कोटींवर पोचला आहे. त्यामध्ये एकूण ठेवी ५० हजार कोटी असून ३२ हजार कोटी कर्ज याचा समावेश आहे. तर ढोबळ नफा ७८६.४३ कोटी आणि करोत्तर नफा ३५१ कोटी वरुन ५०३ कोटी झाला आहे. तो गेल्या १०६ वर्षाच्या कालावधीतील सर्वात अधिक आहे. तसेच एनपीएचे प्रमाण शून्य टक्के ठेवण्यात यश मिळाले आहे. बँकेचे भांडवल उपलब्धता प्रमाण १७.२८ टक्के इतके




आहे. तसेच सदस्यांना १७.५० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

# केंद्रीय सहकार मंत्री शहांनी घेतला गुजरातमधील सहकार क्षेत्राचा आढावा

**गुजरात –** आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी गुजरात राज्याच्या सहकार क्षेत्रातील कामाचा आढावा घेतला आणि बैठकीतील सहभागी सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन केले.

सहकारी चळवळीशी संबंधित दूध, पशुपालन, मत्स्यव्यवसाय अशा उद्योगांच्या विविध बाबींवर प्रदीर्घ चर्चा झाली. विचारमंथनासाठी गुजरात राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष, राज्य दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष, राज्य निबंधक, राज्यातील सर्व जिल्हा सहकारी बँक आणि जिल्हा दूध उत्पादक संघांचे अध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समिती अशा नामवंत सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींना आमंत्रित केले होते. सर्वांगीण विकासासाठी सहकारातील सहकार्य यावर मंथनातून भर देण्यात आला. गुजरातचे सहकार मंत्री जगदीश पांचाल मुख्य सचिव ए. के. राकेश, केंद्रीय सहकार विभाग सचिव आशिष भुतानी, इफकोचे अध्यक्ष दिलीप संघानी नाबार्डचे अध्यक्षस्थानी के. व्ही. नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई आहेर आदी होते.

# खामगाव अर्बन बँकेला आर्थिक वर्षात १४.५१ कोटी करपूर्व नफा

**खामगाव –** महाराष्ट्रासह मध्यप्रदेशात शाखा विस्तार असलेल्या दि खामगाव अर्बन को-ऑप. बँकेने सन २०२३-२४ या अहवाल वर्षात १४.५१ कोटी करपूर्व नफा असून, मिळविला आहे. बँकेच्या ठेवी १२०७.२१ कोटी असून, कर्जे ६७९.६८ कोटी आहेत. एकूण व्यवसाय १८८६.८९ कोटी असून अहवाल वर्षात नेट एन.पी.ए. प्रमाण शून्य टक्के आहे, अशी माहिती बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेचे अध्यक्ष प्रा. विजय मुंडे यांनी सांगितली.




व्यासपीठावर उपाध्यक्ष डॉ. स. स. कुळकर्णी, संचालिका विजया राठी, संचालक ॲड. किरण मोकासदार, फुलवंती कोरडे, डॉ. अभय मंडलिक, प्रशांत देशपांडे, कल्पना उपर्वट, डॉ. राजेश मुंदडा, नीरज आवंडेकर, योगेश चौबीसा, डॉ. मोहन बानोते, मनीषा माटे, संदीप डोळस, सुवर्णा चोथवे व बँकेचे प्रबंध संचालक सुधीर कुळकर्णी आदी उपस्थित होते.

उत्कृष्ट काम करणाऱ्या शाखांचे शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात प्रबंध संचालक सुधीर कुळकर्णी यांनी अहवाल वर्षात बँकेची व्यावसायिक वाढ तसेच वाटचालीची माहिती सांगितली. बँकेने केलेल्या प्रगतीची वैशिष्ट्ये दर्शविणारी चित्रफीत दाखविण्यात आली. सूत्रसंचालन ॲड. श्रीकांत निखारे यांनी तर आभार संचालक नीरज आवडेकर यांनी मानले.

सभेच्या विषयाचे वाचन उपमुख कार्यकारी व्यंकटेश कुळकर्णी, मुख्य व्यवस्थापक मुकेश कासलीवाल, संतोष जाधव, निशिकांत अग्रिहोत्र यांनी केले. सरस्वती वंदना किरण रेठेकर यांनी तर डॉ. सर्वेश सचिन कुळकर्णी यांनी गायिलेल्या पसायदानाने सांगता झाली.

# श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

**जळगाव –** श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक नुकतीच बिनविरोध झाली. नवनियुक्त संचालकांमध्ये दिलीप चोपडा, सीताराम पूरोहित, प्रमोद नेमाडे, सारंग जोशी, प्रशांत चोपडा, अनिल पाटील, नीता भंडारी, किरण चोपडा, सुभाष बारी, विष्णू ठाकरे यांचा समावेश आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपनिबंधक चैतन्य नसरे यांनी काम पाहिले.

# नंदनगरी सहकारी गृहनिर्माण हाउसिंग सोसायटी अध्यक्षपदी जितेंद्र गोसावी

**नंदुरबार –** येथील नंदनगरी सहकारी गृहनिर्माण हाउसिंग सोसायटीच्या अध्यक्षपदी जितेंद्र गोसावी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. माजी अध्यक्ष अनिल चौधरी उपस्थित होते. उपाध्यक्ष प्रदीप कासार, सचिव देविदास पेटकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी सदस्य आर. व्ही. वाणी, पी. एस. साळी, व्ही. जी. कलाल, दिलीप चौधरी, शाम कासार, सुनील दहिवलकर, प्रमोद गोसावी, जितेंद्र अहिरे, मनोज चकोर व सर्व सदस्य उपस्थित होते.

# विविध उपक्रमांनी शालिवाहन पतसंस्थेचा वर्धापन दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर –** पतसंस्थांबाबत काहीसे नकारात्मक वातावरण असताना अध्यक्ष किशोर चौहान यांचे नेतृत्वाखाली शालिवाहन पतसंस्थेने काम करत गवळ्या २७ वर्षात घेतलेली उतुंग झेप खरोखर प्रशंसनीय आहे. नेत्र तपासणी, रक्तदान, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी समाजोपयोगी क्षेत्रातील कार्य अभिनंदनीय असल्याचे आरोग्य प्रपाठक डॉ. गौतम सव्वासे यांनी संगितले.

शालिवाहन नागरी सहकारी पतसंस्थेच्या पैठण शाखेच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित रक्तदान, वृक्षारोपण, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर प्रसंगी ते बोलत होते. रक्तदान शिबिरात सुमारे ७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. साधू वासवानी मिशनचे संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिरात ३०० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात येऊन सुमारे ५० नेत्ररुग्नांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी नोंदणी करण्यात आली. शालिवाहन विद्यालयातील गरजू व गरीब विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत सुमारे ५०० झाडे लावण्यात आली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर चौहान, उपाध्यक्ष डॉ. जयंत जोशी, मानद सचिव प्रकाश कासलीवाल, संचालक दीपक आहुजा, दीपक लखमले, गणेश लोहिया, डॉ. पंडित किल्लारीकर, बाबासाहेब राऊत, सुनील शेळके, डॉ. राजेंद्र गोरडे, सुमनताई म्हस्के, श्रीमती सुमनभाभी चौहान, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, जितू परदेशी, कल्याणसिंग परदेशी, पवन लोहिया, सोमनाथ भारतवाले, बळीराम लोळगे, रामेश्वर सूसे, कायदेशीर सल्लागार डॉ. प्रीतम साबू, डॉ. संदीप जाधव आदी उपस्थित होते.

अध्यक्ष चौहान म्हणाले की २ लाख १६ हजार भागभांडवल पासून सुरू केलेली शालिवाहन पतसंस्था आज २५० कोटींपर्यंत पोहोचली आहे. एक कोटीपर्यंत कर्ज देवू शकतो इतकी सक्षम संस्था बनली आहे. संस्थेला अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पतसंस्थेच्या वतीने बँकिंग सेवा व्यतिरिक्त सुमारे ३५ समाजोपयोगी अवांतर सेवा दिली जाते.

सूत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके यांनी तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे वरिष्ठ अधिकारी शिवाजी घोडसे, रामदास संदलसे, शाखाधिकारी भारत कोंगे, सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सहकार क्षेत्राचा लौकिक वाढविण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे – डॉ. नितिन खर्चे

**यवतमाळ –** समाजाच्या विविध क्षेत्रातील मार्ग हा सहकारातूनच जातो आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राचा लौकिक वाढविण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, जेणेकरून सहकार क्षेत्र अधिक सक्षम होण्यास हातभार लागणार आहे, असे यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक अध्यक्ष डॉ. नितिन खर्चे यांनी संगितले. जागतिक सहकार दिनाच्या निमित्ताने आयोजित उपक्रमात त्यांनी मत व्यक्त केले.

महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विकासात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे असे नमूद करून ते म्हणाले, 'बिना सहकार नही उद्धार' या विचाराला सध्याच्या स्थितीत नव्याने मांडण्याची गरज आहे. सहकारात नैतिकता आणि योग्य संस्कार याची नितांत आवश्यकता आहे. तळागाळातील घटकांच्या विकासासाठी सहकार हा आशेचा किरण आहे. अंत्योदयासाठी खासगी क्षेत्र आणि शासकीय योजना याला मर्यादा आहे.

पं. दीनदयाल उपाध्याय यांनी सांगितलेल्या अंत्योदयाची संकल्पना ही सहकार क्षेत्रातून साकारण्याचा विश्वास आहे. अजूनही सहकाराच्या विचारावर सर्वसामान्य जनतेचा विश्वास आहे. मात्र अलीकडच्या काही घटना पहिल्या तर सहकार क्षेत्रात काही अडचणी निर्माण होत आहेत आणि म्हणूनच त्यावर मत करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे. त्यामुळे सहकार चळवळ अधिक सक्षम आणि सशक्त होणार आहे, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला बँकेचे संचालक तसेच अधिकारी, कर्मचारी, बँकेचे खातेदार, हितचिंतक उपस्थित होते.

# केशव नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे हेमंत गोडवे सन्मानित

**यवतमाळ –** जेईई परीक्षेत देशात प्रथम क्रमांक मिळविणारे हेमंत गोडवे यांचा सन्मान येथील केशव नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर खोंड यांच्या संस्थेच्या आर्णी शाखेत करण्यात आला.

संस्थेच्या वतीने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून विविध उपक्रम करण्यात येतात. त्यानुसार दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येतो. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष दौलत वाघमारे, मानद सचिव अनिल आक्केवार, मुख्य कार्यकारी अधिकारी दीपक दिकुंडवार उपस्थित होते.

# चैतन्य अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीचा २० वा वर्धापनदिन साजरा

**यवतमाळ –** चैतन्य अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी संस्थेचा २०वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात श्री विठ्ठल माऊलीच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करून झाली. प्रमुख पाहुणे डॉ. लचके होते.

संस्थेची स्थापना सन २००४ झाली. त्यानंतर पाटील यांनी संस्थेची अध्यक्षपदाची धुरा सांभाळली आणि स्थिती सुधारण्यास सुरुवात झाली. आज संस्थेच्या ४ शाखा आहेत. संस्थेचे एकूण २५५० सभासद, ३६ कोटी ठेवी आहेत. या आर्थिक वर्षात वीस लाख निव्वळ नफा झाला आहे. यवतमाळ जिल्हा सहकार भारती पदाधिकाऱ्यांनी सहकार सुगंध मासिक भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# शिक्षण क्षेत्राला सहकारी बँकांनी आर्थिक पाठबळ द्यावे

एखादी गोष्ट चांगली होण्यासाठी तसे काम करायची सवय असावी लागते, वरचेवर ते काम हातात बसलेले असते. याचा साधा सरळ अर्थ कामाची जाण हवी, कसे करायचे, काय हवे नको, काय घ्यावे काय टाळावे आणि ते कसे जुळवून आणावे जेणेकरून तिथे उत्तम निर्मिती होईल. हे फक्त कुशल कारागीरच करू शकतो. आपले पूर्वापार चालत आलेले १२ बलुतेदार याच पठडीतले.

एका काळी त्या लोकांचा व्यवसाय पिढ्यानपिढ्या सुरू आहे. मोठ्यांकडून लहानांकडे आपोआप शिकवला जातो, हस्तांतरित होतो. आता मात्र चित्र बदललेले दिसते. घरचा व्यवसाय पुढे चालवायच्या ऐवजी कुठेतरी नोकरी करण्याकडे तरुणाईचा कल अधिक होताना दिसतो. शिवाय आत्ता मात्र जो तो उठतो त्याला अधिक पगाराची आयटी क्षेत्राशी निगडित असणारेच काम हवे असा हट्ट धरतो. खरं तर आपला वडिलोपार्जित व्यवसाय पुढे चांगल्या प्रकारे चालवायला मुलांनी बघायला हवे. असे तरुणाईला सांगावेसे वाटते. इथे व्यवसाय उत्तम चालायची शक्यता अधिक असते. नव्या जुन्या गोष्टीची सरमिसळ करून भरभराट अधिक जोमाने होऊ शकते.



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

या बलुरेदारांच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी सरकारने विश्वकर्मा योजना सप्टेंबर, २०२३ मध्ये सुरूवात केली. त्याचा फायदा घेऊन पुढे जाणारे अनेकजण व्यवसाय, वा त्याच क्षेत्रात नोकरी करायला लागलेले आहेत. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या व्यावसायिक बलुतेदारांच्या समूहाच्या हितासाठी विश्वकर्मा योजनेत या विशिष्ट व्यावसायिकांना एका आठवड्याचे मोफत वैविध्यपूर्ण प्रशिक्षण उपलब्ध करण्यात आले आहे. शिवाय प्रतिदिन रु. ५००/- अनुदान देण्यात येत आहे. अपेक्षा अशी की यांनी हे सगळे शिकून घ्यावे, गांभीर्याने व्यवसायाकडे बघावे आणि दर्जेदार उत्तम माल तयार करावा. स्वावलंबी व्हावे अशी अपेक्षा आहे. घरदार, समाज आणि पुढे जाऊन आपला गांव सर्वांच्या सुधारणेचे भागीदार व्हावे.

**अधिकृत वेबसाईट :** pmvishwakarma.gov.in

विश्वकर्मा योजनेचा फायदा घेणाऱ्याने वेबसाईट वरील श्रमिक पोर्टलवर ऑनलाईन अर्ज नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या प्रती जोडाव्या लागतात. भरलेला अर्ज तपासून पुढे पाठवावा. प्रशिक्षण अर्जाची पडताळणीनुसार निवड होते. थोड्याच दिवसांचे प्रशिक्षण उत्तम आहे.

प्रशिक्षण पूर्तीनंतर संबंधित व्यवसायासाठी लागणारी यंत्रसामुग्री खरेदीसाठी रुपये २०,०००/- एकरकमी रक्कम प्रत्येकास देण्यात येणार आहेत. त्याचीही काही ठराविक पद्धत असेलही. यामागे हेतू एकच की यातून प्रशिक्षणार्थीने लगेचच वेळ न दवडता यंत्रणांचा वापर करून व्यवसाय करावा. व्यवसायाचा नव्याने विस्तारवाढ करताना स्व-रोजगारांसाठी १ ते ३ लाख कर्ज बँकांकडून घेता येते आणि आपला व्यवसाय वाढवावा.

सरकारच्या बहुतांशी योजनांना सरकारी बँकांकडून कर्ज पुरवठा केला जातो. हीच नामी संधी सर्व बँकांबरोबर सहकारी बँकांना देखील मिळालेली आहे. आपापल्या गावातील वरील काम करणाऱ्या लोकांना या योजनेचा फायदा घ्यायला बँकेनेदेखील सुचविले पाहिजे. बँकेची कर्ज योजना आहे, त्यासाठी कर्ज देता येईल, असे होत आहे आणि अधिकाधिक तरुणाई आपल्याच घरातल्या पारंपरिक व्यवसायात पडत आहेत. तो व्यवसाय करणे त्यांना अधिक सोयीचे सहज जमणारे होणारे असते, कारण अगदी लहानपणापासून त्यांनी हेच काम वरचेवर बघितलेले असते. आईवडिलांबरोबर त्यांनी व्यवसायासाठी बाजारही केलेला असतो. काय लागते, कुठे मिळते याची माहिती असते.

**सहकार सुगंध मासिकामधील हा माझा १०० वा लेख आहे. मासिकासाठी लेख पाठवताना क्रमांक द्यायला सुरुवात केली. आजचा लिहिलेला शंभरावा लेख. याचा आनंद होत आहे. सतत आर्थिक विषयावर लेख लिहिताना एकीकडे वाचन, टिपणणी काढणे आवडते. संपादक भालचंद्र कुलकर्णी व मासिकाची टीम यांच्याकडून मला नेहमीच उत्तम सहकार्य मिळाले आहे. सर्वांचे आभार!**

छोट्या छोट्या व्यावसायिकांसाठी खास कौशल्य वाढविण्याची ही योजना उत्तम आहे. सर्व सरकारी योजना नेहमीच जनहित लक्षात घेऊन आखलेल्या असतात. त्यांचा फायदा करून घेऊन स्वत:चा दर्जा उंचाविणे हे काम प्रत्येकाने प्रामाणिकपणे, सचोटीने, योग्य प्रकारे, करणे होय. इथे आपणच आपला उद्धारकर्ता व्हायचे आहे. मदतीला सरकारी योजना, सरकारी बँका, सहकारी बँका असल्यावर यात अभिप्रेत सर्व प्रकारचा समाज नक्कीच उच्च प्रतीचे आयुष्य आपल्या घरात आनंदाने जगू शकतो. सूक्ष्म, लहान व मध्यम उद्योगांचा सर्वतोपरी कायापालट होण्यासाठी अशाच योजना उत्तमरीत्या आखल्या जातात. त्यांचा योग्यप्रकारे फायदा उचलणे ज्याचे त्याचे हाती आहे.

भारत देश तरुणाईचा देश आहे. जगाला कुशल कामगारांचा पुरवठादार होण्यासाठी तयारी सुरू झालेली आहे. कुठल्याही कामात ज्ञान, कौशल्य, कष्ट करायची तयारी, प्रामाणिकपणा असल्यावर जगात कोठेही गेलात तरी काही ना काहीतरी नक्कीच काम मिळेल. अनेक भारतीय तरुण मुलेमुली परदेशात जाऊन देशाचे नाव उज्ज्वल करीत आहेत. देशात दरवर्षी ११/१२ लाख तरुणांना आयटीआय संस्थांतर्फे कौशल्य प्रशिक्षण दिले जात आहे. आता मात्र जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी काय व कसे यांची आखणी केली आहे. त्याचा अभ्यास करून सुधारित तंत्रज्ञानाधिष्ठ नाविन्यपूर्ण प्रशिक्षण दिले जाणार आहे. कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय जगभरातील कुशल कामगारांच्या भविष्यातील गरजांचा शोध घेऊन त्यानुसार कार्यपद्धती आखत आहेत. त्यामुळे जे जे कोणी हे प्रशिक्षण घेतील त्यांना आपले आयुष्य उत्तमरीत्या घडविण्याची ही अतिशय नामी संधी आहे.


केंद्रीय अर्थसंकल्पात कौशल्यपूर्ण शिक्षण आणि रोजगार निर्मितीला महत्त्व देऊन भर देण्यात आलेला आहे. कौशल्य प्रशिक्षण देऊन कुशल कामगार तयार करण्याची सरकारची धडपड आहे. त्यासाठी लोकांना प्रवृत्त करीत आहे, प्रोत्साहित केलेले आहे. त्यामुळे भारतीय तरुण बलुतेदार मंडळी येथे देशात प्रशिक्षण घेऊन परदेशातही रोजगारांच्या संधी मिळवतील. तिकडे आणखीनही काही नवीन शिकून पारंगत होतील. त्याचा अभिमान नक्कीच समाजाला वाटणार आहे. जगात कुठेही जा काम करा, आपल्या पायावर उभे रहा. एक सांगावेसे वाटते, तुम्ही जगभरात गेल्यावर कुठेही आपल्या भारत देशाला कमी पणा येईल असे वर्तन करू नका. आपले संस्कार जपावेत. देशाप्रती समाजाप्रती प्रेम, आदर, निष्ठा, कर्तव्य ठेवा. तुम्हाला उभे करणाऱ्या आईवडिलांकडे संपूर्णपणे लक्ष देत जा. सर्वांना शुभेच्छा!

सरकारकडून राष्ट्रीय कौशल विकास उगम NSDC - National Skill Development Corporation यांच्याही अशाच सुविधा आहे.

त्यासाठी पुढील लिंक्स बघाव्यात.

1) Mahaswayam.gov.in :: https://kaushalya.mahaswayam.gov.in 2)Ministry of Skill Development and Entrepreneurship ::https://msde.gov.in

**- वंदना धर्माधिकारी मो.- ९८९०६२३९१५**
Vandana10dyahoo.co.in


THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
Regd.No. YML/BNK/114
दि यवतमाळ अर्बन
को-ऑप बँक लि., यवतमाळ
।। साहसे श्री : प्रतिवसति ।।
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ - ४४५००१
Website : www.yavatmalurbanbank.com
अमृत वर्षा
पुनर्गुंतवणुक ठेव योजना
दि. १९ जुलै २०२४ ते दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत
गुंतवणूक कालावधी
४४४ दिवसांकरिता
योजनेचा सामान्य व्याजदर 7.25%
केवळ ज्येष्ठ नागरिकांकरिता 7.75%
अधिक माहितीकरीता शाखा व्यवस्थापकाशी संपर्क साधावा.

# गृहरचना संस्था
# शंका समाधान
## अपार्टमेंट कायदा - १९७०



**प्रश्न : अपार्टमेंट कंडोमिनियम (संघ) चे नाव प्रॉपर्टी कार्ड किंवा ७/१२ उताऱ्यावर लावता येऊ शकते का?**

**उत्तर :** महाराष्ट्र अपार्टमेंट कायदा १९७० नियम १९७२ नुसार ज्या सदनिका धारकाकडे त्याच्या सदनिकेचे डीड ऑफ अपार्टमेंटचा करारनामा नोंदणीकृत असेल, तो त्याचा सदनिकेचा त्याच्या वाटपाला आलेल्या अविभाज्य (अनडिव्हायडेड)(शेअर) हिश्श्याचा कायदेशीर मालक असतो. त्यामुळे तो त्याच्या सदनिकेची विक्री, गहाणखत, दान इ. क्रिया कोणाच्याही परवानगीविना करू शकतो. त्यासाठी त्याच्या नावाची मालकी किंवा मालकी हक्क दर्शवणारा ७/१२ उतारा किंवा प्रॉपर्टी कार्डवर त्याचे नाव असणे आवश्यक आहे. त्यासाठी सदनिका धारकाने त्याच्याकडील नोंदणीकृत अपार्टमेंट डीडची (करारनामाची) प्रत व घोषणापत्राची प्रत (डीड ऑफ डिक्लेरेशन) संबंधित नगर भूमापन कार्यालयात (सिटी सर्व्हे कार्यालय) यांचेकडे अर्जासह सादर करणे आवश्यक आहे. परंतु अलिकडे माझ्या माहितीप्रमाणे ७/१२ उतारा किंवा प्रॉपर्टी कार्डवर प्रत्येक अपार्टमेंट धारकाचे नाव न लावता फक्त अपार्टमेंट संघाचेच नाव लावण्याची क्रिया सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत अपार्टमेंट संघाच्या पदाधिकाऱ्यांनी संघाचे नाव ७/१२ उतारा किंवा प्रॉपर्टी कार्डवर लावून घेतल्यास त्या संघाच्या सर्व सभासदांची नावे ७/१२ उतारा किंवा प्रॉपर्टी कार्डवर आपोआप असू शकेल. फक्त व्यक्तिगत अपार्टमेंट धारकाचे नाव नसेल. त्यामुळे एखाद्या अपार्टमेंट धारकाने आपली सदनिका अन्य कोणा व्यक्तीला विकल्यास त्याचेबरोबर नोंदणीकृत केलेल्या 'अपार्टमेंट डीड'ची (करारनामाची) प्रत संघाकडे सादर केल्यास भागदाखल्यावर योग्य ते बदल करून सभासद नोंदवही व अन्य रेकॉर्ड अद्ययावत होऊ शकेल. यासाठी पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतल्यास संघाचे कामकाज अद्ययावत राहू शकेल.



अॅड. जयंत कुलकर्णी
९४२२० ०७५१०

**प्रश्न : प्रत्येक अपार्टमेंट धारकास संघाच्या उपविधीची (बाय-लॉज) प्रत देणे आवश्यक आहे का?**

**उत्तर :** होय. बिल्डर (विकसक) ज्यावेळी प्रकल्पाचे घोषणापत्र (डीड ऑफ डिक्लेरेशन) रीतसर नोंदवतो त्याचवेळी त्यामध्ये संघाच्या उप-विधीचा समावेश केलेला असतो. त्यामुळे बिल्डरने जर प्रत्येक अपार्टमेंट धारकाला घोषणापत्राची एक प्रत सदनिका खरेदी करताना उपलब्ध करून दिलेली नसेल तर अपार्टमेंट संघाने प्रत्येक अपार्टमेंट धारकास संपूर्ण घोषणापत्राची प्रत किंवा त्यामधील फक्त उप-विधीची प्रत झेरॉक्स करून त्यावर अपार्टमेंट संघाची सही-शिक्का असलेली प्रत प्रत्येक अपार्टमेंट धारकाला द्यावी. त्यामुळे संघाचा कारभार कसा चालतो याची माहिती प्रत्येक सभासदास देऊ शकेल व भविष्यात अडचणी कमी होतील.

**प्रश्न : अपार्टमेंट संघाच्या उप-विधीमध्ये बदल करण्याची कार्यपद्धती काय आहे?**

**उत्तर :** बिल्डरने / विकसकाने घोषणापत्रामध्ये (डिक्लेरेशन) अंतर्भूत केलेले अपार्टमेंट संघाचे उप-विधी हे महाराष्ट्र अपार्टमेंट कायदा १९७० नियम १९७२ नुसारच नोंदवलेले असतात. त्यामध्ये संघाला गरजेनुसार बदल किंवा सुधारणा करण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यासाठी शासनाच्या कोणत्याही खात्याची पूर्वपरवानगी किंवा मंजुरी द्यावी लागत नाही. फक्त उप-विधीमधील बदल किंवा सुधारणा हे भारतीय राज्यघटनेच्या चौकटीतच असले पाहिजेत एवढीच प्रमुख अट आहे.

संघाच्या उप-विधीमध्ये बदल किंवा सुधारणा करण्यापूर्वी संघाने कायदेतज्ज्ञांची मदत घेऊन त्यानुसार प्रस्ताव तयार करावा. सदर प्रस्ताव सर्व अपार्टमेंट धारकाच्या सर्वसाधारण सभेपुढे मांडून त्यावर साधकबाधक चर्चा करून बहुसंख्य अपार्टमेंट धारकांची त्यास संमती मिळाल्यानंतर सदर दुरुस्ती प्रस्ताव नोंदणी अधिकाऱ्याकडे (सब-रजिस्ट्रार) लगेच नोंदवावे. त्यानंतरच त्यामधील सुचवलेले बदल व सुधारणा किंवा दुरुस्ती प्रत्यक्ष अंमलात आणता येतील.

सदरची दुरुस्ती किंवा बदल जर संघाने रीतसर नोंदवले नाहीत तर जरी सर्वसाधारण सभेमध्ये ठराव जरी पारित झाला असला तरी त्याची अंमलबजावणी मात्र करता येणार नाही याची नोंद घ्यावी. याचे प्रमुख कारण म्हणजे उप-विधीमधील दुरुस्ती/बदल नाही. सभासदांना मान्य नसेल तर ते एक महिन्याचे आत कोर्टात जाऊन त्या ठरावाला रितसर आव्हान देऊ शकतात म्हणून उप-विधीमधील बदल/दुरुस्ती रीतसर नोंदवणे कायद्याने आवश्यक आहे.

सब-रजिस्ट्रारकडे उप-विधीमधील बदल नोंदवणेसाठी कोणत्याही प्रकारची फी/मुद्रांक शुल्क भरावी लागत नसल्याने फक्त नोंदणी फी (रजिस्ट्रेशन फी) भरून उप-विधी दुरुस्ती नोंदवता येते. बऱ्याच संघांना व पदाधिकाऱ्यांना उप-विधी दुरुस्ती नोंदवावयाची असते याची कल्पनाच नसते. त्यामुळे बऱ्याचदा कायदेशीर प्रश्न निर्माण होतात म्हणून वेळीच कायदेतज्ज्ञांची मदत घेतल्यास कायदेशीर प्रश्न निर्माण होणार नाहीत.

फक्त उप-विधी दुरुस्ती करताना कायद्याच्या कक्षेत राहून कोणत्याही सभासदावर अन्याय होणार नाही याची काळजी मात्र पदाधिकाऱ्यांनी घ्यावी, याप्रमाणे योग्य दक्षता घेतल्यास अपार्टमेंट संघाचे कामकाज सुरळीत व विनासायास चालू शकेल.

अपार्टमेंट संघाच्या कामकाजावर कोणत्याही शासकीय खात्याचे नियंत्रण किंवा मार्गदर्शन मिळण्याची व्यवस्था अपार्टमेंट कायद्यातच नसल्याने अपार्टमेंट संघाच्या सभासदांनी व पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी कायदेतज्ज्ञांची मदत घेणे योग्य ठरेल.

**क्रमश:**

**अॅड. जयंत कुलकर्णी**
advjgk@yahoo.co.in

## जनता अर्बन को-ऑप. बँक अध्यक्षपदी बळीराम जगताप



**वाई –** येथील जनता अर्बन को-ऑप. बँक अध्यक्षपदी बळीराम जगताप आणि उपाध्यक्षपदी शेखर फरांदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सहायक निबंधक अनिल क्षीरसागर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. बँक संस्थापक संचालक सुरेश कोरडे तसेच अन्य संचालक मुख्य कार्यकारी अधिकारी रूपाली बुलुंगे उपस्थित होते.

## श्री तिरुपती पतसंस्थेतर्फे फराळाची सुविधा

**पुणे –** श्री तिरुपती नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सुमारे बारा हजार वारकरी आणि भाविकांना फराळाची सुविधा आणि चहा उपलब्ध करून देण्यात आला. नीरा लोणंद मार्गावरील पाडेगाव जिल्हा सातारा येथे ही सेवा देण्यात आली. संस्था अध्यक्ष संतोष चोपडा, उपाध्यक्ष विनोद जाजू, संचालक महाव्यवस्थापक आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## जनता अर्बनला अडीच कोटींचा नफा

**वाई –** नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात जनता अर्बन को-ऑप. बँकेने अडीच कोटी रुपयांचा नफा मिळविला आहे. अशी माहिती बँक अध्यक्ष सुरेश कोरडे यांनी सांगितली. तसेच भाग भांडवल ७ कोटी ८५ लाख असून नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात बँक यशस्वी झाली आहे. बँकेच्या सध्या ७ शाखा कार्यरत असून सर्व शाखा नफ्यात आहेत असे नमूद करून ते म्हणाले, सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा तंत्रज्ञानासह उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तर काही घटकांना घरपोच सेवा देण्यात येत आहे. विविध क्षेत्रातील व्यावसायिकांना कर्जाची उपलब्धता करून देण्यात येत आहे. त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा बँकेचा प्रयत्न आहे. बँकेच्या लोणंद शाखेचा १५ वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्ष बळीराम जगताप संस्थापक संचालक सुरेश कोरडे ह.भ.प. चिन्मय महाराज दांडेकर सातारकर तसेच संचालक अधिकारी ग्राहक उपस्थित होते.


२०२४

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | १९०० | १३०० | ७०० |
| रजिस्टर पोस्टाने | २६०० | १७८० | ९४० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे - ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com


## साधना सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी जानकू कदम

**पुणे –** साधना सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी जानकू कदम यांची तर उपाध्यक्षपदी प्रताप बोरकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सहायक निबंधक प्रगती वाबळे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. आमदार चेतन तुपे सुकाणू समिती सदस्य दिलीप तुपे यावेळी उपस्थित होते.

बँकेची स्थापना होऊन ४६ वर्षे झाली असून राज्याच्या विविध जिल्ह्यांत २७ शाखा कार्यरत आहेत. सध्या बँकेच्या ठेवी ६८०.६२ कोटी असून कर्ज वाटप ३६३.४८ कोटी इतके आहे. बँकेच्या वतीने सदस्यांसाठी अनेकविध उपक्रम राबविण्यात येतात. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानासह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. बँक संचालक, अधिकारी उपस्थित होते.

## जावळी सहकारी बँकेला साडेआठ कोटींचा नफा

**सातारा –** येथील डीएमके जावळी सहकारी बँकेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात साडे आठ कोटींचा नफा झाला असल्याची माहिती आमदार आणि बँक मार्गदर्शक शशिकांत शिंदे यांनी सांगितली. बँकेची ५१वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली, यावेळी ते बोलत होते.

मध्यंतरीच्या काळात तोट्यात असणाऱ्या बँकेने भरारी घेऊन घसघशीत नफा मिळविला आहे. असे नमूद करून ते म्हणाले, यामुळे सदस्य, ग्राहक यांचा विश्वास वाढण्यास मदत झाली आहे. कोरोनानंतरच्या काळात बँक अडचणीत आली होती. पण संचालकांनी योग्य प्रकारे कामकाज करून बँक आर्थिक अडचणीमधून बाहेर काढली आहे. सभेला बँक संचालक, अधिकारी, ग्राहक उपस्थित होते.

## नागरी सहकारी बँकाच्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेला मुदतवाढ

**पुणे –** राज्यातील नागरी सहकारी बँकाच्या अनुत्पादक कर्जामधील एनपीए प्रभावी वसुलीसाठी सहकार आयुक्तांनी शासनाला शिफारस केली होती. त्यानुसार एकरकमी कर्ज परतफेड योजनेला ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे.

या निर्णयामुळे सहकारी बँकांना दिलासा मिळाला आहे. बँकाकडील जी कर्जखाती ३१ मार्च २०२३ अखेर अनुत्पादक कर्जाच्या अथवा त्यावरील वर्गवारीला समाविष्ट करण्यात आलेली असतील अशा सर्व खात्यांना ही योजना लागू होणार आहे. या योजनेनुसार रक्कम जर ५० कोटी अथवा त्यापेक्षा अधिक असेल तर अशा कर्ज प्रकरणात ही योजना लागू करण्यासाठी सहकार आयुक्तांची पूर्व परवानगी आवश्यक असणार आहे. तसेच योजनेत कोणताही बदल करण्याचा अधिकार बँकांना असणार नाही असे शासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

## भारती मैद सहकारी पतसंस्थेचे वृक्षारोपण संगोपन अभियान

**पुसद –** भारती मैद सहकारी पतसंस्थेच्या वतीने सामाजिक उपक्रमाचा एक भाग या नात्याने वृक्षारोपण आणि संगोपन अभियान हाती घेण्यात आले आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अप्पाराव मैद, उपाध्यक्ष भारत जाधव तसेच संचालक, अधिकारी आदी उपस्थित होते.

## बालाजी अर्बन को–ऑप. क्रेडिट सोसायटीच्या ठेवीत वाढ


**यवतमाळ –** येथील बालाजी अर्बन को–ऑप. क्रेडिट सोसायटीच्या सध्या ५ शाखा कार्यरत असून ठेवी ५८ कोटी इतक्या झाल्या आहेत, अशी माहिती संस्थेच्या २१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगण्यात आली.

अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष राहुल शिंदे होते. मुख्य कार्यकारी अधिकारी शामकुमार लोखंडे यांनी संस्थेचा अहवाल वाचून दाखविला. शाखा व्यवस्थापक जे. एस. शेख यांनी प्रास्ताविक तर शेखर भरारे यांनी आभार मानले. संस्था उपाध्यक्ष अश्विन चौधरी तसेच संचालक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## दि नाशिक मर्चंट्स को–ऑप. बँक उपाध्यक्षपदी आकाश छाजेड

**नाशिक –** दि नाशिक मर्चंट्स को–ऑप. बँक उपाध्यक्षपदी आकाश छाजेड यांची निवड करण्यात आली आहे. तर जनसंपर्क संचालकपदी प्रशांत दिवे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. बँक अध्यक्ष सोहनलाल भंडारी अध्यक्षस्थानी होते. संचालक मंडळाकडून नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आणि शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी संचालक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## देशाला तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता करण्यामध्ये सहकारी बँकाची भूमिका महत्त्वाची



मिलिंद काळे

**पुणे –** देशाला तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता करण्यामध्ये सहकारी बँकाची भूमिका महत्वाची आहे असे मत कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष आणि नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक अँड क्रेडिटचे उपाध्यक्ष मिलिंद काळे यांनी एका कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

ते म्हणाले, महासत्ता होण्याचे स्वप्न मोजक्याच बँकांच्या बळावर पूर्ण होणार नाही. यासाठी सहकार बँकांची संख्या वाढणे आवश्यक आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालय कार्यरत आहे. सहकार क्षेत्रातील सुधारणांमुळे आरबीआयचा सहकार क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होतो आहे. बँका आणि उद्योजक यांनी समन्वय साधून उद्योग व्यवसाय अधिक विकसित करण्याची गरज आहे.

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी प्रा. सुरेश अत्तरदे

**जळगाव –** जिल्हा महाविद्यालयीन शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी प्रा. सुरेश अत्तरदे आणि उपाध्यक्षपदी प्रा. अतुल देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. अध्यक्षस्थानी एम. पी. भारंबे होते. प्राचार्य अनिल पाटील आणि डॉ. मधु खराटे यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड

## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. माधवेंद्र कोरडे** - (फक्त मेसेजसाठी) **९८५०५७१४०५**
**श्री. श्रीकांत पटवर्धन** (प्रदेश कार्यालय प्रमुख) **९२२५८२५३९९**

सहकार भारती पुणे कार्यालय – ऑफिस क्र. १०५, सांकला आर्केड, गांधी खादी भांडारच्यावर, कर्वे रोड, एरंडवणा, पुणे– ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

**सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती** – संपादक

## श्री. संतोष गावंडे : रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-दहिसर | श्री. हितेश वाघेला | 8828384482 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| वसई | श्री. संतोष शिंदे | 8652415015 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |
| पनवेल | श्री. संजय पावसकर | 8928323997 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | ॲड. विकास देवकर | 7588440640 |
| धुळे | श्री. बी. एम. कुलकर्णी | 9420602441 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार कायदा व वसुलीची प्रक्रिया | २००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |
| ४ | डिजीटल तंत्रज्ञानाचे धोके व सावध, सुरक्षित वापर | १५०/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ मे २०२२ पासून-
**वार्षिक रु. ४००/- त्रैवार्षिक रु. १०००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 07801110000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**


safeage
Security Products Pvt. Ltd.
OM SALES CORPORATION
All our Products are BIS Standards
Our Certificates
ISO 14001 : 2004
IS 5244 : 2014
CM/L-7500087614
IS 550 : 2014
CM/L-3978088
IS 11188 : 2014
CM/L-2870669
ISO 9001 : 2008
Electronic safe
Depository safe
Gold Safe
Fire Resistant Cabinet
Fire Resistant Filing Cabinet
Industrial Locker
Compactor
Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947
Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com
Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.
Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur
We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri,
Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar,
Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded,
Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara,
Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,

# पतसंस्था व बँकांसाठी... मार्ग परिपूर्ण तंत्रज्ञानाचा

## K3One
कोअर बँकिंग प्लॅटफॉर्म


- सर्व बँकिंग मॉड्यूल - सदस्यत्व, CASA, ठेवी, कर्ज, गुंतवणूक
- डॅशबोर्डसह व्यवस्थापन माहिती प्रणाली (MIS)
- कर आकारणी आणि अनुपालन - TDS, GST
- TIER IV प्रमाणित डेटा सेंटर
- सायबर सुरक्षा अनुपालन मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन, ऍप्लिकेशन VPN

## SIMFI
निओ बँकिंग प्लॅटफॉर्म

- डिजिटल कस्टमर ऑनबोर्डिंग
- कर्ज उत्पत्ति प्रणाली (Loan Origination System)
- व्हॉइस अलर्टसह मर्चंट मोबाइल ॲप
- स्कॅन आणि पे सुविधेसह कस्टमर मोबाईल ॲप
- डिजिटल पेमेंट - NEFT, RTGS, IMPS, UPI - QR
- सेल्फ सर्व्हिस किओस्क
- डोअरस्टेप बँकिंग
- पिग्मी एजंटसाठी मोबाइल ॲप

## SEVAA
सेवा-पुर्तती प्लॅटफॉर्म

- सॉफ्टवेअरच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आणि सेवेसाठी एक प्रभावी साधन
- पतसंस्थांसाठी प्रथमच 'प्रशिक्षण, सेवा आणि सपोर्ट ट्रॅकींगसाठी ऑनलाइन डॅशबोर्ड'
- पूर्णपणे पारदर्शक आणि प्रक्रिया-चालित सिस्टीम



## PEOCIT

**पिओसिट सॉफ्टवेअर सोल्युशन्स प्रा. लि.**
(ISO 9001 व 27001 प्रमाणित कंपनी)

**कॉर्पोरेट ऑफिस :** ऋषिकेश, न्यू इंडिया स्कूलजवळ, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे - 411038. **फोन नं. :** +91 20 2528 3002, 6529 0201,
**ई-मेल :** sales@peocitsoft.com **www.peocit.in**

**संपर्क :** 9960100312 / 9561088987 / 9561003398 / 9960100339 / 9960100333

**शाखा :** पुणे / मुंबई / सातारा / नागपुर / सोलापुर / गोवा / इंदोर हैद्राबाद / रायचूर / बेंगळुरू / बेळगावी / अहमदाबाद / वडोदरा

लाईव्ह डेमो किंवा साईट व्हिजिट करीता **+91 86050 10318 / www.k3one.com**

# कारगिल विजय दिवसाच्या २५ व्या रौप्यमहोत्सवा निमित्त

लोकमान्य

**सैनिक सन्मान योजना**

## १०.८०%

मुदत ठेवीवर आकर्षक व्याजदर

फक्त सभासदांसाठी नियम व अटी लागू **




**किमान रक्कम: १०,००० आणि अधिक | त्रैमासिक व्याज परतावा**

- सेनेतील जवान (सेवेत आणि निवृत्त)
- शहीद जवानांच्या वीर पत्नी
- कालावधी २५ महिने
- ज्येष्ठ नागरिकांसाठी ०.५०% अधिक व्याजदर

स्थापना 1995

लोकमान्य

मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)


प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र


महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली

Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002

संस्थापक - अध्यक्ष : श्री. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.

Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org


टीजेएस्‌बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी गुंतवणूक करा,
तुमचा व्यवहार वाढवा आणि तुमची व्यावसायिक स्वप्ने सहज साध्य करा.
व्यावसायिक कर्ज
9.10%* द.सा. पासून
डॉक्टर
वकील
अभियंता
*अटी व शर्ती लागू
www.tjsbbank.co.in I Toll Free: 1800 266 3466/1800 223 466



भरभराटीचे लक्षण म्हणजे उद्योगाची वास्तू,
जनसेवेचे कर्ज म्हणेल तथास्तु !
Office
Industrial Shed
BRANDING
Shops
जनसेवा उद्योग वास्तू
कर्ज योजना
त्वरीत मंजूरी
आकर्षक व्याजदर
अत्यल्प प्रोसेसिंग फी
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३
व्हॉट्सअप नंबर : 89565 47595 www.janasevabankpune.net

# कालिंदेश्वर अर्बन क्रेडिट को-ऑप सोसायटी लि.

Reg.No.YML/MGM/RSR/(CR)/686/2024-25

काळी (दौ) ता.महागांव जि.यवतमाळ






सोने तारण कर्ज



वाहन कर्ज



व्यवसाय कर्ज



वेतन कर्ज



गृह कर्ज



एफ.डी. ठेव कर्ज

## सहयोगातून समृद्धीकडे

## * संस्थेच्या योजना व सुविधा *

- मासिक ठेव योजना
- मुदत ठेव योजना
- दैनिक ठेव योजना
- दामदुप्पट ठेव योजना
- आवर्त ठेव योजना
- आरटीजीएस
- एनईएफटी
- कोअर बँकिंग
- एस.एम.एस. बँकिंग
- क्युआर कोड
- युपीआय पेमेंट

- चालू खाते (CA)
- बचत खाते (SB)
- दैनिक संचयी खाते (DRD)
- मासिक आवर्त ठेव (RD)
- मुदत ठेव (FD)
- शिदोरी योजना (MIS)

९०११७०३७१२

# ॥ जाणता राजा ॥
## मल्टिस्टेट को.ऑप. क्रेडिट सोसा.लि.
र.नं. ७५२



अध्यक्ष व संचालक मंडळ आणि कर्मचारी वृंद यांचेकडून

**भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!!**

| * मुदत ठेव योजना * | |
|---|---|
| मुदत ठेव दिवस | व्याजदर |
| ३० दिवस ते ९० दिवस | ७.००% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ दिवस ते १ वर्ष | १०.००% |
| १ वर्षाच्या वर ते २ वर्षांपर्यंत | ११.५०% |



चेअरमन
श्री. अमित जयंत भिसे

मासिक प्राप्ती योजने अंतर्गत रु. १ लाखावर ९५०/- रु. दरमहा व्याज मिळवा.

* आवर्त ठेव योजना उपलब्ध.
* तात्काळ सुवर्ण तारण कर्ज उपलब्ध

शाखा - बालकृष्ण मंगल कार्यालय समोर,
आर्णी रोड, यवतमाळ-४४५ ००१ (महाराष्ट्र)
मो.- ९८६०४ ७०७००, ९८२२९ ०४६४२

NUCC™
NIRMAL UJJWAL CREDIT CO-OP. SO. LTD., NAGPUR (MULTI-STATE)

NUCC
ESTD. 1989

निर्मल उज्वल
क्रेडिट को-ऑप. सोसा. लि. नागपूर (मल्टीस्टेट)



## आवर्त ठेव योजना

* मासिक बचत सवय
* मात्र १०० रुपया पासून सुरुवात
* १ ते ५ वर्षांपर्यंत १०% व्याजदर

## कर्ज योजना

* वाहन तारण कर्ज १२%
* साधारण कर्ज १६%
* स्वयंरोजगार कर्ज १६%
* गृहतारण कर्ज ११%
* इतर तारण कर्ज १५.५०%
* प्रोजेक्ट कर्ज १६.५०%
* सुवर्ण तारण कर्ज १४%

## विशेष ठेव योजना

* १३ महिने – ९%
* ९.५०% व्याज ज्येष्ठ नागरिकांकरिता
* २४ ते ३६ महिने – ९.५०%
* १०% व्याज ज्येष्ठ नागरिकांकरिता

Add : 193, Nandanvan Main Road, Nagpur - 09. Ph No. : 0712-2740800
Email : nirmalujjwalgmail.com Website : www.nirmalujjwal.com

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(शेड्युल्ड बँक)

विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...

FIXED DEPOSITS

आकर्षक व्याजदर!

7.75% p.a.

ज्येष्ठ नागरिकांसाठी

7.25% p.a.

इतरांसाठी



अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेशी किंवा www.saraswatbank.com या वेबसाईटवर संपर्क करा.

नियम व अटी लागू. जुलै 2024

Follow us:

**Registered**

**SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099 (DECL NO. SDM/HAVELI/PUNE/SR/20/2017)**

**Postal Reg. No. : PCW/161/2023-2025 Licence to Post without Pre-payment of Postage no. WPP-29**

**(Publication Date - 05/08/2024) Posting on 07/08/2024 at PSO, Pune GPO - 411 001**


## रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

रक्षाबंधन
१९ ऑगस्ट

२२४७ कोटीपेक्षा अधिक ठेवी

व्यवसाय ४१०० कोटींच्यावर




• मुदत ठेव (F.D.) योजना •

| गुंतवणूक कालावधी | व्याजदर |
|---|---|
| 30 ते 45 दिवस | 6.00% |
| 46 ते 180 दिवस | 7.00% |
| 181 ते 365 दिवस | 8.00% |
| 366 दिवसांहून अधिक | 9.00% |

२ वर्षापेक्षा जास्त १ लाखावर मिळवा ₹ 900/-

२ वर्षापेक्षा कमी १ लाखावर मिळवा ₹ 850/-

455 दिवस 10.00%

• वैयक्तिक कर्ज • मुदत ठेव योजना • दाम दुप्पट ठेव योजना • आवर्त ठेव योजना • गृहकर्ज • पर्यटन कर्ज • व्यवसाय कर्ज

**प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार**
द्वारा महाराष्ट्र इंडस्ट्रीयल अँण्ड इकॉनॉमिकल डेव्हलपमेंट अँण्ड एस.एम.ई. चेंबर्स ऑफ इंडिया

**प्रतिबिंब पुरस्कार**
द्वारा सहकार सुगंध, पुणे

**दीपस्तंभ पुरस्कार**
२०१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०, २०-२१, २१-२२ द्वारा राज्य फेडरेशन, महाराष्ट्र राज्य

**अर्थरत्न पुरस्कार**
द्वारा सह्याद्री उद्योग समूह, अहमदनगर

**बँको पुरस्कार**
१५-१६,१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०, २०-२१, २१-२२ द्वारा अवीज् पब्लिकेशन, कोल्हापूर

**राष्ट्रीय पुरस्कार**
द्वारा फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीज लिमिटेड, पुणे

**राष्ट्रीय पुरस्कार-बेस्ट को-ऑप.सोसायटी**
द्वारा चेंबर ऑफ इंडियन मायक्रो स्मॉल अँन्ड मिडीयम इंटरप्राईजेस

**सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार**
२०२२ द्वारा मल्टिस्टेट फेडरेशन, पुणे

**धनंजय तांबेकर**
व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी अर्बन
संचालक, मॅफको

**सौ. राजश्री हेमंत पाटील**
अध्यक्ष, गोदावरी अर्बन

# गोदावरी अर्बन
**मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि. नांदेड**

**कार्यक्षेत्र :** महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, गुजरात, गोवा

Follow us on : www.godavariurban.com

**मुख्यालय :** 'सहकारसूर्य' एमएसईबी समोर, तरोडा नाका, पूर्णा रोड,नांदेड-४३१६०५.फोन:०२४६२-२६७२७७, ७७७५००५७७७
Email : officeadmin@godavariurban.com
**प्रशासकीय कार्यालय :** रिजेंट चेंबर्स, पहिला मजला, स्टेटस हॉटेलच्या वर, नरीमन पॉईंट, मुंबई -४०००२१

## विश्वास तुमचा, जबाबदारी आमची!


**प्रेषक :**
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

प्रति,